

कर्नाटक सरकार

समाज विज्ञान

भाग - II

मराठी माध्यम

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

7

इयत्ता सातवी

कर्नाटक पाठ्यपुस्तक संघ (रजि.)
6 वा क्रॉस, मल्लेश्वरम्, बेंगळूरु - 560 003.

अनुक्रमणिका

H7I2D5

पाठ क्रमांक	इतिहास	पृष्ठ संख्या
15	सामाजिक आणि धार्मिक सुधारणा	01
16	भारताचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध (1857-1858)	14
17	स्वातंत्र्य चळवळी	23
18	कर्नाटकाचे एकीकरण आणि सीमावाद	64
19	कर्नाटकातील समाजाभिमुख चळवळी	75
20	कर्नाटक आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन	86
21	विविध क्षेत्रात प्रगती	93
	नागरिक शास्त्र	
22	न्यायांग	103
23	आपली संरक्षण दले	110
24	भारत आणि शेजारील देश	119
25	संयुक्त राष्ट्रसंघ	131
	भूगोल विज्ञान	
26	ऑस्ट्रेलिया	140
27	अंटार्क्टिका	158

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

इतिहास

पाठ 15 सामाजिक आणि धार्मिक सुधारणा

K6N9J4

पाठाचा परिचय

पाश्चिमात्य शिक्षणाच्या अंमलबजावणीमुळे भारतीयांमध्ये एक नवीन जागरूकता निर्माण झाली. भारतीय त्यांच्या समाजात काही बदल घडवून आणण्यासाठी मार्ग शोधत होते. या अनुषंगाने संघ, संस्था स्थापन करून, त्याद्वारे भारतीय समाज सुधारण्याचे श्रम घेतले. 19व्या शतकात ज्यांनी सामाजिक आणि धार्मिक सुधारणा करण्याचे कार्य केले. त्यांच्याविषयी अभ्यास करूया.


सामर्थ्ये

1. 19व्या शतकातील भारतीय समाजाच्या जागृतीला कारणीभूत अंश व चिंतनशील प्रयत्नाबाबत जाणून घेणे.
2. समाजातील जागृतीसाठी संघ संस्था व सुधारकांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करणे.
3. सामाजिक सुधारणा चळवळीमुळे झालेले परिणाम समजून घेणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आधुनिक पाश्चिमात्य विचारसरणीमुळे भारतात एक नवी जागृती निर्माण झाली. पाश्चिमात्य संस्कृती, वेशभूषा, चालीरिती, सामाजिक धार्मिक विचार, श्रद्धा आणि इंग्रजांचा सामाजिक आदर्श यांचा भारतीयांवर गाढा प्रभाव पडला. विशेषतः भारतीय पाश्चिमात्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद आणि कार्यकारणभाव यामुळे प्रभावित झाले. या चळवळीमुळे वसाहत काळातील भारतात नवीन विचार सरणीची नांदी झाली. ही नवजागरण चळवळ समानतेच्या आकांक्षेचा उद्घोष करणारी एक नवी चेतना आहे त्याला 'सामाजिक आणि धार्मिक चळवळ' असे म्हणतात. या पुनरुज्जीवन चळवळीमुळे दलित आणि महिला वर्गाच्या सबलीकरणाला बळ मिळाले. इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांची विचारधारा बदलली. इंग्रजी शिक्षण हा भारतीय मुक्तीचा मार्ग असल्याचे सांगून ब्रिटीशानी भारतीयावर वसाहतवादी विचारसरणी लादणे सुरूच ठेवले.

ब्राह्मो समाज - (सा.श. 1828)



राजा राममोहन राय

आधुनिक काळातील भारतात सामाजिक जागृती करणाऱ्यामध्ये राजा राममोहन राय सर्वप्रथम होते. यांना रविंद्रनाथ टागोर यानी आधुनिक "भारताचे पितामह" असे म्हटले आहे ते योग्य आहे.

भारतीय समाजात चेतना निर्माण करण्यासाठी राजा राममोहन राय यानी 1814 मध्ये 'आत्मीय सभेची' स्थापना केली. 1819 च्या सुमारम याचे काम थांबले, 1828 मध्ये 'ब्राह्मो सभेची' स्थापना केली. तीन वर्षानंतर त्याचे 'ब्राह्मो समाज' असे नामकरण करण्यात आले. राजा राममोहन राय पूर्व व पश्चिम संस्कृतीचे चिंतन समन्वयक होते. सतीची चाल, जातीयता, मूर्तीपूजा, बहुपत्नीत्व, बाल विवाह तसेच इतर अंधश्रद्धा रूढींबद्दल कडाडून विरोध केला. राजा राममोहन राय आणि त्यांच्या सहकाऱ्यानी अर्थहीन सती चालीचे निर्मूलन करण्यासाठी ब्रिटिश सरकारला विनंती केली. यामुळे गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिंकने सतीच्या पद्धतीच्या आचरणाला कायदाबाहय म्हणूत घोषित केले. (सा.श. 1829) राजा राममोहन राय यानी पाश्चिमात्य पद्धतीचा स्वीकार करताना त्याद्वारे अमानवीय, पद्धती नाहीशा करण्यासाठी जोरदार प्रतिपादन केले. विधवा पूनर्विवाह आणि एक देवता आराधनेसाठी राजा राममोहन रायनी आपल्या संवाद कौमुदी पत्रकाद्वारे सामाजिक सुधारणा चळवळ चालू ठेवली.

NOT TO BE REPUBLISHED © KSBSE

वैचारिकतेच्या आधारे हिंदू धर्माला परिशुद्ध करण्याचा प्रयत्न केला. आपले विचार समर्थपणे मांडून, पाच उपनिषदे संस्कृतमधून बंगाली भाषेत भाषांतरीत केले.

राजा राममोहन राय यानी इंग्रजी शिक्षणाचे प्रतिपादन केले. स्वखर्चाने इंग्रजी शाळा चालविल्या. त्यानी वेदांत कॉलेजची स्थापना केली. राजा राममोहन राय हे आद्य पत्रकारापैकी एक होते. काही दैनंदिन पत्रके त्यानी प्रकाशित केली. आपल्या जीवन कार्यात सामाजिक अन्यायाविरुध्द लढा दिला. त्यांचे समाजाभिवृद्धी कार्य देवेंद्रनाथ टागोर व केशव चंद्र सेन यांनी पुढे चालू ठेवले.

तुम्हाला माहित असू दे : 'राजा' ही पदवी राममोहन राय यांना मोगल बादशहा कडून 1829 मध्ये दिली.

प्रार्थना समाज (सा.श. 1867)

प्रार्थना समाजाची स्थापना आत्माराम पांडुरंग यानी केली. ब्राह्मो समाजानंतर झालेली ही प्रमुख सामाजिक चळवळ होय. याची सुरुवात मुंबई प्रदेशात झाली. बाळ वागले, एम. जी. चंदावरकर, महादेव गोविंद रानडे असे काही समाज सुधारक या संस्थेचे प्रमुख होते. विधवा पूनर्विवाह, आंतरजातीय विवाह, समाजात महिलांचे स्थानमान उंचावण्यासाठी आणि शोषित वर्गाची अभिवृद्धि या समस्यांकडे विशेष लक्ष दिले. एवढेच नाही तर गरजु व अनाथांसाठी आश्रम स्थापन केले. विधवांच्या उध्दारासाठी शिक्षणसंस्था सुरु केल्या.



महादेव गोविंद रानडे

© IOTRS NOT TO BE REPUBLISHED

सत्यशोधक समाज (सा.श. 1873)



महात्मा ज्योतिबा फुले

महात्मा ज्योतिबा फुले (1827-1890) यांचाकडून महाराष्ट्रात ब्राह्मणेत्तर चळवळ सुरु केली. महाराष्ट्रात समाजातील मागास वर्गात जागृती निर्माण करण्यासाठी त्यानी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. अस्पृश्य, अनाथ आणि विधवांसाठी शाळा सुरू केल्या. ब्राह्मण पुरोहितांचे वर्चस्व खंडित करण्यासाठी त्यानी 'गुलामगिरी' नावाच्या साहित्याची रचना केली. व स्वतःचे चिंतनशील विचार मांडले. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुलेनी पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. सा.श. 1863 मध्ये बालविधवांच्या पुनर्वसनासाठी वसतीकेंद्र सुरू करून

त्याद्वारे बालहत्या रोखण्यासाठी प्रयत्न केले. विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले. वास्तववादी महात्मा फुले यांना डॉ. बी. आर आंबेडकर हे आपले तात्विक मार्गदर्शक मानत असत.

तरुण बंगाल चळवळ

राजा राममोहन राय यांच्या सुधारणा चळवळीमुळे बंगालमधील अनेक युवक प्रेरित झाले. यामुळे तरुण बंगाल चळवळ उदयास आली. अँग्लो इंडियन युवक हेन्री विवियन डिरोजीयो याने नेतृत्व केले. स्वत:चे अनुभव आणि विवेचनावरून चिंतन करण्याचे युवकाना आवाहन केले. परंतु भारतीयांवर त्याकाळात त्यांच्या आवाहनाचा प्रभाव पडला नाही. योग्य प्रतिसाद दिला नाही.

आर्य समाज (सा.श. 1875)



स्वामी दयानंद सरस्वती


स्वामी दयानंद सरस्वती (1824 - 1883) यानी आर्य समाजाची स्थापना केली. त्याचे मूळ नांव मूलशंकर असे होते. प्राचीन वेदकालीन भारतात आदर्श समाज अस्तित्वात होता. तशा प्रकारचा समाज आतासुध्दा स्थापन झाला पाहिजे. असे त्यांचे मत होते. त्यादृष्टीने वाटचाल करण्यासाठी त्यानी "वेदाकडे परत चला" असे आव्हान केले. मूर्तीपूजा, अस्पृश्यता, बालविवाह, जाती व्यवस्थेला विरोध केला. दयानंद सरस्वती यांनी आंतरजातीय व विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले. एवढेच नाही तर एक देवाराधनेचे प्रतिपादन केले.

दयानंद सरस्वती यानी आपली तत्वे प्रसिद्ध साहित्यकृती 'सत्यार्थ प्रकाश' ग्रंथात अभिव्यक्त केली आहेत. आर्य समाजाने भारतीय शिक्षणाच्या विकासासाठी प्रयत्न केले. राष्ट्रीय चळवळीला स्फूर्ती दिली. आर्य समाजाचे नेते लाला हंसराज यानी लाहोरमध्ये 'दयानंद अँग्लो वैदिक शाळा' (D.A.V.1886) मध्ये सुरू केली. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय यांसारखे राष्ट्रीय नेते आर्य समाजाच्या

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

तत्वानी प्रभावित झाले. धर्मांतर करून पुन्हा हिंदू धर्मात येणाऱ्यांसाठी दयानंदांचे शिष्य श्रद्धानंद यानी शुद्धी चळवळ सुरू केली.

दयानंदानी केवळ जन्माच्या आधारे ब्राह्मणांना अधिकार देण्यास विरोध केला. स्त्रियांसहित सर्वाना वेदांचा अभ्यास करण्याचा अधिकार आहे. असे घोषित केले. गोपूजेचे प्रतिपादन केले. आर्य समाजाचे स्वराज्य आणि स्वदेशी विचारांचे प्रतिपादन करण्याचे आंदोलन होते.



सामाजिक आणि धार्मिक चळवळीची केंद्रे

रामकृष्ण मिशन (सा.श. 1897)

'उठा! जागे व्हा! ध्येय गाठेपर्यंत थांबू नका' असे आवाहन स्वामी विवेकानंदानी भारतीय युवकाना केले. त्यांचे मूळ नांव नरेंद्रनाथ दत्त असे होते. त्यांचा जन्म 12 जानेवारी 1863 रोजी कलकत्ता येथे झाला. यांनी रामकृष्ण परमहंस यांचे शिष्यत्व स्विकारले व त्यानंतर ते सन्यासी बनले.

रामकृष्ण परमहंसांच्या निधनानंतर त्यांच्या शिष्याना संघटिन करून मार्गदर्शन करण्याची जबाबदारी नरेंद्रनाथांच्यावर पडली सा.श. 1892 मध्ये खेत्रीचा राजा अजित सिंह यांच्या सांगण्यावरून नरेंद्रांचे नाव स्वामी विवेकानंद असे ठेवले. 1893 साली अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या जागतिक धर्म परिषदेत विवेकानंदानी हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व केले. तेथे त्यानी वेदांच्या तत्वज्ञानाबाबत दिलेल्या व्याख्यानाने त्यांना जगप्रसिद्ध बनविले. पाश्चिमात्य संस्कृतीच्या काही साधना, तसेच महिला समानता, यामुळे ते प्रभावित झाले. हे विचार सर्वाना आवडले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



श्री रामकृष्ण परमहंस



स्वामी विवेकानंद

स्वामी विवेकानंदानी भारतात पायी भ्रमण करताना भारतातील त्या काळातील सामाजिक स्थितीबद्दल जाणून घेतले. "जोपर्यंत लोक गरीबी, भूक व अज्ञानात असतील तोपर्यंत मी पुन्हा जन्म घेऊन ती नाहिशी करण्यासाठी प्रयत्न करीन". असे स्वामी म्हणत होते.

पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यानी ब्राह्मणेत्तर विद्यार्थ्यासाठी संस्कृत कॉलेजची स्थापना केली. सर्वप्रथम 1856 मध्ये उच्च वर्गामध्ये कायदेशीर पुनर्विवाह कोलकता येथे त्यांच्या नेतृत्वाखाली झाला.

मानवहित व समाजाच्या निरंतर सेवेसाठी त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. स्त्रियांबद्दल काळजी व गौरव असलेल्या विवेकानंदानी 'स्त्रियांचा उद्धार, आपल्या राष्ट्राचा उद्धार' असे ठासून सांगितले. दुर्बल लोकांच्या सेवेसाठी आग्रह धरला. एकूण स्वामी विवेकानंदानी भारताच्या विकासाचे स्वप्न साकार करण्याचे ठरविले.

स्वामी विवेकानंदाना बाळ गंगाधर टिळक यानी 'राष्ट्रीयतेचे खरे पितामह' असे म्हटले आहे. सुभाषचंद्र बोस सारखे अनेक नेते स्वामी विवेकानंदाच्या विचारांनी प्रेरित झाले.

स्वामी विवेकानंद यांनी जागतिक धर्म परिषदेला जाण्यापूर्वी म्हैसूरू संस्थानाला भेट दिली. विवेकानंदाना आपल्या राजवाड्यात आमंत्रित केलेल्या 10 व्या चामराज वडेयर यांनी संमेलनाला जाण्यासाठी धनसहाय्य केले. विवेकानंदांच्या सल्लयानुसार दलितांसाठी तीन शाळा म्हैसूरच्या वडेयरांनी सुरू केल्या.

उपक्रम - विवेकानंदांनी शिकागो धर्मपरिषदेत केलेल्या व्याख्यानाबाबत माहिती संग्रह करा.

NOT TO BE REPUBLISHED @KSTBS

थिऑसॉफिकल सोसायटी (सा.श. 1875)


थिऑसॉफिकल सोसायटीची (ब्रह्मविद्या समाज) स्थापना रशियन अमेरिकन महिला मॅडम एच. पी. ब्लॅव्हटस्की आणि अमेरिकन कर्नल एच. एस ऑलकॉट यानी न्युयार्क मध्ये स्थापना केली. भारतात आल्यानंतर चेन्नई जवळील अडयार येथे आंतरराष्ट्रीय कार्यालयाची सुरूवात केली. नंतर डॉ ॲनि बेझंट या अध्यक्षा झाल्या, त्यांनी भगवद्गीतेचे भाषांतर केले. 'न्यू इंडिया' आणि 'कॉमनवेल्थ' ही वर्तमान पत्रके काढली. भारतात थिऑसॉफिकल चळवळीचे केंद्र पुढे प्रभावीपणे चालू ठेवले.

थिऑसाफिकल सोसायटीचे उद्देश

1. भेदरहित विश्वबंधुत्व वाढविणे.
2. धर्म, तत्वज्ञान आणि विज्ञान यांच्या तुलनात्मक अभ्यासास प्रोत्साहन देणे.
3. निसर्ग व मानव यात असलेले अंतर्गत रहस्य, सुप्तशक्ती जाणून घेणे.

ॲनी बेझंट यानी बनारसमध्ये सेंट्रल हिंदू कॉलेजची स्थापना केली. नंतर याचे बनारस हिंदू विश्वविद्यालय (B.H.U) असे नामकरण केले. होमरूल चळवळ सुद्धा चालू केली. ॲनी बेझंट भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या 1917 मध्ये प्रथम महिला अध्यक्षा झाल्या.

अलीगढ चळवळ आणि सर सय्यद अहमद खान



सर सय्यद अहमद खान

बहुतेक मुस्लीम पाश्च्यात शिक्षणाकडे संशयाच्या नजरेने पहात आणि त्यांना आपल्या धर्माच्या आचरणावर भरवसा होता. प्रारंभी नवाज अब्दुल लतिफने 1863 मध्ये 'महमडन लिटररी सोसायटीची' स्थापना केली. या संस्थेव्दारे मुस्लिमांमध्ये इंग्लिश शिक्षणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर हिंदू मुस्लिमांच्यात सामंजस्य आणण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांना सर सय्यद अहमद खानने चळवळीचे रूप दिले, यांचा जन्म 1817 मध्ये दिल्लीमध्ये झाला. त्यांची ईस्ट इंडिया कंपनीचा न्यायाधिकारी म्हणून नेमणूक झाली. त्यांना आपला समुदाय इंग्लिश शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे आर्थिक व सामाजिक संधीपासून दूर आहेत असे वाटे. शिक्षण घेऊन सरकारमध्ये आपल्या समाजाला प्रतिनिधित्व मिळवून देण्याची महत्वाकांक्षा होती.


तसेच एक समाजसुधारक म्हणून पडदापद्धत, (बुरखा) बहुपत्नीत्व आणि घटस्फोट यांचा विरोध केला. इंग्लिश वैज्ञानिक आणि साहित्याचे उर्दू भाषांतर

NOT TO BE REPUBLISHED @KSBS

केले. यासाठी ट्रान्सलेशन सोसायटीची स्थापना केली. नंतर या सोसायटीचे 'सायंटीफिक सोसायटी' असे नामकरण करण्यात आले. मुस्लिमांच्यात वैज्ञानिक विचारांचा प्रचार करण्यासाठी हे 'अलीगढ इन्स्टीट्यूट गॅजेट' नावाने पत्रक सुरू केले. हे पत्रक इंग्लिश व उर्दू भाषेत प्रकाशित होत होते.

सा.श. 1875 मध्ये महमडन अँग्लो ओरियंटल कॉलेज सुरू केले. याचे 1920 मध्ये अलीगढ मुस्लीम विश्व विद्यालयात रूपांतर झाले.

श्री नारायण गुरू



श्री नारायण गुरू

श्री. नारायण गुरू हे संत व समाज सुधारक म्हणून प्रसिद्ध होते. यांचा जन्म 1854 साली तिरूवांकूरींच्या 'एळव' समुदायातील कुटूंबात झाला. 1903 साली त्यांनी 'श्री नारायण धर्मपरिपालना योगम्' या संघटनेची स्थापना केली. याद्वारे त्यांनी केरळमधील एळवरू सहीत, मागास समुदायातील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी प्रयत्न केले. जातीभेद, प्राणीहत्या यांचा विरोध केला. संस्कृत शाळांची सुरुवात करून त्यामध्ये जातीभेद न मानता सर्वांना प्रवेश दिला. त्यांनी सुमारे तीस देवालयांची निर्मिती केली. केरळमधील अस्पृश्यांसह सर्वांना प्रवेश मिळवून दिला. देवालयामध्ये सर्व जातीधर्माचे ग्रंथ असलेले ग्रंथालय असले पाहिजे असा आग्रह धरला.

श्री नारायण गुरू यांच्या ''एक देव, एक धर्म, एक जात'' या विधानात त्यांचा आशय दडलेला आहे. (One God, One Religion and One caste) यांचा प्रभाव कर्नाटकात पडल्याचे दिसून येते. नारायण गुरुंचे 1928 साली निधन झाले.

उपक्रम : श्री नारायण गुरू यांच्याबद्दल अधिक माहिती संग्रह करा.

NOT TO BE REPUBLISHED

महिला समाज सुधारक

मॅडम एच.पी. ब्लॅव्हटस्की, ॲनि बेझंट, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडित रमाबाई या भारतातील काही प्रमुख समाज सुधारक होत्या.

सावित्रीबाई फुले



सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई फुले या भारतातील प्रसिद्ध समाज सुधारक होय. शैक्षणिक सुधारक व कवयित्री असलेल्या सावित्रीबाई फुलेनी पती ज्योतीबा फुले यांच्या साथीने पुण्यात मुलींच्यासाठी शाळा सुरू केली. इतकेच नाहीतर त्यानी स्वतः शिक्षिका म्हणून काम केले. बालविवाह झालेल्या विधवांच्या पुनर्वसनासाठी वसती केंद्र सुरू करून शिशुहत्या प्रकरणे थांबविण्याचा प्रयत्न केला. जाती पद्धत आणि लिंग असमानता या विरुद्ध चळवळ केली. यासाठी त्यानी समाजाचा विरोध सहन केला.

पती ज्योतीबा फुलेंच्या सामाजिक कार्यात खांद्याला खांदा लावून कार्य केले. त्यांच्या निधनानंतर 'सत्य शोधक समाज' पुढे चालू ठेवला. प्लेगच्या साथीत रोग्यांची सेवा करताना त्यांनाच प्लेगची लागण झाली व त्यातच त्यांचा अंत झाला. त्यांच्या या संघर्षात त्यांची मैत्रिण फातिमा शेख सोबत होती.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

ताराबाई शिंदे



ताराबाई शिंदे

ताराबाई शिंदे या महाराष्ट्रातील प्रथम महिला चळवळकार होत. ज्योतीबा फुलेंच्या सत्य शोधक समाजात सक्रिय सदस्य म्हणून सामाजिक चळवळीत आपल्याला गुंतवून घेतले. बाल विधवांचे रक्षण आणि विधवा पुनर्विवाहाला पाठींबा दिला. त्यांनी लिहिलेल्या 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकात महिलांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठविला.

पंडित रमाबाई



पंडित रमाबाई

पंडित रमाबाई या भारतातील ख्रिश्चन धर्मातील समाज सुधारक होत. अनंतशास्त्री डोग्री आणि लक्ष्मीबाई यांच्या पोटी जन्मलेल्या रमाबाईचा जन्म पश्चिम किनारपट्टीवरील गंगामूल येथे झाला. तेव्हाच्या सामाजिक पद्धतीच्या विरुद्ध जाऊन शिक्षण घेतले. इंग्लंडमध्ये शिकताना ख्रिश्चन धर्म स्वीकारला. भारतीय महिलांच्या उद्धारासाठी जीवन घालविले. 1889 साली 'मुक्ती मिशन' संस्थेची स्थापना केली. या संस्थेत आजतागायत विधवा, अनाथ व मद्यपीना जीवनोपाय मिळवून देण्यासाठी कार्य केले जाते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

1) संवाद कौमुदी हे पत्रक ..... यांनी सुरू केले.

2) गुलामगिरी पुस्तक ..... यांनी लिहिले.

3) लाहोरमध्ये 'दयानंद अँग्लो वेदिक शाळेची' स्थापना..... यांनी केली.

4) स्त्रीयांच्या उद्धारासाठी 'मुक्ती मिशन' संस्था ..... यांनी स्थापन केली.

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

5) भारताचे 'नवोदय पितामह' असे कोणाला म्हणतात?

6) महादेव गोविंद रानडे कोण होते?

7) सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली?

8) 'उठा, उभे राहा, ध्येय गोठेपर्यंत थांबू नका' असे आवाहन कोणी केले?

9) डॉ. ॲनि बेझंट कोण होत्या?

10) अलिफर चळवळ कोणी सुरू केली?

11) श्री नारायण गुरु यानी कोणती संस्था स्थापन केली?

12) 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकाची लेखिका कोण?

13) भारतातील प्रसिद्ध ख्रिश्चन समाज सुधारक कोण?

III. खालील प्रश्नांची उत्तरे गटात चर्चा करून लिहा.

14) राममोहन रायनी केलेल्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणांचा क्रम सांगा.

15) ज्योतीबा फुलेंची सामाजिक सुधारणेतील भूमिका काय?

16) थियॉसॉफिकल सोसायटीचे उद्देश कोणते?

17) मुस्लीम समाजाला सुधारण्यासाठी सय्यद अहमद खानने काय केले?

18) मागास वर्गाच्या सुधारणेसाठी नारायण गुरु यानी काय केले?

19) स्त्रीयांच्या कल्याणासाठी पंडित रमाबाई यानी काय केले?

IV. अ गटातील यादीतील ब गटातील विषयाशी संबंध जोडून लिहा.

अ	ब
1. स्वामी विवेकानंद	अ. अलिफर चळवळ
2. स्वामी दयानंद सरस्वती	आ. सत्यशोधक समाज
3. सय्यद अहमद खान	इ. थियॉसॉफिकल सोसायटी
4. ज्योतीबा फुले	ई. रामकृष्ण मिशन
5. ॲनि बेझंट	उ. आर्य समाज

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

V. चर्चा करा

'स्त्रीयांचा उद्धार आपल्या राष्ट्राचा उद्धार' स्वामी विवेकानंदाचे मत सद्यस्थितीला प्रस्तूत आहे का? गटात चर्चा करा.

उपक्रम: महादेव गोविंद रानडे, ज्योतिबा फुले, राजा राममोहन राय, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद सरस्वती, सर सय्यद अहमद खान आणि श्री नारायण गुरु यांची जीवन चरित्रे वाचा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

पाठ 16 भारताचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध (सा. श. 1857-1858)

N6L4V1

पाठाचा परिचय

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये 1857 हे साल म्हणजे भारताच्या इतिहासातील एक ऐतिहासिक टप्पा आहे. 1857 चे युद्ध हे केवळ 'शिपायाचे बंड' असे संबोधले. भारतातील राष्ट्रवादींनी याला 'भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध' मानले. हे मुळात ब्रिटीश साम्राज्याविरुद्धचे मोठे युद्ध होय. नागरीक (जनता) आणि शिपाई यांनी ब्रिटिश साम्राज्यशाही धोरणांचा विरोध केला. प्रस्तुत पाठात या युध्दाची कारणे, स्वरूप आणि परिणाम यांचे वर्णन केलेले आहे.

सामर्थ्ये

1. 1857 चे भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध अथवा महायुद्धाला कारणीभूत घटक समजून घेणे.
2. पहिल्या स्वातंत्र्य युद्धात लढलेल्या प्रमुख नेत्यांच्या च्या संघर्षाचे स्मरण करणे.
3. पहिल्या स्वातंत्र्य युध्दाचे परिणाम समजून घेणे.

@KYBS NOT TO BE REPUBLISHED

1857 च्या पहिल्या स्वातंत्र्य युध्दाचे

ब्रिटिश इतिहासकारानी 1857 च्या भारतीयांच्या लढ्याला केवळ शिपायांचे बंड मानले. परंतु भारताच्या इतिहासकारानी याला केवळ् लोकांचे महान बंड न मानता याला 'भारताचे पहिले स्वातंत्र्य' युद्ध म्हटले आहे.

या लढ्याला सर्वप्रथम विनायक दामोदर सावरकर यांनी 'भारतीय स्वातंत्र्याचा पहिला लढा' असे संबोधले. पट्टाभी सीतारामय्या यांनीही हे भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध म्हणून घोषीत केले. या स्वातंत्र्य युद्धाला अल्पावधीतच शिपाई बंडावरून लोक लढ्याचे स्वरूप आले, असा पंडित जवाहरलाल नेहरू यांचा अभिप्राय होता. भारताचे स्वातंत्र्य युद्ध म्हणजे, भारत देशातील बहुतांश लोकांचे युद्ध होते.

1857 च्या युद्धात भारताच्या इतिहसात एक नवीन राजकीय चेतना निर्माण झाली. परिणामी साम्राज्यशाही विरोधी लढे विविध स्वरूपात जन्माला आले आणि वाढत गेले. या युद्धात सहभागी झालेल्या हुतात्म्यांनी लवकरच देशातील लोकांच्या मनात घर केले. त्यांचा त्याग आणि बलिदान यांचे निरंतर स्मरण व्हायला हवे.

1857 च्या पहिल्या स्वतंत्र्य युध्दाची कारणे

इंग्रजांच्या दीर्घकाळ चाललेल्या राजवटीमुळे भारताची अर्थव्यवस्था कमकुवत झाली होती. विविध वर्गातील लोक मोठ्या संकटात सापडले होते. शेतकरी कराच्या (Tax) ओझ्याखाली दबला होता. हस्तकला उद्योगाला उतरती कळा लागली होती. ज्या लोकाना हस्तकलेचा वारसा मिळाला होता, त्या व्यवसायावर त्यांचा विश्वास होता. त्यानी हस्तकलेची प्रासंगिक शक्ती गमावली आणि ते लोक व्यवसायहीन झाले. प्रेरक घटकांचे वर्गिकरण राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, प्रशासकीय आणि लष्करी असे केले जाऊ शकते. यामध्ये काही प्रासांगिक आणि काही पूरक अशी कारणे आहेत.

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

1. राजकीय कारण



बहादूर शाह

ब्रिटिशांच्या दिग्विजयानी आणि उद्देशपूर्वक केलेल्या आक्रमक धोरणामुळे सत्ताधारी वर्ग आणि भारतीय लोकांच्या भावनांना मोठा धक्का बसला. लॉर्ड वेलस्लीच्या सहाय्यक सैन्यपध्दतीमुळे, लॉर्ड डलहौसीच्या आक्रमणामुळे आणि दत्तक पुत्र कायदा नसल्यामुळे अनेक महाराजे व नवाब यांना पदच्यूत करण्यात आले. सातारा, जयपूर, संबलपूर, उदयपुर झांशी, अवध ही संस्थाने लॉर्ड डलहौसीच्या ताब्यात आली. या संक्रमणकालीन राजकीय दबावामुळे, मोगल राजा 'बहादूर शहा' राजकीयरित्या नाममात्र सम्राट बनला. काही राजांचे विश्रांती वेतन रद्द केले आणि काहींच्या पदव्या रद्द केल्या.

2. प्रशासकीय कारण

ब्रिटिशांनी सर्व नागरी, लष्करी उच्च पदे युरोपीयन लोकांच्यासाठी राखीव ठेवण्याच्या उद्देशाने नवीन शासन प्रणाली तयार केली. या व्यवस्थेमुळे जनसामान्यांमध्ये विश्वास निर्माण करण्यास असफल झाल्याचे दिसून आले. राज्यकारभारात मध्यस्थांची भूमिका होती. तयार केलेल्या कायद्यामुळे सामाजिक वर्ग व्यवस्था बिघडली. न्यायालयीन कामकाजाची भाषा पर्शियन ऐवजी इंग्लिश करण्यात आली. त्यामुळे भारतीय शासक वर्गाला व भारतीय जनतेला योग्य वाटली नाही.

3. आर्थिक कारण

ब्रिटिशांनी स्वतःच्या फायद्यासाठी राजकीय सामर्थ्याचा वापर करून भारताच्या आर्थिक संसाधनांचा आणि संपती लुटण्यासाठी सामर्थ्याचा वापर केला. ब्रिटिशांच्या व्यावसायिक धोरणामुळे गृह उद्योग आणि इतर स्थानिक व्यवसाय नष्ट झाले. जमीन सुधारणा धोरण अत्यंत शोषणात्मक होते. अनेक जमीनदारांचे उत्पन्न आणि उत्पन्नाचे स्त्रोत काढून घेण्यात आले. मोठया प्रमाणात संपत्तीची निर्यात होत होती. शेतीच्या व्यापारीकरणामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती कोलमडली. भीषण दुष्काळाने लाखोंचे बळी घेतले. या सर्व कारणामुळे भारताला गरिबीकडे ढकलले.

4. सामाजिक आणि धार्मिक कारण

अनेक सामाजिक आणि धार्मिक अंश या स्वातंत्र्य युद्धाला कारणीभूत ठरले. अशा अनेक कारणानी बंडखोरीचा उद्रेक होण्यास हातभार लागला. ब्रिटिश त्यांच्या वांशिक श्रेष्ठत्वाच्या नशेत होते. ते भारतीयांना 'गोऱ्यांवर बोजा' असे म्हणून हिणवत असत. ते भारतीयांना संस्कृती आणि नागरिकतेचा गंधही नसलेले

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अनागरिक असे संबोधू लागले. भारतीयांना 'डुक्कर', 'काळे लोक' असे म्हणून हिनवत असत. युरोपियनांनी चालविलेल्या हॉटेल व क्लबमध्ये भारतीयांना प्रवेश नव्हता. "कुत्र्यांना व भारतीयांना प्रवेश निषेध" असे नामफलक लावले होते. शिवाय सतीपध्दत, बालविवाह बंदी, विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन यामुळे भारतीयांना आपल्या सामाजिक व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप वाटू लागला.

गोऱ्यांवर बोजा म्हणजेच भारतीय हे असंस्कृत आहेत. त्यांना सुसंस्कृत बनविण्यासाठी आलो आहोत. असंस्कृतांना सुसंस्कृत बनविणे ही गोऱ्या लोकांची जबाबदारी आहे, असे म्हणत. ही वसाहतवादी युक्ती होती. या सिध्दांताचा जनक कवी रूडयार्ड किल्पींग हे होते.

मिशनरींच्या ख्रिश्चन धर्मात, परिवर्तनाच्या प्रयत्नामुळे अनेक भारतीय भयभीत झाले. ख्रिश्चन धर्मप्रचारकांनी हिंदू आणि इस्लाम धार्मिक सिद्धांतावर टीका केली. ब्रिटिशनिर्मित नवीन रेल्वेमार्ग, तारांचे बांधकामही भारतीयांना संशयास्पद वाटू लागले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

5. लष्करी कारण

भारतीय जवानांमध्ये (सैनिक) असंतुष्टता होती. सैनिकांनी पारंपारिक, धार्मिक चिन्ह व फेटे घालण्यास निर्बंध होता. भारतीय सैनिकांना खूप कमी वेतन होते. तसेच बढती सुविधा नव्हत्या. परंतु ब्रिटिश सैनिकांना मात्र जास्त वेतन, बढती आणि इतर सुविधा देण्यात येत होत्या. भारतीयांना पार दूरवर, कमी वेतनात सेवा बजावावी लागत असे. लॉर्ड कॅनिंगच्या 'सामान्य सेनासेवा कायदा' आणि ब्रिटिशांच्या आदेशानुसार कोठेही काम करावे लागे.

6. तत्कालीन कारण

जनसमूह दंग्याचा 1857 चा काळ सहन होणारा नव्हता. त्याचा विस्फोट होण्यासाठी एकच कारण पुरेसे झाले. 1857 मध्ये नवीन प्रकारची बंदूक (एनफिल्ड रायफल) ही भारतीय सैन्यातील शिपायांच्या दंग्याला तत्कालीक कारण ठरले. एनफिल्ड रायफल चा वापर करताना त्या काडतूसाचे आवरण दातांनी तोडून टाकावे लागे. या काडतूसांना गाईंची व डूकरांची चरबी फासलेली होती. अशी बातमी समजताच हिंदू, मुस्लीम शिपायांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आणि सैनिकांनी काडतूसांचा वापर करण्यास नकार दिला म्हणून त्याना शिक्षा दिली जावू लागली.


पहिल्या स्वातंत्र्य - बंडाची गती



मंगल पांडे

मीरतमधील बंडाची (दंग्याची) सुरुवात 10 मे 1857 रोजी झाली. त्यानंतर उत्तर भारतातील प्रातांमध्ये व्यापकपणे बंडाचा प्रसार झाला. मीरतमधील दंग्याच्या आधीही बराकपूर (बंगाल) येथील भारतीय शिपाई मंगल पांडे यांनी चरबी लावलेल्या बंदूका वापरण्यास नकार दिला. एका ब्रिटिश अधिकाऱ्यावर गोळ्या झाडल्या परंतु त्यानंतर त्यांचीही हत्या झाली. मीरतमध्ये दिसणाऱ्या प्रत्येकालाच (युरोपियनांना) मारण्यात येत होते. 'मारो फिरंगी को' (युरोपियनांची कत्तल करा) अशी आरोळी ठोकत, कांही संतापलेले शिपाई दिल्लीकडे धावले. दिल्लीमधील भारताच्या वृद्ध व दुर्बल मोगल बादशहा दुसरा बहादूरशहा याला भारताचा चक्रवर्ती म्हणून घोषीत केले.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED



महा दंग्यांचा प्रदेश

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

फिरंगी : फिरंगी हा शब्द पर्शियन भाषेतील शब्द आहे. उर्दू व हिंदी भाषेत युरोपियन नीच माणूस असे सुचविण्यासाठी वापरतात.

अल्पकाळात दंगा सर्वत्र पसरली. दिल्ली कानपूर, लखनौ, बरेली, झांशी आणि बिहारचे आरा ही दंगलीची प्रमुख केंद्रे होती.



ब्रिटीशांच्या विरोधात भारतीयांचा संग्राम



लक्ष्मीबाई

दिल्लीमध्ये सेनापती बख्तू खान, कानपूरमध्ये नानासाहेब व तात्या टोपे, लखनौमध्ये बेगम हजरत महल, झांशीमध्ये राणी लक्ष्मीबाई आणि बिहारमध्ये कुंवर सिंग यांच्या नेतृत्वाखाली चळवळी केल्या. ब्रिटिशानी ही चळवळ दडपून टाकली. ही चळवळ उत्तर भारतात मर्यादित न राहता महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, केरळ, गोवा आणि पाँडीचेरी पर्यंत पसरली. कर्नाटकात मुंडरगी भिमराव, हलगली बेड जातीचे लोक, सुरपूर व्यंकटप्पा नायक आणि नरगुंदचे बाबासाहेब मुख्य नेते होते. उत्तर व दक्षिण भारतात सर्वत्र चळवळ पसरली, तरीसुद्धा अल्पकाळात ब्रिटिशानी चळवळ दडपून टाकली.

© NOT TO BE REPUBLISHED

उपक्रम : झाशीची राणी लक्ष्मीबाईनी ब्रिटिशांच्या विरुद्ध कसा लढा दिला. याची माहिती मिळवा.



कुंवर सिंग



नानासाहेब

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

परिणाम

ही चळवळ अपयशी ठरली. तरीसुद्धा तिचे परिणाम दूरगामी झाले. भारताच्या राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रावर गंभीर परिणाम झाले. या चळवळीमुळे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपुष्टात आली. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती असलेली भारतीय सत्ता ब्रिटिश राणीने आपल्या ताब्यात घेतली. सा.श.1858 मध्ये राणी व्हिक्टोरीयाने एक 'घोषणा' केली. या घोषणापत्रात भारतीयांचे हक्क, चालीरिती आणि पध्दती यांचा आदर करण्याचे वचन दिले. त्यामुळे भारतीयांच्या धार्मिक स्वातंत्र्यात हस्तक्षेप न करण्याचे स्पष्ट केले.

सा.श. 1857-58 ची ही चळवळ पुढे आधुनिक राष्ट्रीय चळवळीच्या उदयाला कारण ठरली आणि पुढील स्वातंत्र्य संग्रामाला स्फूर्ती मिळाली.

अभ्यास

I. रिकाम्या जागा भरा.

1. सामान्य सेनासेवा कायदा ..... यांनी आणला.
2. बराकपूर येथे चरबी फासलेली काडतूस वापर करण्यास ..... यांनी नकार दिला.
3. बिहारमध्ये ..... यांनी बंडाचे नेतृत्व केळे.
4. 1857 च्या लढयातून भारताचे प्रथम स्वातंत्र युध्द असे ..... यानी संबोधले.

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

5. 1857 च्या स्वातंत्र्य युद्धाचे तात्कालीक कारण कोणते होते ?
6. 1857 च्या स्वातंत्र्य युध्दाचा कोणताही एक परिणाम सांगा ?
7. ब्रिटीशांच्या राजकीय धोरणामुळे कोणते प्रांत ब्रिटीशांच्या आधिपथ्याखाली आले ?

III. टिपा लिहा

8. स्वातंत्र्य युद्धाची कारणे.
9. झांशीची राणी लक्ष्मीबाई.
10. दुसरा बहादूर शहा.

उपक्रम: मंगल पांडे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, नानासाहेब, बेगम हजरत महल, कुंवर सिंग, मुंडरगी भिमराव यांच्या क्रांतीकारी जीवनकथा वाचा. (पहा - भारतभारती पुस्तक माला)

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 17 स्वातंत्र्य युद्ध

L1G3K4

स्वातंत्र्य चळवळ (1885-1919)

पाठाचा परिचय

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांच्या शोषणाच्या धोरणामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. भारतीयांच्या नवीन इंग्रजी शिकलेल्या वर्गाला ब्रिटिश राजवटीची खरी उद्दिष्टे समजू लागली. शेतकरी आदिवासी आणि इतर वर्गाना इंग्रजांचा खूप त्रास सहन करावा लागला. ते इंग्रजांच्या विरोधात आंदोलन करण्याच्या संधीची वाट पहात होते. या पाठात भारतीयांमध्ये राष्ट्रीयता जागृत करण्यासाठी जबाबदार असलेले मुख्य घटक, आखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना, राष्ट्रीय चळवळीमध्ये मवाळवादी आणि जहालवादी यांची भूमिका आणि इतर तत्वे स्पष्ट केली आहेत.

महात्मा गांधीजींच्या राजकीय आणि आर्थिक तत्वज्ञानाचा जगभरात आदर होतो. स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या नेतृत्वाच्या कालखंडाला 'गांधी युग' (1919-1947) म्हणतात. या पाठात स्वातंत्र्य लढ्यातील 1919 ते 1947 हा काळ समजावून देण्यात आला आहे.

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात महिलांनीही खुप सक्रीय सहभाग घेतला होता. स्वातंत्र्य प्राप्तीत त्यांचाही वाटा होता. यामध्ये कर्नाटकातील महिलांचे पात्र वाखाणण्याजोगे होते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

सामर्थ्य

1. 19व्या शतकात राष्ट्रीयतेच्या विकासात कारणीभूत असलेल्या महत्वाच्या घटकांबद्दल शिकतात.
2. मवाळ, जहाल व क्रांतीकारकांची तत्वे व नीती समजून घेणे.
3. इंग्रजांनी त्यांच्यात 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाने भारतावर कसे राज्य केले, याची त्यांना जाणीव होते.

4. गांधीजींचे जीवनाच्या सुरवातीच्या भागाची माहिती मिळते. गांधीजींनी ब्रिटिशाविरुद्ध स्विकारलेल्या अहिंसा आणि सत्याग्रहाच्या तत्वाचे ते कौतुक करतात आणि अभिमान बाळगतात.
5. गांधीजींचे नेतृत्व, ध्येय, सत्यता, साधेपणा, मानवतावादी वृत्ती आणि नम्रता यांचे कौतुक करतात.
6. ते सुभाषचंद्र बोस यांच्या गुणांचे कौतुक करतात आणि डॉ. आंबेडकराच्या योगदानाचे कौतुक करतात.
7. स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या योगदानाबद्दल शिकतात.
8. स्वातंत्र्यानंतर कर्नाटकच्या विकासात महिलांच्या योगदानाची माहीती घेतात.

राष्ट्रीयत्वाचा विकास

आपला भारत हा वैविध्यपूर्ण संस्कृतीनी नटलेला देश आहे. आपल्याकडे सुदीर्घ सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा आहे. त्यामुळे 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रीयत्वाच्या विकासासाठी तात्विक पाया घातला गेला. राष्ट्रीयता म्हणजे विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील लोकांच्या मनात आपण सर्व एक आहोत; ही एकतेची भावना, तसेच क्षेत्राबद्दल आदर आणि सदिच्छा.

1857 च्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धातील भारतीयांचा संघर्ष हा काही प्रासंगिक नव्हता. त्यामुळे योग्य समन्वयाचा अभाव दिसून आला. पण त्यामुळे जागरूक भारतीयांमध्ये संघटनेची भावना निर्माण झाली. हा हळूहळू राष्ट्रीय संघर्ष बनला राष्ट्रीयतेच्या वाढीस अनेक घटक कारणीभूत आहेत.

1. पाश्चिमात्य शिक्षण आणि आधुनिक ज्ञानविज्ञानाचा परिचय : इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांनी युरोपियन तत्वज्ञान विषयक कामांचा अभ्यास केला आणि राष्ट्रवादी राजकीय दृष्टिकोनाची भावना विकसित केली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संकल्पनानी युरोपात जन्म घेतला. त्यांना राजकारणात येण्यास प्रवृत्त केले. यामुळे त्यांना स्वातंत्र्याची मागणी करण्याची प्रेरणा मिळाली. इंग्रजी शिकलेले भारतीय लोक आम्हाला मदत करतील हा इंग्रजांचा अंदाज त्यांनी खोटा ठरविला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

2. एकसमान प्रशासन प्रणाली : ब्रिटिशांनी भारतात एकसमान प्रशासन प्रणाली सुरू केली. परिणामी समान नियम आणि कायद्याच्या अधीन असलेल्या भारतीयांमध्ये आपण सर्व समान आहोत, ही भावना निर्माण झाली. त्याच पद्धतीने इंग्रजांच्या अमानुष धोरणांचा सर्वानाच त्रास झाला आणि त्यांना एका आवाजात विरोध केला. या अनुभवामुळे भारतीयांना राष्ट्रीयत्वाची भावना विकसित होण्यास मदत झाली.

3. आर्थिक शोषण : इंग्रजानी त्यांच्या स्वार्थी आर्थिक धोरणामुळे भारतीय व्यापार, शेती आणि उद्योगाचा नाश केला. त्यांनी जमिनीला विक्रीची वस्तू मानली. दादाभाई नौरोजींनी आपल्या संपत्तीचा निचरा करण्याच्या संपत्ती गळती सिद्धांताद्वारे ब्रिटिश ज्या पद्धतीने देशाची लूट करत होते, त्याकडे भारतीयांचे लक्ष वेधले.

4. परंपरेचा परिचय : सर विल्यम जोन्स, एच. टी. कोलब्रुक, मॅक्स मुल्लर, कनिंगहॅम आणि इतरांनी आपल्या संशोधनातून भारतीयांना भारतीय ऐतिहासिक परंपरांची ओळख करून दिली. यावरून भारतीय संस्कृती ही ग्रीक आणि रोमन संस्कृतीइतकीच उत्तम असल्याचे वास्तव समोर आले. या प्रकटीकरणामुळे राष्ट्रीयत्वाची भावना अधिक सखोल आणि मजबूत होऊ लागली.

5. सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळ : 19 व्या शतकात भारतीय समाज सुधारक राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद अशा अनेकांनी भारतातील वंचित आणि शोषित समुदायांसाठी शिक्षणाचे महत्व पटवून दिले. दयानंदानी लोकांना स्वराज्य आणि स्वदेशीचे संदेश देऊन प्रेरित केले. तर विवेकानंदांनी सुस्त समाजाला जागृत करण्याचे काम केले. राष्ट्रीयत्वाच्या वाढीला नवा दृष्टिकोन मिळाला.

6. भारताच्या प्रथम स्वातंत्र्य युध्दाची स्फूर्ती : या घटनेने भारतीयांना राजकीयपणे संघठीत होण्याची गरज लक्षात आली. एवढेच नाही तर या युध्दात हौतात्म्य पत्करलेले मंगल पांडे, राणी लक्ष्मीबाई, हज़रत महल इत्यादी नायक पुढील नेत्यांना स्फूर्तीस्थान ठरले.

© KEBS NOT TO BE REPUBLISHED

7. समाजातील तारतम्य : ब्रिटिशानी स्वत:ला भारतीयांपेक्षा श्रेष्ठ समजले. भारतीयांना ते असंस्कृत समजत होते. प्रशासनातील उच्च पदे ब्रिटिशांसाठी राखीव होती. इल्बर्ट कायद्याला (1884) भारतातील ब्रिटिशांचा असणारा विरोध या विधानाची सत्यता दर्शवतो.

अशाप्रकारे समान कायद्यांतर्गत शोषण झालेल्या भारतीयांना आपण एक आहोत असे वाटे. कठोर कायदे आणि नियमांना विरोध करण्यासाठी ते एकत्र आले. त्यामुळे सर्व भारतीय एक असल्याची भावना वाढीस लागली.

भारतीय राष्ट्रीय कांग्रेस- (1885)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्थापन्यात निवृत्त ब्रिटिश अधिकारी ॲलन ऑक्टेवियन ह्यूम यांची संकल्पना होती. याची स्थापना 1885 मध्ये मुंबई येथे झाली. उमेशचंद्र बॅनर्जी हे काँग्रेसचे प्रथम अध्यक्ष होते. मुंबईमध्ये झालेल्या काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात 72 प्रतिनिधींनी भाग घेतला. यापैकी जास्तीत जास्त वकील, पत्रकार आणि समाजातील प्रतिष्ठीत वर्गातील होते. वास्तविक काँग्रेस हे राष्ट्रीय चळवळीला चालना देणारे प्रथम राजकीय व्यासपीठ होते.

© KSBS NOT TO BE REPUBLISHED



ए. ओ. ह्यूम

काँग्रेसचे संस्थापक



उमेशचंद्र बॅनर्जी प्रथम

अधिवेशन अध्यक्ष

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उद्देश :

- देशातील विविध भागातील राजकीय कार्यकर्त्यांना एकत्र आणणे आणि मैत्री निर्माण करणे.

- राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे.
- जनतेच्या मागण्या सरकारपुढे मांडून ठोक मत जाणून घेणे.
- प्रांतवाद सोडून राष्ट्रीयता वाढीस लावणे.

मवाळांचा कालखंड (1885 - 1905)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रारंभीचे नेते मवाळ होते, असे म्हटले जाते. 1885 ते 1905 मधील काळाला 'मवाळांचा काळ' असे म्हणतात. त्यांनी संविधानाच्या नीतीवर विश्वास ठेवला. ब्रिटीशांच्या कारभारात निष्ठावंत राहून प्रार्थना, निषेध व उपोषण या नीतीचा वापर केला. त्याचबरोबर राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी ब्रिटिशाचे मनपरिवर्तन करणाचा प्रयत्न केला. प्रमुख मवाळ नेत्यांपैकी दादाभाई नवरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, गोपाळकृष्ण गोखले, महादेव गोविंद रानडे हे होत.

मवाळांच्या संघर्षामुळेच भारतीयांना विधानसभेत प्रवेश मिळू शकला. शिवाय भारताच्या दारिद्र्याचे कारण ब्रिटीश होते, हे त्यांच्या प्रयत्नातून दिसू लागले. भारतीयांनी राजकिय संघर्षाला आवश्यक प्रशिक्षण घेतल्यामुळे ब्रिटीशविरोधी लढयात राष्ट्रीय लढा निर्माण केला.

© KBS NOT TO BE REPUBLISHED

प्रमुख मवाळ नेते



दादाभाई नवरोजी



सुरेंद्रनाथ बॅनर्जी



गोपाळकृष्ण गोखले

मवाळांच्या मागण्या

अभिव्यक्ती आणि प्रकाशनस्वातंत्र्य, न्यायपालिकेला कार्यकारिणी पासून वेगळे करणे, लष्करी खर्चात कपात, प्राथमिक, उच्च माध्यमिक आणि तांत्रिक शिक्षणाची अंमलबजावणी, शस्त्रास्त्र बंदी कायदा रद्द करणे, बँकिंग, सिंचन, वैद्यकीय आणि आरोग्य सुविधांची तरतूद, मीठावरील कर, आय. सी. एस. परीक्षा घेणे, केंद्रीय आणि प्रांतीय विधिमंडळ प्रक्रियेत भारतीयांना प्रतिनिधित्व प्रदान करणे, उच्च पदांवर भारतीयांची नियुक्ती इत्यादी.

जहालांचा कालखंड (1905-1919)

मवाळ सामान्य जनतेपासून दूरच राहिले. त्यांनी अनुसरलेल्या प्रार्थना व विनवणी नितीला 'याचक नीती' (पॉलीसी ऑफ मेडीकेन्सी) अशी टीका केली. युवावर्ग त्यांच्या नीतीमुळे आकर्षित झाला नाही. त्यांच्या वाट बघण्याच्या पद्धतीला विरोध करून नवनायकांचा एक गट काँग्रेसमध्ये उदयाला आला. त्यांना जहाल असे म्हणतात. लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक व बिपीनचंद्र पाल हे जहालांचे नेते होते. ते लाल-बाल-पाल या नावाने प्रसिद्ध होते. सा. श. 1905-1919 या काळाला जहाळांचा काळ म्हणतात.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED



लाला लजपतराय (लाल)



बाळ गंगाधर टिळक (बाल)




बिपीनचंद्र पाल (पाल)

जहालांच्या चळवळीची कारणे

- भारतीयांना उच्च पदे मिळवून देणे.
- 1905 साली लॉर्ड कर्जनने बंगालची फाळणी करून जातीय राजकारण करण्याचा प्रयत्न केला.
- 1905 साली लहान देश असलेल्या जपानने रशियावर विजय मिळविला. या घटनेमुळे आशियाई युरोपीयांना हरवू शकतात, असा आत्मविश्वास आला.
- आयर्लंड, रशिया, चीन, टर्की, इजिप्त राष्ट्रामध्ये चाललेल्या क्रांतीकारी आंदोलनामुळे भारतीयांना प्रेरणा मिळाली.

बाळ गंगाधर टिळक हे एक अप्रतिम देशभक्त होते. "स्वराज्य, हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. तो मी मिळवणारच!" या त्यांच्या घोषणेत स्वातंत्र्याची उत्कटता होती. भारतीयांना एकत्रित करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव सुरू केले. 'मराठा' (इंग्लीश) व 'केसरी' (मराठी) वृत्तपत्रे सुरु केली व जनतेला राजकीय प्रेरणा दिली. बिपीनचंद्र पालनी 'न्यू इंडिया' आणि अरविंद घोष यांनी 'वंदे मातरम' ही वृतपत्रे सुरु केली. लाला लजपत राय हे 'पंजाबचे सिंह' म्हणून लोकप्रिय झाले. त्यांनी "आम्हाला स्वराज्य हक्काने पाहिजे, भिक्षा म्हणून नको" असे म्हटले. बिपीनचंद्र पाल यांनी बंगालमध्ये सामूहिक चळवळ सुरू केली. अरविंद घोष हे आणखी एक जहाल नेते होते. विदेशी वस्तुवर बहिष्कार, स्वदेशी वस्तूचाच वापर आणि राष्ट्रीय शाळा सुरु करणे, ही अरविंद घोष यांची कार्यपद्धती होती. जहालांनी राष्ट्रीय लढ्याला अधिक मजबूती दिली होती.



अरविंद घोष

© KTRS NOT TO BE PUBLISHED

बंगालची फाळणी (1905)

जहाल नेत्यांना राष्ट्रीय चळवळीला प्रेरणा देणारी एक प्रमुख घटना म्हणजे 1905ची बंगालची फाळणी. बंगालमध्ये भारतीयांचे राष्ट्रप्रेम पाहून ब्रिटीश भयभीत झाले.

त्यामुळे बंगालमधील हिंदू व मुस्लीम यांच्यात जातीय तेढ निर्माण करून फाळणीद्वारे राष्ट्रीयतेची तीव्रता कमी करणासाठी व्हाईसरॉय लॉर्ड कर्जन याने प्रयत्न केला. या फाळणीला विरोध करण्यासाठी 16 ऑक्टोबर 1905 रोजी संपूर्ण बंगालमध्ये 'राष्ट्रीय शोकदिन' म्हणून आचरण्यात आला. रविंद्रनाथ टागोर यांनी 'अमर सोनार बांग्ला' हे राष्ट्रीय गीत म्हणून गायिले गेले. 'वंदे मातरम' ही घोषणा सर्वांची झाली. बंगालमध्ये एकात्मता दर्शविण्यासाठी हिंदू-मुस्लिम यांनी परस्परांमध्ये रक्षाबंधन आयोजित केले. जनतेचा तीव्र विरोध लक्षात घेऊन 1911 साली बंगालची फाळणी रद्द करण्यात आली.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



लॉर्ड कर्जन



बंकिमचंद्र चटर्जी

मुस्लीम लीगची स्थापना : (1906)

लॉर्ड कर्जनने 'फोडा आणि राज्य करा' या नितीचा अवलंब करून मुसलमानांना दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून मुस्लिमांची स्वहिताची एक स्वतंत्र संघटना स्थापन करण्यास ब्रिटीशांनी प्रोत्साहन दिले.

1906 मध्ये मुस्लिम नियोगाने भारताचे व्हाईसरॉय असलेले मिंटो यांची भेट घेतली. यापासून प्रेरणा घेऊन सर आयाखान, ढाकाचे नवाब सलीमुल्ला आणि इतरांनी मिळून 1906 मध्ये भारत मुस्लिम लीगची स्थापना ढाका (सध्याचे बांग्लादेशांची राजधानी) येथे केली.

सुरत दुफळी (1907)

बंगाल विभाजनाच्या विवादामुळे जहालांनी देशात सर्वत्र स्वदेशी आणि बहिष्कार चळवळ मोठया प्रमाणात चालू केली. परंतु मवाळांनी त्यांची व्याप्ती फक्त बंगाल पुरतीच मर्यादीत ठेवली. एवढेच नाही तर मवाळ सरकार बरोबर थेट संघर्ष करण्यास तयार नव्हते. जहाल व मवाळांच्या या भिन्न मतभेदामुळे काँग्रेसमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली. 1907 मध्ये सुरतमध्ये झालेल्या काँग्रेस अधिवेशनात मवाळ व जहालमध्ये काँग्रेस विभागली गेली. त्यानंतर भारताच्या राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व 1919 पर्यंत जहाल गटाकडे होते.

1907 मध्ये काँग्रेसच्या विभाजनानंतर सरकारने कट्टरपंथीयांच्या विरोधात दबावतंत्र सुरु केले. त्यापैकी अनेकांना तुरुंगात पाठवण्यात आले. काहींना हद्दपार करण्यात आले. काहींना काळ्या पाण्याची शिक्षा देऊन हद्दपार करून मंडालेच्या तुरुंगात डांबून ठेवण्यात आले. त्यामुळे राजकीय चळवळी तात्पुरल्या मंदावल्या टिळकांनी तुरुंगात 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला.

जहाल नेत्यांना राजकीय दृष्ट्या निष्क्रीय करण्यासाठी ब्रिटीशानी विधीमंडळात मवाळांना व मुस्लीमांना प्रतिनिधीत्व देऊन शांत करण्याचा प्रयत्न केला. यासाठी 1909 मध्ये मिंटोमार्ले सुधारणा लागू करण्यात आल्या. या कायद्याने मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले. याच दरम्यान पहिल्या महायुद्धाला सुरवात झाली (1914). त्यामुळे राष्ट्रीय चळवळीला प्रेरणा मिळाली. 1916 मध्ये लोकमान्य टिळक व ॲनी बेझंट यांनी होमरुल चळवळ (अंतर्गत शासन) सुरू केली.

NOT TO BE REPUBLISHED ©KSEB

रौलेट कायदा (1919)

1917 डिसेंबरमध्ये न्यायमूर्ती रौलेट यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती स्थापन करण्यात आली. भारतातील क्रांतीकारी कारवाया दडपण्याचा त्यांचा उद्देश होता. रौलेट कायदा अखेर 1919 मध्ये मंजूर झाला. या कायद्यानुसार सरकार व्यक्तीला विनाकारण संशयावरून अटक करु शकत होते. पूर्वसूचना न देता कोणत्याही भागात शोध मोहिम हाती घेण्यात येत होती. अटक केलेल्या व्यक्तीला वकील ठेवण्याचा अधिकार नव्हता. या कायद्याला भारतीयांनी कडाडून विरोध केला. देशभरात संतापाची लाट उसळली. याविरुद्ध गांधीजीनी सत्याग्रह केला.

जालियनवाला बाग हत्याकांड (1919)

रौलेट कायद्याच्या विरोधात गांधीजींच्या सत्याग्रहापासून पंजाबच्या बहुतांश भागात निदर्शने सुरु झाली. 13 एप्रिल 1919 रोजी पंजाबमधील अमृतसरच्या सुवर्ण मंदिरापासून काही अंतरावर असलेल्या 'जालियनवाला बाग' येथील उद्यानात झाली. बैठकीला नेते डॉ. सैफूद्दीन किच लू आणि डॉ. सत्यपाल यांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी हा मोर्चा होता.

© KIRS NOT TO BE REPUBLISHED



जालियनवाला बाग हत्याकांड

अमृतसरचे रक्षणाध्यक्ष असलेले जनरल डायर यांनी चळवळ करणाऱ्यांना धडा शिकविण्यासाठी बागेला असलेला एकमेव दरवाजा बंद केला व सर्वावर गोळ्या झाडण्याचा हुकूम सोडला. निशस्त्र असलेली जनता भांबावून गेली. गोळीबारात सरकारच्या सांगण्याप्रमाणे फक्त 379 लोक मरण पावले. पण वास्तवात त्यापेक्षा जास्त लोक मरण पावले. उद्यानात आजही गोळीबाराच्या खुणा दिसतात, या कृत्याचा तीव्र निषेध करण्यात आला.

क्रांतीकारी राष्ट्रीयता

जहाल लोकांनी शस्त्र हाती घेऊन काही लोकांनी स्वतःला क्रांतीत झोकून दिले. त्यांना 'क्रांतीकारी राष्ट्रीयवादी' असे म्हणू लागले. भारतातल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी यांना दहशत निर्माण करणारे असे म्हटले. भारताला पूर्णपणे स्वातंत्र्य मिळवून देण्याचे त्यांचे ध्येय होते. प्रखर देशभक्ती आणि त्याग हे क्रांतीकारी राष्ट्रीयवादाचे मूलभूत तत्व होते.


गुप्त संघटनेची स्थापना करणाऱ्या क्रांतिकारकांमध्ये वासुदेव बळवंत फडके हे पहिले क्रांतीकारी होते. फडके यांच्यावर दामोदर व बाळकृष्ण चाफेकर बंधूच्या गुप्त संघटनेचा गाढा प्रभाव होता. त्या दोघांनाही बंदी करून फाशी देण्यात आली.

आपल्या देशातील इतर क्रांतीकारी म्हणजे विनायक दामोदर सावरकर, खुदीराम बोस, चंद्रशेखर आझाद आणि भगतसिंग. स्वातंत्र्यासाठी फासावर चढलेले खुदीराम बोस हे पहिले हुतात्मा (1908) होय. तेव्हा त्यांचे वय 19 वर्षे होते. तेव्हा देशातील जनतेने त्यांच्या बलिदानावर अश्रू ढाळले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



खुदीराम बोस



चंद्रशेखर आझाद



भगत सिंग



विनायक दामोदर सावरकर

विनायक दामोदर सावरकर हे आणखी एक क्रांतीकारक होते. 1899 मध्ये त्यांनी 'मित्रमेळा' नावाची पहिली गुप्त संघटना तयार केली. त्याला पुढे 'अभिनव भारत' असे संबोधण्यात आले. ब्रिटिश सरकारने त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आणि अंदमानच्या तुरुंगात पाठवले. अंदमानच्या तुरुंगात त्यांना खूप शारीरीक त्रास सोसावा लागला. त्यांच्या पश्चात भारत सरकारने अंदमान जेलमध्ये त्याचे स्मारक उभे केले.

चंद्रशेखर आझाद हे हिंदुस्थान सोशियलिस्ट रिपब्लिकन असोसिएशनमध्ये मिसळून काकोरी फितूरी, शासनाच्या सभेत बाँब तसेच लाहोरमध्ये ब्रिटिश अधिकारी सॅन्डर्सन याच्यावर गोळीबार अशा प्रकरणांमध्ये सहभागी होते.

उपक्रम : 'काकोरी फितूरी' म्हणजे काय? शिक्षकांच्या मार्गदर्शनात या विषयाचा संग्रह करा.

ब्रिटिश सैन्यातून बचाव करून घेण्यासाठी एक लहान पिस्तूल सोबत घेवून एकटेच लढणारे चंद्रशेखर आझाद होय. केवळ एकच गोळी शिल्लक असताना स्वतः च्या कपाळावर गोळी झाडून 'आपण बंदिस्त होणार नाही', ही प्रतिज्ञा त्यांनी पाळली. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, भगवती चरण आणि गयाप्रसाद यारख्या अनेक हुतात्म्यांनी इंग्रजांकडून भारताच्या मुक्तीसाठी स्वतःला समर्पित केले.

भगतसिंग हिंदूस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन संघात प्रवेश करून सेक्रेटरी झाले. 1929 मध्ये भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांनी दिल्लीत केंद्रीय शासन सभेमध्ये बॉम्ब टाकले. या कारणामुळे लाहोर सेंट्रल जेलमध्ये त्या तिघांना फाशी देण्यात आली भगतसिंग 'इन्कलाब ज़िंदाबाद' ची (क्रांती चिरायु होवो.) घोषणा करणारे पहिले भारतीय होते. या क्रांतीकारकांनी एकत्रितपणे राजकीय चेतना वाढवली. तरुणांना त्यांच्याकडून प्रेरणा मिळाली.

परदेशात राहणाऱ्या भारतीयांनाही क्रांतिकारी चळवळींना सुरवात केली. सोहन सिंग भाक्ताने 1913 मध्ये अमेरिकेच्या सॅन फ्रान्सिस्कोमध्ये गदर चळवळीची सुरवात केली.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

मवाळांनी सुरू केलेला काँग्रेस पक्ष हळूहळू लोकप्रिय संघटनेत विकसीत झाला. काँग्रेसच्या संघटनेत हळूहळू वेगवेगळ्या राजकीय घडामोडी होत होत्या. जहाल पंथीयांनी काँग्रेसला टोकाला आणले. इंग्रजानी द्वेष करून ती मोडून काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी राष्ट्रीय संघर्ष कमी करण्यासाठी राजकीय डावपेच आखले. राष्ट्रीय लढयाला हा तात्पुरता धक्का होता. पण तो पूर्णपणे थांबु शकला नाही. 1919 नंतर गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने नवा मार्ग स्विकारला.

गांधी युग (1919-1947)

महात्मा गांधी

आधुनिक जगाला मोहनदास करमचंद गांधी इतके प्रसिद्ध कोणीही भारतीय व्यक्ती कदाचित नाही. अहिंसा आणि शांततापूर्ण आंदोलन ही गांधीजींची शस्त्रे होती. त्यांनी स्वातंत्र्य लढयाचे लोक चळवळीत रूपांतर केले. साधेपणा, चांगुलपणा आणि सत्य हे त्यांच्या यशाचे बलस्थान होते. स्त्रियांसह सर्व सामाजिक वर्गाना स्वातंत्र्यचळवळीत सहभागी होण्याची प्रेरणा देणारी ही मुख्य शस्त्रे होती.

प्रारंभिक जीवन : गांधीजींचा जन्म 2 आक्टोबर 1869 रोजी पोरबंदर येथे झाला. ते करमचंद गांधी आणि पुतळीबाई यांचे पुत्र होते. त्यांचे वडील पोरबंदर आणि राजकोटचे दिवाण (मुख्यमंत्री) होते. त्यांची आई खूप धार्मिक, आस्तीक होती. गांधीजींची नैतिक मूल्ये आणि बांधिलकी त्यांच्या आईकडून आली.

महात्मा गांधीजींच्या आपण प्रेमाने 'बापूजी' म्हणतो. आपल्या स्वातंत्र्य लढ्यातील ते एक महान नेते होते. शोषण, अस्पृश्यता निर्मूलन आणि हिंदू-मुस्लिम सलोख्यासाठी त्यांनी स्वत:ला पूर्णपणे समर्पित केले. स्वातंत्र्य चळवळीतील (1919-1947) त्यांच्या नेतृत्वाच्या कालखंडाला 'गांधीयुग' म्हणतात. गांधीजींच्या जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या काही कृती; 'भगवद्गीता' जॉन रस्कीन यांचा 'अनटू दी लास्ट', टॉलस्टायचे 'तुझा अंतरात्मा हेच देवाचे राज्य' (द किंगडम ऑफ गॉड लाईज विदिन यू) आणि 'सत्य हरिश्चंद्र' नाटक.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

दक्षिण आफ्रिकेमध्ये गांधीजी

गांधीजीचे प्रारंभिक शिक्षण पोरबंदर येथे झाले. उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. त्यांनी ब्रिटनमध्ये कायद्याची पदवी घेतली. 1891 मध्ये भारतात परतले आणि राजकोट आणि मुंबई येथे वकिलीला सुरवात केली. सुरवातीच्या काळात ते वकिली व्यवसायात गुंतले. काही काळानंतर दादा अब्दुल्ला नावाच्या कंपनीच्या निमंत्रणावरून ते कायदे सल्लागार म्हणून दक्षिण आफ्रिकेत गेले. तेथे त्यांनी सत्याग्रह आणि अहिंसेचा वापर करुन भारतीयांवरील अन्यायाविरुध्द लढा दिला. दक्षिण आफ्रिकेतील हे प्रयोग आणि त्यांना मिळालेले यश यामुळे गांधीजींच्या व्यक्तीमत्वामध्ये विशेष फरक पडला. आज गांधीजींची संघर्षशैली 'गांधीगिरी' या नावाने प्रसिद्ध आहे.

गांधीजी दक्षिण आफ्रिकेत असताना तिथे रहाणारे भारतीयांचे हीन दर्जाचे जीवन पाहून त्यांना धक्काच बसला. गोऱ्या सरकारची जातीयतेची नीती पाहून गांधीजींनी त्यांचा विरोध केला. सत्याग्रह आणि अहिंसेच्या माध्यमातून सरकारची जातीय नीती बदलण्यात त्यांना बऱ्यापैकी यश मिळाले.

सत्याग्रह सिद्धांत हा दोन संस्कृत शब्दांनी बनला आहे. सत्य म्हणजे वास्तविक संगत व 'आग्रह' म्हणजेच 'सत्यासाठी दृढपण उभे राहा'.

उपक्रम : गांधीजीनी दक्षिण आफ्रिकेमध्ये चालविलेल्या सत्याग्रह आणि अहिंसात्मक चळवळीबाबत अधिक माहिती मिळवून संग्रहीत करा.

1915 साली गांधीजी भारतात परतले वत्यांनी अहमदाबाद येथे साबरमती आश्रमाची स्थापना केली (1916). त्यांनी त्यांचे राजकीय गुरू गोपाळ कृष्ण गोखले यांच्या मार्गदर्शनानुसार संपूर्ण भारतात प्रवास करून जनतेची शोचनीय स्थिती पाहिली. हा त्यांचा पहिला सामाजिक अनुभव होता. त्यानंतर गांधीजी भारतीय समाजाची वास्तव परिस्थिती समजून घेवू लागले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सुरुवातीचे राजकीय जीवन

स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात 1919 हे वर्ष महत्वाचा टप्पा ठरले. हे वर्ष गांधीजीचे भारताच्या राजकीय जीवनात प्रवेश करण्यासाठीचे पहिले पाऊल ठरले. ब्रिटिशाना शारिरीक बळाचा वापर करून हाकलून लावणे शक्य नाही, हे गांधीजीनी मनोमनी ओळखले. 1919 मध्ये गांधीजींनी रौलेट ॲक्ट आणि जालीयनवाला बागेतील घोर हिंसात्मक कृत्याविरुद्ध चळवळ सुरू केली. त्याशिवाय खिलाफत चळवळीचे नायकत्व स्वीकारले. या चळवळीच्या माध्यमातून हिंदू आणि मुस्लीम यांच्यात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

खिलाफत चळवळ म्हणजे काय ?

तुर्कीचे साम्राज्य खलिफाच्या अंमलाखाली होते. खलिफा हा सर्व मुस्लिमांचा धर्मगुरू आहे, यावर अनेक मुस्लिमांचा विश्वास होता. पहिल्या महायुध्दाच्या प्रसंगी तुर्की ब्रिटिशांच्या विरुद्ध उभे राहिले आणि या युद्धात त्यांचा पराभव झाला. तुर्कस्थानचे भाग पाडले व अरेबिया, जार्डन, इराक इत्यादी स्वतंत्र राज्ये निर्माण झाली. 1919 मध्ये कमाल पाशा नावाचा नेता गादीवर आला. याला प्रत्युत्तर देत भारतीय मुस्लिमांनी खलिफाला सहकार्य करून ब्रिटिशांच्याविरुद्ध आंदोलन सुरू केले, यालाच खिलाफत चळवळ म्हणतात. गांधीजींनी चळवळीचे नेतृत्व केले. मोहम्मद अली आणि शौकत अली (अली बंधू) हे या चळवळीचे प्रमुख नेते होते.

NOT TO BE REPUBLISHED © MTRS

असहकार चळवळ (1920-22)

गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकार चळवळ 1920 मध्ये सुरू झाली. त्यांनी सरकारला असहकार करण्याच्या चळवळीबरोबर स्वराज्याच्या मागणीसाठी दबावही सुरू ठेवला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने न्यायालय, शैक्षणिक संस्था, कायदे मंडळाच्या निवडणूका आणि ब्रिटिशांच्या वस्तूवर बहिष्कार घातला. सरकारने दिलेल्या पदव्या व बहुमान सरकारला परत केले. स्वातंत्र्य चळवळ मोठ्या प्रमाणात चालविण्यासाठी गांधीजींनी योजना आखली. या कार्यक्रमात विशेष म्हणजे कताई आणि विणकाम, अस्पृश्यता निवारण, तसेच हिंदू-मुस्लीम एकोपा यावर भर दिला.

या काळातील प्रमुख नेत्यापैकी एक म्हणजे सी. आर. दास, मोतीलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि सुभाषचंद्र बोस यांनी चळवळीत प्रवेश केला. त्यांच्या अहिंसात्मक आणि सत्याग्रहाच्या धोरणामुळे समाजातील सर्व स्तरातील लोकांनी चळवळीमध्ये भाग घेतला. या चळवळीत विद्यार्थी, शेतकरी, महिलानी भाग घेतला. भारतीयांसाठी हा नवा अनुभव होता. रविंद्रनाथ टागोर यानी आपली नाईटहूड आणि गांधीजीनी आपली 'केसर-ए-हिंद' या पदव्या ब्रिटीश सरकारला परत केल्या. त्याच वेळी सरकारने आंदोलन रोखण्यासाठी दडपशाहीचा अवलंब केला. त्यावेळी उत्तर प्रदेशातील चौरीचौरामध्ये चिडलेल्या लोकांनी हिंसाकृती करून तेथील 22 पोलिसांना जिवंत जाळले (1922). गांधीजींनी या घटनेला अत्यंत गंभीर दृष्टीने पाहिले. आपल्या अहिंसा सिद्धांताच्या विरुद्ध वर्तणूक करणाऱ्या लोकांना पाहून अनिवार्यतेने असहकार चळवळ बंद केली.

माझे सत्याचे प्रयोग, हिंद स्वराज्य, द आफ्रिकीतील सत्याग्रह या साहित्यकृती गांधीनी लिहिल्या. 'हरिजन' व यंग इंडिया ही वृत्तपत्रे संपादीत केली.

असहकार चळवळ सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यात अयशस्वी ठरली असली तरी, ती एक सामान्य पहिली बंडखोरी होती. त्यामुळे राष्ट्रीय भावना भारतभर पोहोचल्या. 1924 ते 1929 पर्यंत रचनात्मक कार्यक्रम आरंभून खादीचे कपडे लोकप्रिय करण्यासाठी आणि हरिजनांच्या उद्धारासाठी स्वत:ला समर्पित केले. स्वातंत्र्यवादी सी. आर. दास आणि मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आंदोलन पुढे चालू ठेवले.

NOT TO BE REPUBLISHED © KSBS

मोतीलाल नेहरू अहवाल(1927)

ब्रिटिश सरकारने भारतीयांना, सर्व पक्षांना मान्य होईल, असे संविधान तयार करण्याचे आवाहन दिले. भारतीय पक्षांच्या आखिल भारतीय परिषदेत मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. समितीने इंग्रजांना चकित करण्यासाठी राज्यघटना तयार



मोतीलाल नेहरू

केली. परंतू ब्रिटीशांनी या संविधानाचा अहवाल फेटाळून लावला त्यामुळे समिती ने आपले अंतिम ध्येय म्हणून संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्याचा ठराव केला.

सायमन कमिशन आयोग (1928)

असहकार चळवळ तुटल्याने राजकीय संघर्षाची चमक तात्पुरती हरवली. ब्रिटिश सरकारने सायमन शिष्टमंडळला 1919 च्या सुधारणांचा भारतीय प्रदेशामध्ये कशा प्रकारे अंमल करता येईल याचा, अभ्यास करण्यासाठी आणि अहवाल देण्यासाठी भारतात पाठविले (1928). शिष्टमंडळात फक्त इंग्रज सदस्य होते आणि भारतीयांना कोणतेही प्रतिनिधित्व नव्हते.



सायमन परत जा

NOT TO BE REPUBLISHED

भारतीयांनी 'सायमन परत जा' अशी घोषणा देत आयोगावर बहिष्कार टाकला. लाहोरमध्ये चाललेल्या जन आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले. या प्रसंगातील झालेल्या पोलिसांच्या हल्यात गंभीर जखमी झालेले लाला लजपतराय बरे होऊ शकले नाहीत. त्यातच त्यांचा मृत्यु झाला. त्यांच्या बलिदानाने लोकांची मने तीव्र दुखावली.

इंग्रजाना भारतातून हाकलून देण्याचे लाला लजपतराय याचे भाकित असे होते, "माझ्यावरील लाठी प्रहार हे एक दिवस ब्रिटीशांच्या शवपेटीवरील खिळे होतील."

संपूर्ण स्वराज्य (1929)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये युवापिढीचे प्रतिनिधीत्व करणारे जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस यांनी नेहरु अहवालात नमूद केल्या गेलेल्या अटी ब्रिटीशांनी मान्य केल्या नाहीत. त्याचा परिणाम असा झाला की, 1929 मध्ये लाहोरमध्ये झालेल्या अधिवेशनात 'संपूर्ण स्वराज्याची' घोषणा करण्यात आली. 26 जानेवारी 1930 रोजी 'संपूर्ण स्वराज्य दिन' म्हणून साजरा करण्याचा ठराव या अधिवेशनात करण्यात आला. हा ऐतिहासिक प्रसंग व या दिनाची आठवण राहावी म्हणून स्वतंत्र भारताचे संविधान याच दिवशी म्हणजे 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आणले. तेव्हापासून प्रत्येकवर्षी हा दिवस 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा केला जातो.

नागरी कायदेभंगाची चळवळ



दांडी यात्रा

नागरी कायदेभंगाची चळवळ 12 मार्च 1930 रोजी गांधीजींनी प्रसिद्ध दांडी यात्रेपासून सुरू केली. आपल्या 78 अनुयायांसह गांधीजींनी साबरमती आश्रमापासून गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावरील दांडी या गावापर्यंत सुमारे 375 किमी दूरपर्यत आरंभिली. लोकांकडून मीठ तयार करून मीठाचा कायदा मोडण्याचा उद्देश होता.

कायदेभंग चळवळीची वार्ता अत्यंत वेगाने भारतभर पसरली. सर्वत्र हरताळ, विदेशी मालावर बहिष्कार, खादी कपड्याचा प्रचार, मद्य दुकानासमोर तीव्र विरोध, अरण्य सत्याग्रह, कर भरण्यास विरोध इत्यादीमध्ये लोकांनी भाग घेतला. अंकोल्यातील मीठाचा सत्याग्रहाचा दाखला भारतात प्रसिद्ध आहे.

याच वेळी वायव्य भारतातील 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांनी 'खुदायी खिद्मतगार' (देवाचे सेवक) ही संघटना स्थापन केली. नागालँडमध्ये 13 वर्षाची मुलगी 'राणी गायदिन्ल्यू' हिने ब्रिटिशांविरुध्द बंड पुकारले. अशा तऱ्हेने भारतीयांना काही राजकीय सवलती मिळवून देण्यासाठी हे सर्व नेते पुढे आले.

गोलमेज परिषद (1930-1932)

दांडीयात्रेनंतर ब्रिटीश सरकारने तीन गोलमेज परिषदा लंडन येथे आयोजित केल्या. काँग्रेस तसेच गांधीजींनी दुसऱ्या गोलमेज परिषदेत भाग घेतला. या परिषदा भारतीयांच्या राजकीय समस्यांचे निवारण करण्यासाठी अपयशी ठरल्या.

ब्रिटिश सरकारने 1935 मध्ये भारतीयांना सरकारमध्ये जास्त प्रमाणात सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने 'भारत सरकार कायदा' अंमलात आणला.

भारत छोडो आंदोलन (1942)

क्रिप्स कमिशनच्या अपयशाने भारतीयांची खळबळ उडाली. 8 ऑगष्ट 1942 रोजी गांधीजीनी मुंबईत काँग्रेसची सभा बोलावली. या सभेत 'ब्रिटिशांनो भारत सोडून जा' (छोडो भारत) असा ठराव संमत करण्यात आला. गांधीजीनी 'करा किंवा मरा' असे आवाहन भारतीयांना दिले. सरकारने दुसऱ्या दिवशी गांधी आणि इतर नेत्यांना अटक केली.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED




छोडो भारत चळवळ

राष्ट्रीय नेत्यांच्या अटकेची बातमी वाऱ्यासारखी देशभरात पसरली. शाळा, कॉलेज व कारखान्यात ब्रिटीश सरकार विरुद्ध संप सुरू झाले. विरोधात्मक घटना चालू झाल्या. पोलीस ठाण्यांवर, टपाल कचेऱ्यांवर, रेल्वे स्थानकांवर विविध ठिकाणी आक्रमणे सुरू झाली. विद्यार्थ्यांनी, कामगारांनी आणि शेतकऱ्यानी बंडाळी माजवली.

उत्तर प्रदेशातील बालिया, बंगालमधील ताम्लक आणि मुंबई अधिपत्याखालील साताऱ्यासहीत देशाच्या विविध भागात क्रांतीकारकांनी 'पर्याय सरकारांची' (प्रतिसरकार) स्थापना केली. याच संदर्भात कर्नाटकाच्या शिवमोगा जिल्ह्यातील ईसूरू गावाने सर्वप्रथम स्वातंत्र्याची घोषणा केली.


'छोडो भारत चळवळ' सुद्धा राजकीय संदर्भातील उद्देश सफल करण्यात अयशस्वी झाली. पण भारतीय जनतेने स्वतंत्र होण्याचा दृढ निर्णय घेतलेला आहे हे स्पष्ट झाले होते. हे गांधीयुगातील सर्वात मोठे लोकांचे आंदोलन होते.

गांधीजींबाबत आईनस्टाईन यांचे मत : 'रक्तमासाने निर्मित अशी एक व्यक्ती या जमिनीवर जीवित होती. यावर विश्वास ठेवण्यास पुढील पिढींना आश्चर्य वाटेल'

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

समाजवादी


1930 च्या दशकात काँग्रेसमध्ये समाजवादी विचारांचा प्रचार झाला. 1934 मध्ये काँग्रेस अधिवेशनात समाजवादी गट काँग्रेसमध्ये स्पष्टपणे दिसून आला. समाजवादी नेते हे बहुतेक नव्या पिढीतील होते. त्यांनी अल्पकाळात 'काँग्रेस सोशालिस्ट पक्षा'ची स्थापना केली. त्याचे महाकार्यदर्शी जयप्रकाश नारायण हे होते. आचार्य नरेंद्र देव हे पक्षातील आणखी एक प्रमुख नेते होते. काँग्रेसमध्ये असलेल्या समाजवादींमध्ये प्रसिद्ध नेते म्हणजे जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस हे होते. नेहरूंनी स्वतः एक समाजवादी अशी ओळख दिली. ते तात्वीकपणे गांधीजीच्या बरोबर होते.



जवाहरलाल नेहरू



जयप्रकाश नारायण



आचार्य नरेंद्र देव

© NCERT NOT TO BE REPUBLISHED

समाजवाद्यांनी अनेक शेतकरी आणि कामगार संघटना तयार करून भारतीय समाजातील दुर्बल वर्गाच्या अभिवृद्धीसाठी प्रयत्न केले. जयप्रकाश नारायण, समाजवादी राममनोहर लोहिया, अरुणा असफ अली इत्यादी समाजवादी नेत्यांनी 'भारत छोडो' आंदोलनात महत्वाची भूमिका निभावली व ते जनप्रिय नायक म्हणून पुढे आले.

जयप्रकाश नारायण (जे.पी.)

जयप्रकाश नारायण यांचा जन्म 1902 मध्ये बिहार राज्यात झाला. उच्चशिक्षणासाठी त्यांनी अमेरिकेत विविध विश्वविद्यालयांमध्ये सात वर्षे घालविली.

तेथे अध्ययन करत असताना त्यांना समाजवादाचा परिचय झाला. त्यांनी भारतात परत आल्यानंतर जवाहरलाल नेहरू यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्षात प्रवेश केला. 1934 मध्ये त्यांनी 'काँग्रेस समाजवादी पक्ष' स्थापन केला. 1941 मध्ये त्यांना अटक करण्यात आली. पण हजारीबाग कारागृहातून फरार होवून ते भूमि गत झाले भूमीगत राहूनच त्यांनी 'छोडो भारत' या चळवळीला पाठिंबा दिला. त्यानंतर वेष पालटून भारतभर प्रवास केला. त्यांना 1944 मध्ये पुन्हा अटक करून सरकारने लाहोर किल्ल्यात बंदिस्त ठेवले. नंतर तेथून त्यांची सुटका झाली.

स्वातंत्र्यानंतर त्यांनी विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत भाग घेतला. 1970 च्या दशकात भारताच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात कायापालट घडून आला. 1975 साली आणिबाणीच्या काळात भारतीचा राजकीय नकाशा बदलला. भ्रष्टाचार हा विषय त्या काळात मोठ्या प्रमाणात चर्चेला आला. 1974 साली सक्रीय राजकारणात प्रवेश केलेल्या जयप्रकाश नारायण यांनी 'संपूर्ण क्रांती' नावाचे आंदोलन छेडले. या चळवळीमुळे 1977 मध्ये जनता पक्ष अधिकारावर आला. आंतरिक संघर्षामुळे जनता पक्षात फूट पडून त्याचे दोन भाग झाल्याने भ्रमनिरास झाला. 1979 मध्ये त्यांचे निधन झाले. लोकानी त्यांना प्रेमाने 'लोकनायक' असे संबोधले.

आदिवासी आणि शेतकरी चळवळी

आदिवासी हे प्रारंभीचे शेतकरी होते. त्यांनी शेती व्यवसायातील समस्यांना तोंड देत आपले आंदोलन छेडले होते. त्यांच्या आंदोलनांना शेतकरी सत्याग्रहाचा प्रमुख भाग म्हणून पाहिले जाते. ब्रिटिश सत्तेत शेतकरीवर्ग हीन स्थितीत पोहचला शेतकरी सरकार, जमीनदार, दलाल, स्थळीय व्यापारी आणि अधिकारी यांच्या शोषणाला बळी पडले. त्यांची बिघडलेली अवस्था त्यांना सरकार आणि जमीनदारांच्या विरोधात पेटून उठण्यास प्रेरणा ठरली.

प्रथम ब्रिटिशांच्या विरोधात थांबून न डगमगता वीरत्वाने लढा देणारे पहिले योध्दे म्हणजे भारतातील आदिवासी लोक होत. ब्रिटिश अधिकारी मात्र त्यांचे

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

शत्रू नव्हते. स्थानिक जमिनदार, श्रीमंत, ठेकेदार, ख्रिस्ती मिशनरी असे बाहेरून त्यांच्या प्रदेशात जाऊन त्यांचे शोषण करणारे सर्व वर्गातील लोक त्याचे शत्रूच होते. भीषण रक्तपात हे आदिवासींच्या दंग्याचे मुख्य लक्षण होते. प्रमुख दंगेखोर आदिवासी समुदाय म्हणजे कोल, संतल, मुंड आणि नागा हे होत. आदिवासी समुदायामुळेच त्यांच्या नायकत्वाचे जडणघडण झाले. त्या चळवळींना विशेष लक्षणे होती.

19 व्या शतकात शेतकऱ्यांनी विरोध आणि दंग्याच्या स्वरुपात आपला आक्रोश व्यक्त केला. 20 व्या शतकात त्यानी राजकीय शक्तीचा पाठिंबा मिळवून शेवटी राष्ट्रीय चळवळीतून आपली शक्ती वृद्धींगत करून घेतली.

काही प्रमुख शेतकरी आंदोलने म्हणजे चंपारण, खेड (कैर), बर्दोली, बंगालमधील नीळ पिकवणाऱ्यांची चळवळ आणि मापिळ्ळे यांचे दंगे हे होत. आता आपण निवडक तीन आंदोलनांबाबत समजून घेऊ.

चंपारण, खेड आणि मापिळ्ळे आंदोलने

चंपारण : चंपारण (बिहार) येथील शेतकरी व मळेवाले यांच्यातील असमाधान, विरोध आणि दंगलीना दीर्घ इतिहास आहे. मळेवाले सक्तीने नीळ पिकविण्यासाठी बळजबरी करत असत. गांधीजींनी त्यांच्या विरुद्ध 1917 मध्ये चंपारण सत्याग्रह सुरु केला. अखेर शेतकऱ्यांची समस्या निवारण झाल्याचे दिसून आले. या चळवळीद्वारे बाबू राजेंद्र प्रसाद हे प्रमुख नेते म्हणून उदयास आले.

खेडा शेतकरी आंदोलन : खेडा हा गुजरात राज्यातील प्रमुख जिल्हा होता. 1918 मध्ये पिकांचे नुकसान होवून शेतकरी आर्थिकदृष्ट्या संकटात पडले. या संदर्भात त्यांनी महसूल भरणे रद्द करावे यासाठी सरकारला विनंती केली. सरकारने ही मागणी फेटाळली. शिवाय महसूल भरणा करण्यासाठी दबाव आणला याचा परिणाम म्हणून खेडा येथे शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू झाले. गांधीजीनी या आंदोलनास संपूर्ण पाठिंबा दिला आणि शेतकऱ्यांनी महसूल भरू नये असे सांगितले. शेवटी सरकारने आपला निर्णय बदलला व ज्यांना महसूल भरणे साध्य

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

आहे त्यांनी महसूल भरावा असे जाहीर केले. हे गांधीजीनी मान्य करून चळवळ मागे घेण्याचे मान्य केले. या आंदोलनाच्या सहाय्याने सरदार वल्लभभाई पटेल राजकीय नेत्यांमध्ये सामील झाले.

मापिळळे दंगा : 1921 मध्ये मलबार येथे घडलेला मापिळळे शेतकऱ्यांचा दंगा प्रसिद्ध आहे. मलबार प्रदेशातील मुसलमानांना मापिळळे (मोप्लास) असे संबोधत असत. ते प्रामुख्याने शेतीशिवाय चहा आणि कॉफीच्या मळ्यातील कामगार होते कृषी कामात गुंतलेले काही लोक महसूलदार होते. अनेकवेळा वाढविण्यात येणारे महसूल हे दंग्यांचे मुख्य कारण होते. 19 व्या शतकातच त्यांनी अनेकवेळा विरोध दर्शविला होता. पण, खिलाफत चळवळीने मापिळळे यांच्यात नवीन उत्साह निर्माण केला. स्थानिक मापिळळे पुढाऱ्यांनी आंदोलनात पुढाकार घेतला होता. त्यांनी जामिनदारांच्या विरोधात हिंसात्मक दंगे करून त्यांच्या संपतीचा नाश केला. ती हिंसा रोखण्यासाठी ब्रिटिशांनी दक्षिण मलबार येथे सेनाशासन लागू केले. चळवळीने अल्पकाळातच जात धर्म आधारीत चळवळीचे रूप घेतले आणि कालांतराने त्याची तीव्रता कमी होत गेली.

महिला स्वातंत्र्य सेनानी

राणी अब्बक्कादेवी

गांधीपूर्व स्वातंत्र्य चळवळीत कित्तूर राणी चन्नम्मा, केळदी चन्नमांच्या पक्तीत असणारी आणखी एक महिला म्हणजे राणी अब्बक्कदेवी होय. या चौट वंशातील होत्या. त्याचे लहान काका **तिरुमलराय** यानी अब्बक्कादेवीना युद्ध कौशल्याचे प्रशिक्षण देऊन उल्लाळची राणी म्हणून अधिकारावर आणले. अब्बकांचा विवाह मंगलूरुमधील **भंग** प्रांताच्या लक्ष्मण राजाबरोबर झाला. परंतु त्यांचे वैवाहिक जीवन फार काळ चालले नाही. त्या उल्लाळला परत आल्या. पोर्तुगीजानी अब्बक्काला राज्य देण्यासाठी दबाव आणला पण त्यानी त्याला विरोध केला. याचा परिणाम म्हणजे 1555


राणी अब्बक्कादेवी

@KSEBC NOT TO BE REPUBLISHED

मध्ये पोर्तुगीजानी राणी अब्बक्का देवी बरोबर युद्ध पुकारले. या युद्धात अब्बक्का विजयी झाल्या. नंतर 1568 मध्ये पोर्तुगीजांचे व्हासईराय अंटोनी योमोरह यांच्या नेतृत्वाखाली उल्लाळमध्ये प्रवेश केला. राणी तेथून निसटून 200 सैनिकांच्या सहाय्याने पोर्तुगीज सैन्यावर आक्रमण केले. जनरल पेस्केटो या युद्धात मारला गेला. पोर्तुगीज सैनिकाना बंदी बनवण्यात आले. पुढे झालेल्या आणखी एका युद्धात पोर्तुगीज ॲडमिरल **मास्कारेन्स** उल्लाळच्या सैन्याकडून मारला गेला. राणी अब्बकाने पोर्तुगीजाना मंगळूरु किल्ला सोडून जाण्यासाठी दबाब आणला. परंतु पोर्तुगीजानी पुनःपुन्हा उल्लाळच्या संपत्तीच्या लालसेपोटी युद्ध करतच राहिले. 1570 मध्ये विजापूरचा सुलतान आणि कल्लीकोटचा झामोरीयन यांच्यात मैत्रीचा करार झाला. झामोरीयन राजाचा सेनापती **कुल्पीपुकर मार्ककर** याने अब्बक्का यांच्या वतीने युद्ध केले व मंगळूरु किल्ला जिंकून घेऊन परत जात असताना पोर्तुगीजानी ठार केले. अब्बक्का यांचे पती लक्ष्मण यांच्या सहाय्याने पोर्तुगीजानी अब्बक्कादेवीचा पराभव केला व कारागृहात पाठविले. या कारागृहातच मरण पावल्या.

राणी अब्बक्का यांच्या स्मरणार्थ मंगलूरु जवळ उल्लाळ येथे 'वीरराणी अब्बक्का उत्सव' साजरा करतात. साहसी कार्य केलेल्या महीलांना वीरराणी अब्बक्का पुरस्कार देतात. तसेच 15-1-2003 रोजी राणी अब्बक्काचे चित्र असलेले टपाल तिकिट भारत डाक विभागामार्फत जारी करण्यात आले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

बळ्ळारी सिद्दम्मा (1903-1981)

यांचा जन्म आताच्या हावेरी जिल्हयातील दुंडसी गावातील संप्रदायस्य याच्या कुटुंबात 1903 मध्ये झाला. त्यांच्या वडीलांचे नाव **कोट्टेगे बसटप्प** होते. ते व्यापारी होते. त्याना स्वातंत्र्य चळवळीबद्धल अपार उत्साह होता. त्यांचे वडील त्या काळातील दैनंदिन व नियतकालीके घेत. त्यामधील लेख वाचून त्यांच्यात राष्ट्रीयतेची विचारधारा निर्माण झाली. स्वातंत्र्य चळवळीकार बळ्ळारी मुरुगप्पाशी विवाह झाल्यामुळे त्यानी स्वातंत्र्य चळवळीत पूर्णपणे भाग घेतला. 1930 व्या दशकात जुन्या मैसुरू संस्थानामध्ये स्वातंत्र्य चळवळ प्रखरपणे चालू होती. तेव्हा एस. निजलिंगप्पा, टी. सिद्दलिंगय्या, सरदार विरण्ण गौडा इत्यादी स्वातंत्र्य चळवळीकार अग्रभागी होते.

बळ्ळारी सिद्दम्माने 1938 मध्ये भरलेल्या शिपूर काँग्रेस अधिवेशनात भाग घेतला. दिनांक 13-4-1938 रोजी ध्वजारोहन करुन एक महिना कालावधी कारागृह शिक्षा भोगली. संस्थानाच्या ध्वजारोहन कार्यक्रमात भाग घेतलेल्या प्रथम महिला अशी किर्ती मिळविली. संस्थानाच्या पत्रिकांमध्ये सिद्दम्माना स्वातंत्र्य चळवळीतील बंदीवासाची प्रशंसा केली. कारागृहातून मुक्त झाल्या नंतर सिद्दम्मा पूर्णपणे स्वातंत्र्य चळवळीत क्रियाशील राहिली. नंतर 1939 मध्ये चित्रदूर्ग अरण्य सत्याग्रहात भाग घेतला. दावणगेरे तालुक्यातील अनगोडू आणि मायकोंड अरण्य प्रदेशातील झाडांना वाचविण्याच्या चळवळीत भाग घेऊन कारागृह शिक्षा भोगली. नंतर 1942 मध्ये **भारत छोडो** चळवळीत भाग घेतला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मैसूरु संस्थान भारतात समावेश करण्याचा निर्णय घ्यावा म्हणून 1947 साली राजवाड्यात सत्याग्रह किंवा मैसूरु चलो सत्याग्रह प्रारंभ झाला. या चळवळीत बळ्ळारी सिद्दम्माने भाग घेतला. या चळवळीनंतर मैसूरु राज्याचा भारताच्या एकसंघ राज्यात समावेश केला. यामुळे ऑक्टोबर 1947 मध्ये के.सी.रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार आस्तित्वात आले. स्वातंत्र्यानंतर दावणगेरे तालुक्यातील संसद सदस्य म्हणून सेवा बजावली. ग्रामीण गरीब महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी मातृ मंदिरे स्थापन करून त्याना नवीन प्रकाश दिला. त्यांच्या या सेवा कार्याला राज्य सरकारने ताम्रपट देऊन गौरविले. याप्रमाणे बळ्ळारी सिद्दम्माने मैसुरु स्वातंत्र्य चळवळीत सक्रियपणे भाग घेऊन महिलांचा गौरव वाढविला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कमलादेवी चट्टोपाध्याय (1903-1988)

कमलादेवी चट्टोपाध्याय यांचा जन्म 3 एप्रिल 1903 रोजी मंगळूरु येथील श्रीमंत कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव धारेश्वर अनंतराय व आईचे नाव गिरीजाबाई होय. वडील ब्रिटिश वसाहत व्यवस्थेत उच्च अधिकारी होते. कमलादेवीचे शिक्षण कॅथॉलिक कॉन्व्हेंट व सेंट मेरी शाळेत झाले. त्यांचा वयाच्या 14 व्या वर्षी विवाह झाला. परंतु अल्पकाळातच त्या विधवा झाल्या. नोकरीत असलेल्या वडीलांची बदली मद्रासला झाली तेव्हा त्यानी



कमलादेवी चट्टोपाध्याय

पुढील शिक्षण घेतले. पुढे इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकनॉमिक्स येथून पदवी मिळवून भारतात येऊन समाज सुधारण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी कवी, साहित्यिक, रंगकलाकार हरींद्रनाथ चट्टोपाध्याय यांच्याशी परिचय झाला. नंतर त्यांच्याशी पूनर्विवाह करून कमलादेवी चट्टोपाध्याय झाल्या.

कमलादेवी या राष्ट्रीय राजकारणात ओळखल्या जाणाऱ्या कर्नाटकातील बहुमुखी प्रतिमेच्या महिला होत. त्यानी गांधीजी व सरोजीनी नायडू यांच्या प्रभावाने असहकार चळवळीत भाग घेतला. संपूर्ण कर्नाटकात प्रवास करून युवा जनतेला स्वातंत्र्य चळवळीत भाग घ्यायला प्रोत्साहित केले. 1929 मध्ये अलाहाबाद शहरात राष्ट्रध्वज धरून घोषणा देत मिरवणूकीत भाग घेऊन ब्रिटिशांचा दबाव झुगारुन दिला. लाहोर काँग्रेस अधिवेशनाच्या निर्णयाप्रमाणे गांधीजीनी 12 मार्च 1930 रोजी आपल्या 78 अनुयायीसह साबरमती आश्रमापासून मिठाच्या सत्याग्रहाला प्रारंभ केला. 5 मे ला दांडी येथे पोहचून 6 मे ला मीठ तयार करून ब्रिटिशांचा मिठाचा कायदा भंग केला. यावेळी देशातील जनतेला मिठाच्या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी आव्हान केले. कमलादेवीने गांधीजीची भेट घेऊन महिलाना मिठाच्या सत्याग्रहात भाग घेण्याची अनुमती मिळवली. कमलादेवी आणि अवंतीबाई गोखले या पहिल्या गटातील महिला म्हणून मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला.

'गांधी मीठ स्वीकारा याची किंमत सहा महिने शिक्षा' असे म्हणत मीठाचा व्यापार करून कैदी म्हणून यरवडा जेलमध्ये शिक्षा भोगली. शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर सुद्धा बाँबेच्या गबाकापूरमध्ये स्वदेशी वस्तू विकल्या. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसच्या सेवादलाच्या महिला गटाची जबाबदारी घेऊन देशांतर्गत प्रवास करून महिला स्वयंसेवकांची संघटना तयार केली. बाँबे व बोरीवलीमध्ये महिला स्वयंसेवक प्रशिक्षिण शिबिर चालविले. सेवादळाच्या या संघटनेवर ब्रिटिशांनी बंदी घालून कमलादेवीना बंदी करून आर्थर रोड जेलमध्ये पाठविले. तेथे मीरा बेहन यांचा परिचय झाला. नंतर बेलूरु जेलमध्ये स्थलांतररित केले.

काँग्रेस पक्षात अनेक मतभिन्नता होती. समाजवादाचा प्रभाव असलेले नेहरु, राम मनोहर लोहिया, आचार्य नरेंद्रदेव इत्यादीनी काँग्रेस पक्षात **काँग्रेस सोशियालिस्ट**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पक्ष स्थापन केला. कमलादेवी चट्टोपाध्यायानी 1934 मध्ये या पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले. समाजवाद तत्वांच्या प्रचारासाठी कर्नाटकात सार्वजनिक व्याख्याने देऊन लोकांच्यामध्ये जागृती निर्माण केली. यामुळे अनेक समस्याना तोंड द्यावे लागले. कमलादेवी चटोपाद्याय या केवळ स्वातंत्र्य चळवळीकार न राहता समाज सुधारक, स्त्रिवादी चिंतक, साहित्यिक आणि चलनचित्र नटी म्हणून कार्य केले. त्यानी विविध क्षेत्रात केलेल्या कार्यासाठी 1955 मध्ये पद्मभूषण, 1962 मध्ये वतमूल फौंडेशन प्रशस्ती, 1966 मध्ये रॅमन मॅगसेसे इंटरनॅशनल प्रशस्ती, शांतीभारत देसेटीकोतं प्रशस्ती, सेंट्रल अकादमी प्रशस्ती आणि 1987 मध्ये पद्मविभूषण प्रशस्ती देऊन गौरविण्यात आले. अशी बहुमुखी प्रतिभा असलेल्या कमलादेवी चटोपाद्याय या कर्नाटकाला गौरवाचा विषय आहेत. या 1988 मध्ये मरण पावल्या.

यशोधरम्मा दासप्पा (1905–1980)

यशोधरम्मा यांचा जन्म 28–05–1905 रोजी बेंगळूरु मध्ये झाला. त्यांच्या वडीलांचे नाव रामय्या व आईचे नाव रेवम्मा होते. वडील सुधारणावादी होते. बेंगळूरुमध्ये प्रारंभिक शिक्षण संपवून नंतर मद्रास येथील क्वीन्स मेरी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व तेथून इंटर मेडीएट शिक्षण संपविले. बेंगळूरुला परत आल्यावर राव साहेब चेन्नय्यन यांचा तिसरा मुलगा दासप्पनबरोबर 1926 मध्ये विवाह केला. दासप्पा आणि यशोधरम्मा दासप्पा हे दोघेही समाजसेवक होते. गांधीजीच्या प्रभावामुळे राष्ट्रीय काँग्रेसचे सक्रीय कार्यकर्ते बनले. काही काळ वार्दसेवाग्राममध्ये सेवा करून परत आले. मैसूरु संस्थानाच्या स्वातंत्र्य चळवळीत निरंतर भाग घेऊन स्वातंत्र्यानंतर मैसुरुच्या एकीकरणाचे साक्षीदार बनले.

मैसुरु न्यायविधेयक सभेसाठी झालेल्या निवडणूकीत आपले पती एच.सी. दासप्पानी प्रजा संयुक्त पक्षाचे उमेदवार म्हणून उभे राहिले तरी यशोधरम्मा काँग्रेसच्या सदस्या म्हणून राहिल्या. समाज सेविका म्हणून कार्य करणाऱ्या यशोधरम्मा यानी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन 1938 मध्ये शिवपूरच्या ध्वज सत्याग्रहात भाग घेतला. 1942 च्या भारत छोडो आंदोलनात यशोधरम्मा दासप्पा याचे घर स्वातंत्र्य चळवळीला पुरक

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भूमीगत चळवळीचे केंद्र बनले होते. चळवळीसाठी लेखन करून **ज्वाला** या पत्रिकेमधून प्रसारित केले.

मैसुरु संस्थानातील प्रजा सरकार स्थापनेसाठी 1947 मध्ये मैसुरु चलो चळवळीत यशोधरम्मा दासप्पा यानी लोकांच्या संघटनेसाठी कार्य केले. मैसुरु राजवाड्यासमोर हरताळ घडवून आणला. या चळवळीच्या तिव्रतेनंतर महाराजांचे अधिकार लोकांकडे हस्तांतरित केले गेले. स्वातंत्र्य संस्थानात लोकप्रतिनीधी व लोकसभा सदस्य म्हणून तसेच एस. निजलिंगप्पा मंत्रीमंडळात समाज कल्याण मंत्री म्हणून उत्कृष्ठ कार्य केले. अशा बहुमुखी प्रतिभा लाभलेल्या यशोधरम्मा दासप्पा यांचा कॅन्सरमुळे 1980 साली अंत झाला.

उमाबाई कुंदापूर (1892–1992)

उमाबाई कुंदापूर यांचा जन्म कर्नाटकातील उडूपी जिल्हयातील कुंदापूर येथे 1892 साली झाला. त्यांच्या वडीलांचे नाव गोलीकेरे कृष्णराय व आईचे नाव तुंगाबाई होते. वयाच्या 13 व्या वर्षी स्वातंत्र्य चळवळीत आघाडीवर असलेल्या संजीव राव याच्याशी विवाह झाला. पतीच्या प्रोत्साहनामुळे 1921 नंतर स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. खादीधारक बनून काँग्रेस चळवळीत प्रचार कार्य हाती घेतले. 1923 मध्ये पतीचे निधन झाल्यानंतर त्या हुब्बळ्ळी येथे राहिल्या.


उमाबाई कुंदापूर

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

लोकमान्य टिळक, गांधीजी आणि हर्डिकर यांच्या राष्ट्रीयतेच्या आंदोलनामुळे प्रभावित होऊन मराठी भाषेत **स्वदेशी व्रत** हे नाटक लिहून स्वदेशी तत्वाचे महत्व पटवून दिले. मुंबईमध्ये सारस्वत साहित्यिक समाज आणि भगिनी मंडळ तसेच टिळक शाळेची जबाबदारी सांभाळली. यांनी स्त्रीयांमध्ये स्वदेशी, खादीचा प्रचार, राष्ट्रीय शिक्षणाबद्धल जागृती केली. टिळकांच्या काळात स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला

तसेच गांधीजींच्या नेतृत्वाखाली चळवळीत भाग घेतला. 1923 मध्ये एन.एस. हर्डीकर यांनी स्थापन केलेल्या सेवादलाच्या महिला गटाचे नेतृत्व स्विकारले. 1924 साली झालेल्या बेळगावी काँग्रेस अधिवेशनात महत्वाची भूमिका निभावली. मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. यासाठी चार महिने हिंडलगा व यरवडा जेलमध्ये कारावास भोगला. जेलमधून सुटका झाल्यानंतर अंकोला, शिरसी, सिद्दापूर इत्यादी ठिकाणी सत्याग्रहात भाग घेऊन शिक्षा भोगली. उमाबाई कुंदापूर यानी अनेक निराश्रीत महिलाना आश्रय दिला. अनारोग्याच्या कारणामुळे 1942 मध्ये भारत छोडो आंदोलनात प्रत्यक्ष भाग न घेता भूमिगत चळवळीतील कार्यकर्त्यांना आश्रय देऊन पाठींबा दर्शविला. गांधीजीच्या सल्ल्यानुसार कस्तुरबा निधीची जबाबदारी निभावली व समाज सुधारण्याच्या कार्यात अग्रेसर राहिल्या. अशा निस्वार्थी व्यक्ती असलेल्या भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केलेल्या उमाबाई कुंदापूर या 1992 मध्ये मरण पावल्या.

स्वातंत्र्याकडे वाटचाल

लोकांच्या आंदोलनांनी निर्माण केलेला प्रबळ दबाव आणि दुसऱ्या महायुद्धाचा प्रसंग यामुळे ब्रिटिशांनी भारताच्या समस्येचे लवकरात लवकर निवारण करण्याच्या दृष्टीने विचार केला. याच सुमारास महायुद्धाचा परिणाम होवून ब्रिटिशांचे आर्थिक आणि लष्करी बळ कमी झाले.

दुसऱ्या महायुध्दाच्या अखेरीस (1945) इंग्लडमध्ये मजूर पक्ष अधिकारावर आला व त्याने भारताबरोबर राजकीय करार करण्याच्या दृष्टीने विचार केला. या अंतिम टप्प्यात भारताच्या भविष्याचा विचार करून निर्णायक निर्धार मौलाना अबूल कलाम आझाद, जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल यांनी केला.


भारताकडे अधिकार हस्तांतर करण्यासाठी अनुसरावयाचे मार्ग शोधून काढण्यासाठी ब्रिटिश सरकारने 1946 मध्ये कॅबिनेट आयोगाला भारतात पाठविले. परंतु जीनांच्या नेतृत्वात मुस्लीम लीगने पाकिस्नानाची निर्मिती झालीच पाहिजे,

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

असा आग्रह धरला. अशाप्रकारे भारताची फाळणी करणे अनिवार्य ठरले. 3 जून 1947 रोजी भारताचे 34 वे आणि शेवटचे गव्हर्नर जनरल व व्हाईसराय असलेले लॉर्ड माउंटबॅटन यांनी भारताची फाळणी करून भारताकडे अधिकार हस्तांतरीत करण्यात येईल अशी घोषणा केली.



मोलाना अबूल कलम आझाद



वल्लभभाई पटेल

© RTBS NOT TO BE REPUBLISHED




लॉर्ड माऊंट बॅटन

14 ऑगष्ट 1947 रोजी पाकिस्तान भारतापासून वेगळा झाला. भारत 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री झाले. प्रारंभी व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या दोन शतके राज्य करून भारताला आर्थिक व राजकीयबाबतीत दुर्बल करून ठेवले. भारतीयांनी चालविलेल्या आंदोलनाचा परिणाम अखेर असा झाला की साम्राज्यवाद्यांना भारतातून परत जावे लागले. दीर्घकाळ चाललेल्या या चळवळीचा शेवट झालेला होता. 15 ऑगस्ट 1947 हा दिवस भारताच्या इतिहासातील एक अविस्मरणीय दिवस ठरलेला आहे. भारताच्या कोट्यावधी जनतेच्या मनात हा दिवस राहून गेला आहे. दरवर्षी स्वातंत्र्य चळवळीचा आशय स्मरणात आणण्याचा

दिवस ठरला आहे.

महम्मद अली जिन्ना (1876-1948) आणि मुस्लीम लीग

स्वातंत्र्यपूर्व भारतातील राजकीय घडामोडीत जिन्ना यांनी प्रमुख भूमिका निभावलेली आहे. वृतीने ते वकील आणि उदार राष्ट्रीयवादी होते. सुरुवातीला त्यांचे मुस्लीम लीगसोबत संबंध नव्हते आणि तात्विकरित्या ते त्यांचे विरोधक होते. त्यावेळेत जिन्ना यांची हिंदू- मुसलमान एकतेचे प्रतिपादक अशी परिगणना होती. 1913 साली मुस्लीम लीगचे सदस्यत्व स्वीकारून जिन्ना हे मुसलमान समुदायाचे नेते बनले.



महम्मद अली जिन्ना

1929 मध्ये जिन्ना यांनी 14 अंशाच्या मागण्या पुढे ठेवल्या, यालाच दिल्लीच्या घोषणा असे म्हणतात. या अंशातील विचारानी जातीय राजकारणाला वाव दिला. 1928 मध्ये जिन्ना यांनी केलेल्या '14 अंशाचा दाखला', यातील भाग म्हणून जिन्नांच्या 14 मागण्या सामावून घेण्यात आल्या. हे 14 अंशाचे दाखले म्हणजे मुस्लीम लीगचे जातीय राजकारणाचे सैद्धांतिक मार्गदर्शक होते. 1936 नंतर 'दोन राष्ट्रांचा सिद्धांत' मांडणारे प्रतिपादक ठरले. यांनी केलेले प्रतिपादन 1940 मध्ये मुस्लीम लीगच्या लाहोर अधिवेशनात मान्य करण्यात आले. या पार्श्वभूमीवर पुढील राजकीय घडामोडी भारताला विभागून पाकिस्तानाचा उदय होण्यास कारणीभूत ठरल्या.

चौधरी रहमत अली आणि त्याचे तीन मित्रमंडळी त्यांनी 1933 साली लिहिलेल्या एका पत्रात वेगळ्या मुस्लीम राज्याची रचना करण्याचे प्रस्तापित केले होते. पंजाब, अफगाण, काश्मीर, सिंध आणि बलुचिस्तान या प्रांताच्या नावाच्या पहिल्या इंग्रजी अक्षरांचा वापर करून 'पाकिस्तान' असे संबोधलेले आहे. PAKISTAN नावातील शेवटची तीन अक्षरे बलुचिस्तान प्रांत सुचवितात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

सुभाषचंद्र बोस आणि भारतीय राष्ट्रीय सेवा

स्वातंत्र्याच्या चळवळीत सुभाषचंद्र बोस यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. ते कलकत्ता विश्वविद्यालयातील प्रतिभावंत विद्यार्थी होते. लंडनमध्ये झालेल्या आय. सी. एस. परीक्षेत ते चौथ्या क्रमांकात होते. 'देशबंधू' चित्तरंजन दासांच्या प्रभावामुळे चाललेल्या चळवळीमध्ये आकर्षित होवून सुभाषबाबू राजकीय क्षेत्रात समाविष्ट झाले. खास करून स्वामी विवेकानंदाचे जीवन आणि लेखनातून त्यांनी स्फूर्ती घेतली.



सुभाषचंद्र बोस

सुभाषचंद्रांना गांधीजींचा अपार आदर होता. परंतु त्यांच्या राजनितीस त्यांचा विरोध होता. शेवटी गांधीजींबरोबर सुभाषचंद्रांचे तीव्र मतभेद झाले. 1939 साली काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन ते पक्षातून बाहेर पडले. त्यानंतर त्यांनी 'फॉरवर्ड ब्लॉक' नावाचा नवीन पक्ष संघटीत केला.

याच सुमारास दुसरे महायुद्ध जोमाने सुरु होते (1939 - 1945). ब्रिटिशांनी सुभाषचंद्रांची क्रांतिकारी घोडदौड पाहिली. ते एक धोकादायक नेते आहेत असे समजून, त्याचा त्यांच्याच घरी नजर कैद करण्यात आले. सुभाषचंद्रांनी तेथून रहस्यमय सुटका करून घेतली आणि पेशावर, काबूल (अफगानिस्तान) या मार्गाने मास्को येथे जाण्याचा धाडसी निर्णय घेतला. मास्कोहून विमानाने ते जर्मनीच्या शहरात पोहचले. जर्मनीचा सर्वेसर्वा हिटलरची भेट घेऊन त्याच्या बरोबर एक करार केला ब्रिटिशांना भारतातून हाकलून देण्याची त्यांची महत्वाकांक्षा होती. (तेव्हा जर्मनी विरुद्ध ब्रिटिश दुसऱ्या महायुद्धात गुंतले होते.)

याच काळात जपानने ब्रिटिशांच्या विरूध्द दुसऱ्या महायुध्दात प्रवेश केला. युध्दात ब्रिटिशांच्या सेवेत असलेले सुमारे 40,000 भारतीय सैनिक जपानचे

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

युद्धकैदी झाले होते. त्यांना मोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय सेना (इंडियन नॅशनल आर्मी आय.एन.ए.) किंवा 'आझाद हिंद सेना' या नावाने संघटित करण्यात आले. 1943 मध्ये सुभाषचंद्रानी सिंगापूरला घेऊन आय. एन. ए. चे नेतृत्व स्वीकारले. त्यांना 'नेताजी' या नावाने ओळखले जाऊ लागले. लागलीच सिंगापूर येथे 'स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार' स्थापन केले. जर्मनी, इटली आणि जपान देशांनी त्यांना मान्यता दिली. 'चलो दिल्ली' अशी घोषणा देत नेताजींच्या नेतृत्वाखाली आय.एन.ए. बर्माकडून भारतीय प्रदेशात (आताचे मणीपूर) 150 मैल आत शिरला. तेथे भारतभूमीवर तिरंगी झेंडा फडकविण्यात आला. पण, अत्यल्प काळात ब्रिटिश सेना ब्रह्मदेशाची राजधानी रंगूनला आपल्या ताब्यात घेतल्याने आय. एन. ए.ला माघार घ्यावी लागली. आय.एन.ए. च्या सैनिकांना निशस्त्र करून त्यांना कैदखान्यात ठेवण्यात आले. शत्रूसमोर जपानने शरणागती पत्करल्याने (1945) नेताजी टोकियोला जात असताना तेथे घडलेल्या विमान अपघातात नेताजींचे निधन झाले, असे सांगण्यात येते. पण विमान दुर्घटनेबाबत अनेक विवाद निर्माण झालेले आहेत.

आय. एन. ए. त्या संदर्भात ध्येय गाठण्यात विफल ठरला, हे सत्यच आहे. पण भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत त्याला अनन्यसाधारण महत्व आहे. "तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो" असे आवाहन त्यांनी लोकांना केले. नेताजींच्या अप्रतिम नेतृत्वाची साक्ष म्हणजे आय.एन.ए. होय. कलकत्ता ते मास्को आणि जर्मनी ते जपान हा प्रवास अत्यंत बिकट परिस्थितीत केला, याची नोंद भारतीय इतिहासातील अप्रतिम साहसाचे क्षण अशी केलेली आहे. ब्रिटनचा शत्रू असलेल्यांकडून सहाय्य घेऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे हे सुभाषचंद्राचे एकमेव ध्येय होते. नेताजींनी जनतेला धैर्य, साहस आणि उदात्त देशप्रेमाची उज्वल परंपरा देऊन गेले आहेत.

आय. एन. ए. आपले ध्येय गाठण्यात अपयशी ठरला तरी त्याला इतिहासात महत्वाचे स्थान आहे. नेताजींच्या आंदोलनांनी त्यांना भारतीय इतिहासात अढळ स्थान आणून दिले आहे.

@KSB NOT TO BE REPUBLISHED

आंबेडकर आणि त्यांच्या सुधारणा



डॉ.बी आर आंबेडकर

डॉ. बी. आर. आंबेडकर (1891 - 1956) हे दलित आणि इतर शोषित वर्गाच्या श्रेय आणि अभिवृद्धीसाठी झटणारे महानायक होते. त्यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी मध्यप्रदेशमधील इंदूर जिल्ह्यातील महू गावात झाला. रामजी मालोजी सकपाल आणि भिमाबाई हे त्याचे आई वडिल होय. अत्यंत प्रतिभावंत असलेल्या आंबेडकर यांनी सतत अध्ययनाने स्वतःचे विशेष व्यक्तिमत्व साकारले. त्यांनी आजही प्रतिष्ठित असलेल्या लंडन स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स कोलंबिया विश्वविद्यालयातून (अमेरिका) पीएच्. डी., एल्. एल्. डी. पदव्या मिळविल्या. बार-ॲट्- लॉ पदवीसुद्धा संपादन केली. त्यांनी मिळविलेल्या पदव्याच त्यांच्या अत्युच्च विद्वत्तेच्या व्यक्तीमत्वाची साक्ष देतात. सामाजिक बदल संविधानाच्या मार्गातून मिळवावे हा त्यांचा संकल्प आणि कार्यशीलता हा त्यांचा विशेष गुण होय.

सामाजिक विषमता दूर करण्यासाठी घटनात्मक मार्ग हेच एकमेव साधन आहे, असे त्यांचे मत होते. तसेच दलित आणि शोषितांची मुक्ती त्यांना राजकीय प्रतिनिधित्व मिळेल तेव्हाच होईल, अशी त्यांची भूमिका होती. त्यासाठी त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध अनेक लढे उभारले. त्यापैकी महाड सत्याग्रह, नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश अशा यशस्वी लढ्यात त्यांनी भाग घेतला. अशा प्रकारे त्यांनी दलितांमध्ये जागृती आणि स्वाभिमान निर्माण केला. 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' या मासिकांचे संपादक म्हणून ते दलित, शोषित आणि अस्पृश्यांचा आवाज बनले. त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा नावाची संस्थाही स्थापन केली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED


पुढे स्वतंत्र भारताच्या संविधान रचनेमध्ये मसुदा समितीचे अध्यक्ष बनून घटना निर्माण कार्यात त्यांनी प्रमुख भूमिका निभावली. 'संविधानाचे शिल्पकार' म्हणून ते प्रसिद्ध झाले.

आंबेडकर हे भारतीय राष्ट्रवादाच्या थोड्या वेगळ्या (भिन्न) संकल्पनेचे प्रतिनिधी होते. गांधीजीसाठी राजकीय स्वातंत्र्य ही पहिली प्राथमिकता होती. डॉ आंबेडकर यांना सामाजिक स्वातंत्र्य हीच प्राथमिकता होती. सामाजिकदृष्ट्या लोकशाही व्यवस्थेमध्ये मागासवर्गीयांनी राजकारणात पुढाकार घ्यावा, असे त्यांचे मत होते. यासाठी लक्षावधी निराधार भारतीयांचे प्रतिनिधी ते बनले. ते स्वतः अस्पृश्य जातीचे असल्याने त्यांना सर्व प्रकारचे अपमान आणि सामाजिक बहिष्कार सहन करावा लागला. दलित आणि शोषितांना राजकीय प्रतिनिधित्व मिळाल्यावरच त्यांची मुक्ती होईल, अशी त्यांची धारणा होती.

उपक्रम : बी. आर. आंबेडकरांनी लिहिलेल्या साहित्यकृतींची यादी करा आणि त्यांनी तयार केलेल्या 'हिंदू कोड बिल' ची माहिती संग्रह करा.

डॉ. बी. आर. आंबेडकर दलित वर्गाचे प्रतिनिधी होते. लंडनमधील तिन्ही गोलमेज परिषदांना ते उपस्थित होते. ब्रिटिशांनी घोषित केलेल्या 'कम्युनल अवॉर्ड' (1932) ने दलित वर्गासाठी स्वतंत्र मतदार संघ तयार केला. हा निकाल न स्विकारलेल्या गांधीजींनी येरवडा (पुणे) तुरुंगात उपोषण केले. शेवटी गांधीजी आणि आंबेडकर यांच्यातील पुणे कराराने (1932) ही समस्या संपली. ते स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री होते. 6 डिसेंबर 1956 रोजी त्यांचे निधन झाले. निधनाआधी काही महिन्यांपूर्वी त्यांनी बौद्ध धर्म स्विकारला होता. 1990 मध्ये त्यांना मरणोत्तर भारतरत्न देण्यात आला.

© BOOKS NOT TO BE REPUBLISHED



भारताची फाळणी 1947

मुख्य इसवीसन

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना	: 1885
मवाळांचा काळ	: 1885 - 1905
जहालांचा काळ	: 1905 - 1919
बंगालची फाळणी	: 1905
मुस्लीम लीगची स्थापना	: 1906
सूरत दुफळी	: 1907
जालीयनवाला बाग हत्याकांड	: 1919
गांधीजींचा जन्म	: 2 ऑक्टोबर 1869
असहकार चळवळ	: 1920 - 1922
चौरीचौरा हत्याकांड	: 1922
संपूर्ण स्वराज्याची घोषणा	: 26 जानेवारी 1930
मीठाचा सत्याग्रह	: 12 मार्च 1930
दुसरे महायुद्ध	: 1939 - 1945
भारत छोडो आंदोलन	: 1942
भारताला स्वातंत्र्याची घोषणा	: 1947 जून 3
स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती	: 14 ऑगस्ट 1947
स्वतंत्र भारताची निर्मिती	: 15 ऑगस्ट 1947

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. योग्य शब्दासह रिकाम्या जागा भरा

1. 1938 मध्ये यशोधरम्मानी _____ मध्ये भाग घेतला.
2. स्वदेशी व्रत नाटक _____ यांनी लिहीले.
3. गांधीजींचे राजकीय गुरू _____ होते.
4. चौरीचौरा _____ वर्षात घटना घडली.
5. _____ मध्ये संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा स्विकारण्यात आली
6. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान _____ होते.
7. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ची स्थापना _____.
8. होमरूल चळवळ _____ यानी सुरू केली.
9. भारतीय राष्ट्रीय सेनेचे (आय.एन.ए) नेते _____.
10. संविधान रचना समितीचे अध्यक्ष _____ होते.

II. एका शब्दात किंवा वाक्यात उत्तरे द्या

11. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' हे कोणी सांगितले?
12. स्वातंत्र लढयात गांधीयुगाचा आरंभ केंव्हा झाला?
13. 'फॉरवर्ड ब्लॉक' पक्ष कोणी सुरू केला ?
14. 'तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो' अशी घोषणा कोणी केली?

@KEBS NOT TO BE REPUBLISHED

15. संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष कोण होते?

16. 'भारताचा पोलादी पुरुष' कोणाला म्हणतात ?

III. दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे द्या.

17. उल्लाळच्या रक्षणासाठी पोर्तुगीज विरुद्ध राणी अब्बक्का देवी यांनी केलेला संघर्ष विवरण करा.

18. 'बहुमुखी प्रतीभा असलेल्या कमलादेवी चट्टोपाध्याय या कर्नाटक गौरव आहेत'. स्पष्टीकरण द्या.

19. स्वातंत्र्य चळवळीत उमादेवी कुंदापूर यांनी दिलेले योगदान सांगा.

20. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची कोणतीही दोन उद्दिष्टे लिहा.

21. लाल, बाल आणि पाल या नावाने लोकप्रिय राष्ट्रीय नेते कोण ?

22. जालीयनवाला बाग हत्याकांड केव्हा घडले ? या घटनेला जबाबदार ब्रिटिश पोलीस अधिकारी कोण ?

23. दांडी यात्रेचे महत्व काय ?

24. भारत छोड़ो आंदोलन चळवळीबद्दल माहिती लिहा.

25. प्रमुख आदिवासी आणि शेतकरी चळवळींची नावे सांगा.

टीपा लिहा

26. राष्ट्रीयतेच्या वाढीस हातभार लावणार एक घटक.

27. रौलेट कायदा

28. सुभाषचंद्र बोस

29. डॉ. बी. आर. आंबेडकर

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

उपक्रम:

- दादाभाई नौरोजी आणि बाळ गंगाधर टिळक यांचा जीवन इतिहास वाचा.
- क्रांतीकारकांची चित्रे आणि माहिती गोळा करा आणि एक अल्बम तयार करा.
- खाली दिलेल्या क्रांतीकारकांचा जीवन इतिहास वाचा. त्यांच्याबद्दल एक लेख लिहा आणि नोटीस बोर्डवर लावा: वासुदेव बळवंत फडके, खुदीराम बोस, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, मादाम कामा.
- स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींच्या योगदानाबद्दल चर्चा करा.
- भारताच्या राष्ट्रपती उपराष्ट्रपतींच्या नावांची यादी तयार करा.
- स्वातंत्र्य चळवळीत प्रमुख भुमिका बजावलेल्या स्त्रियांची जीवन चरित्रे वाचा.
- स्वातंत्र्यानंतर कर्नाटकाच्या अभिवृध्दीत महिलांची भुमिका याबाबत भाषण स्पर्धा आयोजित करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 18 कर्नाटकाचे एकीकरण आणि सीमावाद

E9X5H2

पाठाचा परिचय

कर्नाटक प्रदेशाला सुमारे दोन हजार वर्षांचा इतिहास आहे. ऐतिहासिक दृष्ट्या कन्नड लोकांनी वेगवेगळ्या राजकीय व्यवस्थेत जीवन घालविले आहे. विजयनगरच्या साम्राज्याचे पतन झाल्यानंतर कन्नड भाषिकांच्या प्रदेशावर मराठा, पेशवे, बंडखोर, इंग्रज, सुलतान आणि नवाब अशा सुमारे वीसपेक्षा जास्त राजवटींनी राज्यकारभार केला. कन्नड लोकांनी कन्नड भूमीत राहून परकीयतेची भावना अनुभवली. ब्रिटिशांनी केवळ करवसुलीच्या सोयीसाठी कन्नड प्रदेशाची भाषा आणि संस्कृती यांचा विचार न करता विभागणी केली. या पाठात कर्नाटक एकीकरण चळवळीचे टप्पे दाखवून दिले आहेत. एकीकरण करत असताना निर्माण झालेले सीमावाद यांची ओळखसुद्धा या पाठातून होईल.

सामर्थ्ये

1. कर्नाटक एकीकरणाची पार्श्वभूमी आणि चळवळीतील प्रमुख भागांची माहिती समजून घेणे.
2. एकीकरण चळवळीत भाग घेतलेल्या नेत्यांबद्दल माहिती घेणे.
3. 1956 नंतर उद्भवलेल्या सीमा वादांची माहिती करून घेऊन त्यावर उपाययोजनात्मक सूचना देणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

एकीकरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

'कविराजमार्ग' या प्राचीन ग्रंथात कन्नड प्रदेश कावेरी नदीपासून गोदावरी नदीपर्यंत पसरला होता, असे वर्णन केलेले आहे. अनेक कन्नड राजघराण्यांनी या प्रदेशावर राज्य केले होते. परंतु विजयनगर साम्राज्याचा ऱ्हास झाल्यानंतर

कन्नड प्रदेशात अनेक स्थित्यंतरे घडली. राजकीयदृष्ट्या वर्चस्व साधण्यासाठी अनेकांनी कन्नड लोकांना दुय्यम बनविले. टिपूच्या मृत्यूनंतर ब्रिटिशांनी कन्नड भाषेचा प्रदेश वेगवेगळ्या भाषिक, राज्यकर्त्यांच्या स्वाधीन केला. कन्नडिगांनी मराठे, निजाम इत्यादींच्या अधिन राहून परकीय भावनेने अनिवार्य म्हणून जीवन घालविले. अशा कठीण प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी कन्नडिगांनी एक राज्य बनवून एकाच राज्यकारभाराखाली येण्यासाठी आंदोलने केली. यालाच एकीकरण चळवळ म्हणतात.

एकीकरणाचा आराखडा प्रारंभी मुंबई कर्नाटकातील जनतेने तयार केला होता. 1890 मध्ये रा. हा. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झालेल्या 'कर्नाटक विद्या संवर्धक संघा' ने एकीकरणाच्या संकल्पनेला संघटनात्मक स्वरूप दिले. वेंकट रंगो कट्टी सारख्या नेत्यांनी सुरवातीच्या टप्यात एकात्मतेसाठी मोठी सेवा दिली.

उपक्रम : मुंबई कर्नाटक प्रदेशात कन्नड शाळा सुरु करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या डेप्युटी चेन्नबसप्पनवर यांची माहिती संग्रहित करा.

1915 मध्ये सुरू झालेल्या कन्नड साहित्य परिषदेने आणि 1916 मध्ये सुरू झालेल्या कर्नाटक सभेने एकीकरणाची चळवळ पुढे नेली.

1924 च्या बेळगावी येथील काँग्रेस अधिवेशनात हुइलगोळ नारायणराव यांनी 'उदयवागली नम्म चेलुव कन्नडनाडू' हे स्वागतगीत गाऊन एकीकरण चळवळीला चालना दिली. काँग्रेस संमेलनाचे अध्यक्ष असलेल्या गांधीजींनीसुद्धा एकीकरणाला आपला पाठिंबा दिला. स्वातंत्र्य चळवळीबरोबरच एकीकरणाची चळवळ पुढे जाऊन त्याला पूरक ठरली.

उपक्रम : 1. एकीकरणासाठी प्रयत्न करणाऱ्या लेखकांच्या (साहित्यिकांच्या) नावांची यादी करा.
2. बी. एम्. श्रीकंठय्या यांच्याबद्दल अधिक माहिती संग्रहित करा.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

कर्नाटकातील वीस प्रशासकीय केंद्रे

1. मद्रास - कर्नाटक	:	बळ्ळारी, दक्षिण कन्नड, निलगिरी जिल्हे आणि इतर तालुके (ब्रिटीश प्रशासन)
2. मुंबई - कर्नाटक	:	उत्तर कन्नड, धारवाड, विजयपूर आणि बेळगावी जिल्हा आणि इतर तीन तालुके (ब्रिटीश प्रशासन)
3. कोडगु	:	मुख्य आयुक्त प्रशासन (ब्रिटीश प्रशासन)
4. कॅन्टोन्मेंट (छावणी) कर्नाटक	:	बेळगावी आणि बेंगळुरू (लष्करी कर्नाटक स्थानके किंवा छावणी प्रदेश) (ब्रिटिश प्रशासन.
5. म्हैसूरु	:	म्हैसूरु, मंड्या, हासन, शिवमोग्गा, चिक्कमंगळुरू, चित्रदुर्ग, तुमकुरू, कोलार आणि बेंगळुरू (म्हैसूरु संस्थान)
6. हैदराबाद संस्थान (प्रांत)	:	कलबुरगी, बिदर आणि रायचूर जिल्हे [हैदराबाद संस्थान (प्रांत)]
7.		14 छोटी संस्थाने (प्रांत) एकूण 20 प्रशासकीय केंद्रे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

एकीकरण चळवळीमध्ये वृत्तपत्रे आणि साहित्यिकांची भूमिका


दैनिक वर्तमानपत्रे, साप्ताहिक, मासिक आणि साहित्यकृतींनी एकीकरण चळवळीला प्रेरणा दिली. मुंबई - कर्नाटक, म्हैसूरू संस्थान आणि कर्नाटक किनारपट्टी प्रदेशामध्ये अनेक वर्तमानपत्रे प्रकाशित झाली.

प्रमुख वर्तमानपत्रे

मुंबई-कर्नाटक : 'विजय', 'राजहंस' 'कर्नाटक वृत्त' 'कन्नड केसरी', 'कर्नाटक वैभव'.

म्हैसूरु संस्थान : 'सूर्योदय प्रकाशिका' 'हितबोधिनी', 'वृत्तांत चिंतामणी' 'म्हैसूरू हेरॉल्ड'.


कर्नाटक राज्य, भाषा आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी झटणारे सर्वात प्रमुख व्यक्ती म्हणजे आलूर व्यंकटराय. कर्नाटकाची त्याकाळातली वाईट परिस्थिती पाहून ते उद्‌गारले होते, "छे, कर्नाटक कोठे आहे? चारही बाजूनी वाटून गेलेला कर्नाटक अखंड करणार कोण? इतका अभिमान निर्माण होईल का?"




आलूर व्यंकटराय
'कर्नाटक कुलपुरोहित'



हुईलगोळ
नारायणराव



राष्ट्रकवी
कुवेंपु



राष्ट्रकवी
गोविंद पै

कन्नड भाषा आणि वैभव कन्नडिगांना समजून देण्याचा उद्देश आलुर व्यंकटराय यांचा होता. त्यासाठी त्यांनी 'कर्नाटकाचे गतवैभव' हे पुस्तक लिहून ते स्वखर्चाने प्रकाशित केले. हे पुस्तक अत्यंत प्रेरणादायक ठरले. हैदराबादच्या कन्नडिगांनी त्यांचा सन्मान (1941) करून 'कर्नाटक कुल पुरोहित' ही पदवी दिली. मुंबई, कर्नाटकमधील कन्नडिगांमध्ये जागृती करण्याचे काम शांतकवी यांनी केले. कन्नड साहित्य संमेलनाच्या खर्चासाठी 'भिक्षेसाठी कन्नडचा सेवक आला आहे. वेळ वाया न घालवता वाढ गं आई,' असे म्हणत पैसे जमा केले. कुवेंपु यांचे 'जय हे कर्नाटक माते', 'पाय ठेवता तोच कर्नाटक' इत्यादि गीतांनी लक्षावधी कन्नडिगांचे

हृदय स्फुरले. हुईलगोळ नारायणराव यांच्या 'उदयवागली नम्म चेलुव कन्नडनाडु' या प्रादेशिक गीताने लोकप्रियता मिळवली. कन्नडचे पहिले राष्ट्रकवी मंजेश्वर गोविंद पै यांनी कासरगोडचा कर्नाटकामध्ये समावेश व्हावा, यासाठी अखेरपर्यंत लढा दिला. अनेक कवींनी, लेखकांनी कन्नडिगांमध्ये तीव्र अभिमान जागृत केला.

स्वातंत्र्योत्तर एकीकरण चळवळी

अर्ध्या शतकापेक्षा जास्त कालावधी एकीकरणाचे स्वप्न पाहत असले तरी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तीन टप्यात हे स्वप्न साकार झाले.

पहिली पायरी (1947-48)

1947 पूर्वी आपल्या देशात दोन प्रकारच्या राजवटी होत्या. ब्रिटिशांचे भारतातील प्रांत आणि संस्थानिकांची 562 राज्ये होती. संविधान सभेत भारताची भाषावार प्रांतरचना करण्यात आली. भारताचे चार प्रकारच्या प्रशासकीय विभागांमध्ये विभाजन करण्यात आले. ते ए, बी, सी आणि डी असे होते. त्यानुसार कर्नाटकातील वीस प्रशासकीय प्रांतांची पाच विभागांमध्ये पुनर्रचना करण्यात आली. हे पाच विभाग म्हणजे, मुंबई, मद्रास, म्हैसूरू, हैदराबाद आणि कोडगु हे होय. कर्नाटकाच्या एकीकरणाची ही पहिली पायरी होती.

दुसरी पायरी (1953)

1951-52 मध्ये लोकसभेची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. निवडणूकीनंतर तीव्र चळवळीच्या भावनेतून 'अखंड कर्नाटक राज्य निर्माण परिषद' या पक्षाचा उदय झाला (1952). या पक्षाने एकीकरणासाठी सत्याग्रह केला आणि सुमारे 5000 लोकांना तुरुंगात टाकले. तत्कालिन मुख्यमंत्री केंगल हनुमंतय्या यांनी एकीकरण चळवळीस पाठिंबा दिला आणि एकीकरणासाठी राज्यभर दौरा केला.

© KSEEB NOT TO BE REPUBLISHED

1952 मध्ये पोट्टी श्रीरामुलू या आंध्रप्रदेशातील नेत्याने आंध्र प्रदेशरचनेसागी रचनेसाठी तीव्र उपोषण केले. 58 दिवसांच्या तीव्र उपोषणानंतर त्यांचा मृत्यू झाला. आंध्रात तीव्र दंगली झाल्या. श्रीरामुलू यांच्या मृत्यूनंतर पंतप्रधान नेहरूंनी आंध्र प्रदेश राज्याची निर्मिती करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, असे जाहीर केले. त्याप्रमाणे आंध्रप्रदेश राज्याची रचना करण्यान आली (1953).

आंध्र प्रदेशची रचना करताना बळ्ळारी जिल्ह्यातील सात तालुके म्हैसूरू प्रांतात विलीन करण्यात आले. ही एकीकरणाची दुसरी पायरी होती.

शेवटची पायरी (1956)


आंध्र प्रदेशच्या रचनेनंतर भाषेच्या आधारावर भारताची पुन्हा रचना करावी, ही मागणी अत्यंत तीव्र झाली. केंद्र सरकारने राज्यांची पुनर्रचना करण्याबाबत अहवाल सादर करण्यासाठी 'राज्य पुनर्रचना आयोग' (एस्.आर्. सी.) नेमले. त्याचे अध्यक्ष एस्. फजल अली होते. (म्हणून या आयोगाला 'फजल अली आयोग' असे म्हणतात) एच्. एन्. कुंजरू आणि के. एम्. पण्णीकर हे या आयोगाचे इतर सदस्य होते. या आयोगाने 1955 मध्ये आपला अहवाल दिला. त्यानुसार भारतातील राज्यांची पुनर्रचना ही प्रशासनाची भाषा आणि सोयींवर आधारीत होती. कर्नाटक प्रदेशातील व भारतातील सर्व पक्षांनी या आयोगाला मान्यता दिली. पण कासरगोड केरळ राज्याला जोडला. बळ्ळारी जिल्ह्यातील काही तालुके आंध्र प्रदेशला जोडले. याला कन्नडिगांनी आणि म्हैसूरू विधानसभेने तीव्र विरोध केला. म्हैसूरू विधानसभेने बळ्ळारीला म्हैसूरूपासून वेगळे न करता नवीन राज्याला 'म्हैसूरू राज्य' असे नाव ठेवावे, या निर्णयापर्यंत आले. (फजल अली आयोगाने बळ्ळारी जिल्हयाचा बहुतांश भाग आंध्र प्रदेश राज्याला देण्याची शिफारस केली होती).

केंद्र सरकारने राज्य पुनर्रचना आयोगाचा हा निर्णय मान्य केला. एकीकृत झालेले हे कर्नाटक राज्य 1 नोव्हेंबर 1956 रोजी 'विशाल म्हैसूरू राज्य' या नावाने अस्तित्वात आले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

एकीकरणानंतर कर्नाटक

1. जूने म्हैसूरु प्रांत 9 जिल्हे.	म्हैसूरु, मंडया, बेंगळूरू, कोलार, हासन, तुमकूर, चिक्कमंगळूरु, शिवमोगा आणि चित्रदुर्ग.
2. मुंबई राज्यातील चार जिल्हे.	बेळगावी, धारवाड, विजयपूर आणि उत्तर कन्नड.
3. हैदराबाद राज्याचे तीन जिल्हे	कलबुरगी, रायचूर आणि बिदर.
4. मद्रास प्रांत.	दक्षिण कन्नड जिल्हा, कोळ्ळेगाल तालुका), बळ्ळारी (1953 च्या आंध्र प्रदेश रचनेनंतर)
5. राज्य	कोडगू



कर्नाटकाचे एकीकरण 1956

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

उपक्रम : कर्नाटकातील एकतीस जिल्ह्यांच्या नावांची यादी करा.

म्हैसूरू राज्याचे माजी मुख्यमंत्री केंगल हनुमंतय्या यांनी कन्नडिगांच्या एकत्रित राज्यासाठी लोकांमध्ये जागृती आणण्याचा प्रयत्न केला. 1956 मध्ये स्थापन झालेल्या म्हैसूरू राज्याचे एस्. निजलिंगप्पा हे पहिले मुख्यमंत्री होते. 1 नोव्हेंबर 1973 रोजी तत्कालिन मुख्यमंत्री डी. देवराज अरस यांनी मैसुरू राज्याचे 'कर्नाटक' असे नामकरण केले.



केंगल हनुमंतय्या
मुख्यमंत्री



एस्. निजलिंगप्पा
मैसुरू राज्याचे पहिले
मुख्यमंत्री



डी. देवराज अरस
मुख्यमंत्री

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सीमा वाद

राष्ट्रीय स्तरावरच भाषेवर आधारित राज्यांची निर्मिती झाल्यामुळे काही भागातील कन्नडिगांना अन्याय सहन करावा लागला. भाषिकदृष्ट्या ते बहुसंख्य असले तरी त्यांचा दुसऱ्या राज्यात समावेश झाल्यामुळे तेथील परिस्थितीनुसार ते अल्पसंख्यांक बनले. त्यामुळे आजही हे भाग कर्नाटकाला परत मिळावेत, यासाठी कर्नाटक सरकार आणि कन्नडिग यांचा संघर्ष चालू आहे. मुख्य म्हणजे या मुद्यांवरून महाराष्ट्र, केरळ, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडूबरोबर निरंतर सीमा संघर्ष चालला आहे. मात्र हा वाद निकालात काढण्याचा अधिकार केंद्र सरकारकडे आहे.

उपक्रम : कन्नड अभिमान जागृत करणाऱ्या गाण्यांचा संग्रह करा.

1. कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्यामधील सीमावाद

महाराष्ट्रात आजही असे अनेक भाग आहेत जिथे कन्नड भाषीक बहुसंख्येने आहेत. यामध्ये अक्कलकोट, दक्षिण सोलापूर आणि जत तालुका हे महत्त्वाचे भाग आहेत. पण प्रमुख संघर्ष हा बेळगावी शहरासाठी केला जात आहे. बेळगावीला आपला भाग बनविण्यासाठी महाराष्ट्र सरकार दबाव आणत आहे. कर्नाटक सरकार आणि कन्नड समर्थक संघटना महाराष्ट्राच्या मागण्या स्पष्टपणे नाकारत आहेत. बेळगावी आणि इतर काही भाग महाराष्ट्राला जोडला पाहिजे, असा आग्रह महाराष्ट्र एकीकरण समिती करत आहे.

1966 मध्ये केंद्र सरकारने मेहरचंद महाजन यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील सीमावर्ती भागाचा अभ्यास करून शिफारसी करण्यासाठी नेमली होती. महाजन अहवालात बेळगावी हा कर्नाटकचाच भाग राहावा, अशी शिफारस करण्यात आली होती. महाजन अहवालाच्या सूचनांचे पालन करत कर्नाटक सरकारने बेळगावी येथे सुवर्ण सौध बांधले आहे. वर्षातून एकदा तेथे विधिमंडळाचे अधिवेशन आयोजित केले जात आहे. बेळगावी हा कर्नाटकचाच अविभाज्य भाग राहिला आहे.

2. कर्नाटक आणि केरळमधील वाद

इथे प्रमुख वाद 'कासरगोड' या भागाचा आहे. ऐतिहासिकदृष्ट्या कासरगोड हे कन्नड राजांच्या अधिपत्याखाली होते. केळदी संस्थानचा प्रमुख शिवप्पा नायक आणि इतरांनी या भागावर वर्चस्व प्रस्थापित केले होते. बेकल किल्ला इक्केरी राजांनी बांधला होता, असे ऐतिहासिक नोंदीवरून सिद्ध होते. त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या कर्नाटकाशी एकरूप असलेला कासरगोड कोंडीत सापडला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे कासरगोड केरळमध्ये विलीन करण्याची राज्य पुनर्रचना

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आयोगाची (1955) शिफारस होती. या निर्णयाला विरोध करण्यासाठी कर्नाटक समितीसह अनेक संघटना स्थापन झाल्या होत्या, कासरगोड कर्नाटकला द्यावा, या मागणीसाठी विद्यार्थी, महिला, सरकारी कर्मचारी आणि इतर सर्व वर्गातील लोक संपावर गेले. आजसुद्धा विरोधाची ही आग धगधगत आहे. कैय्यार किय्ण्ण रै आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कासरगोड कर्नाटकात विलीन व्हावा यासाठी तात्विक आणि सात्वीक प्रयत्नांनी हा संघर्ष जिवंत ठेवला आहे.

अभ्यास

I. योग्य शब्दासह रिकाम्या जागा भरा.

1. कर्नाटक विद्यावर्त संघाचे प्रथम अध्यक्ष _____.
2. कर्नाटक कुलपुरोहीत असे _____ यांना म्हणतात.
3. कन्नडचे प्रथम राष्ट्रकवी _____.
4. एकीकृत कर्नाटकाचे प्रथम मुख्यमंत्री _____.

II. खालील प्रश्नांची एका शब्दात किंवा एका वाक्यात उत्तरे लिहा.

5. हैदराबाद संस्थानातील कन्नड जिल्ह्यांची नावे लिहा.
6. कर्नाटकच्या एकीकरणात योगदान दिलेल्या दोन संघटनांची नावे लिहा?

III. दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

7. फजल अली आयोगाच्या कोणत्या शिफारशीला कन्नडगांनी विरोध केला?
8. कर्नाटकाचे एकीकरण करण्यासाठी प्रयत्न केलेल्यांची यादी करा.

IV. टीपा लिहा.

i) आलूर व्यंकटराय.

ii) फजल अली आयोग.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चर्चा करा.

महाराष्ट्र, केरळ आणि कर्नाटक या राज्यांमध्ये चाललेल्या सीमावादावर चर्चा करून उपाय सुचवा (आपल्या शिक्षकांची मदत घ्या.) या विषयावर एक परिसंवाद आयोजित करा.

उपक्रम:

1. एकत्रित कर्नाटकच्या (1956) सीमा भारताच्या नकाशात दाखवा.
2. हुईलगोळ नारायणराव यांच 'उदयवागली नम्म चेलुव कन्नड नाडू', गोविंद पै यांचे 'कन्नडीगर ताई' हे समूहाने म्हणा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 19 कर्नाटकातील समाजाभिमुख चळवळी

Q9E7Q4

पाठाचा परिचय

सत्ताधाऱ्यांनी जनहिताच्या विरोधात घेतलेले निर्णय, कार्यक्रम आणि योजना यांची अंमलबजावणी करताना त्यांना विरोध करण्याचा हक्क (अधिकार) जनतेला आहे. कर्नाटकामध्ये जेंव्हा जेंव्हा असे प्रसंग उद्भवले, त्यावेळी सजग, प्रज्ञावंत नागरिक रागाने पेटून उठले आणि त्याविरोधात आंदोलने केली. अशा अनेकवेळी दुर्बल, शोषित आणि मागासवर्गातील लोकांनी आपल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासासाठी संघर्ष केला आहे. या पाठामध्ये कर्नाटकातील पर्यावरणवादी, महिला, शेतकरी, दलित आणि कन्नडवादी संघटनांनी केलेल्या चळवळीची माहिती देण्यात आली असून अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यासाठी अंमलात आणलेल्या महत्त्वाच्या अशा पंचायत राज्य व्यवस्थेचा परिचय येथे करून दिला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सामर्थ्ये

1. काही उदाहरणांवरून पर्यावरण (परिसर) चळवळीचा अर्थ समजून घेणे.
2. महिला सबलीकरणासाठी सरकारने हाती घेतलेल्या उपाययोजनांची प्रशंसा करणे.
3. शेतकऱ्यांनी आपल्या हितरक्षणासाठी चालविलेल्या आंदोलनांची माहिती समजून घेणे.
4. दलितांच्या चळवळीची माहिती समजून घेणे.
5. 'कन्नड रक्षणा' चळवळीची वास्तविकता समजून त्याची आवड निर्माण करणे.

परिसर चळवळ

आपल्या पृथ्वीवरील दगड, माती, हवा, पाणी, प्रकाश या घटकांवर अवलंबून असणारे पशूपक्षी, झाडे-झुडपे आणि मानवासह इतर सर्व सजीव जगले पाहिजेत. पृथ्वीवर नैसर्गिक समतोल आहे. येथे मानवाचा विकास होत असला तरी माणूस निसर्गाला कच्चा माल समजून आपल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी परिसराचा नाश करीत आहे.

पृथ्वीवर असणारे सजीव आणि निर्जीव घटक म्हणजेच परिसर होय.

औद्योगिक क्रांती, व्यापार आणि व्यावसायिक क्रांतीचा पर्यावरणावर गंभीर परिणाम झाला आहे. मोठमोठे उद्योजक नैसर्गिक संपत्तीवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा खूप प्रयत्न करत आहेत. अनेक नवीन समस्या निर्माण होऊन समाजाचे आरोग्य गंभीर समस्यांच्या आहारी जात आहेत. एकूणच नैसर्गिक संपत्तीच्या नाशामुळे बहुसंख्य नागरिकांना तीव्र संकटांना सामोरे जावे लागत आहे. 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात लोकांना पर्यावरणाचे महत्व पटवून देण्यासाठी पर्यावरण जागृतीच्या चळवळींना प्रारंभ झाला. 1970 च्या दशकात या परिसर चळवळींची सुरवात जागतिक पातळीवर झाली आणि कर्नाटकात येऊन पोहोचली.

महात्मा गांधींनी म्हटल्याप्रमाणे पृथ्वी ही सर्वांच्या आवश्यक गरजा पुरविते पण लोभ नाही.

पश्चिम घाटातील प्रदेशात खाण व्यवसायास सुरवात झाली. त्यामुळे परिसर संरक्षणाची चळवळ करणे अनिवार्य ठरले. 'सह्याद्री खाण विरोधी मंच' ची सुरवात होऊन कुद्रेमुख व इतर परिसरातील खाण व्यवसायांना विरोध सुरू केला. केंद्र सरकारने लोह खनिज प्रक्रिया कंपनी सुरू केली. त्यामुळे भद्रा नदी उगमस्थानीच प्रदुषित झाली. या आंदोलनामुळे सरकारवर दबाव येऊन टप्याटप्याने सरकारने परिसर संरक्षणाचे उपाय हाती घेतले.

सालुमरद तिम्मका : सालुमरद तिम्मका या आजही वनीकरणासाठी आंदोलने उभी करतात. त्या 284 झाडांच्या आई आहेत. अशिक्षित असूनही समाजासमोर परिसर संरक्षणाचा धडा त्यांनी घातला आहे. 2019 मध्ये त्यांना 'पद्मश्री' हा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार देण्यात आला.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

सहयाद्री पर्वतश्रेणीतील तुंगा ही प्रमुख नदी प्रदूषित होत असलेली पाहून 'तुंगा उगम स्थान वाचवा' (तुंगा बचाव) आंदोलन सुरू झाले. सह्याद्री पर्वत श्रेणीमधील जंगल प्रदेश हळूहळू नष्ट होऊ लागले. तेथील झाडे, अरण्ये वाढविण्याच्या उद्देशाने, त्यांचा नाश थांबविण्यासाठी भारतातील विविध भागात 'चिपको' अथवा 'अप्पिको' चळवळ सुरू झाली. चिपको चळवळीमध्ये आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या सुंदरलाल बहुगुणा यांची भूमिका आम्ही कधीही विसरणार नाही.

उपक्रम : अप्पिको (चिपको) चळवळीचे ध्येय आणि उद्देश स्पष्ट करा.

वनविभागाने निलगिरी, आकेशीसारख्या रोपांची लागवड सुरु केली. या योजनेला 'सामाजिक वनीकरण' असे म्हणतात. निलगिरीची झाडे भूगर्भजलाची पातळी कमी करतात म्हणून त्यांच्या लागवडीला पर्यावरणवाद्यांनी विरोध केला.

दावणगेरे जिल्ह्यातील हरिहर पॉलिफायबर कारखान्याचे दूषित सांडपाणी तुंगभद्रा नदीत सोडून ती प्रदुषित करणाऱ्यांच्या विरोधात आंदोलन सुरु झाले. कारवारचे सी बर्ड बंदर विरोधी आंदोलन, किनारपट्टीवरील कोजेंट्रिक्स नागार्जुन प्रकल्प विरोधी आंदोलन, तलाव वाचवा आंदोलन, भद्रा अप्पर कालवा प्रकल्प विरोधी आंदोलन, कब्बन पार्क बचाव आंदोलन, कारगिल सीड्स कंपनी विरोधात आंदोलन, औद्योगिक शहरांच्या विरोधात आंदोलन इत्यादि या इतर चळवळी होत.

अलिकडच्या काळातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर बातमी बनलेल्या चळवळी म्हणजे कर्नाटकातील खाण व्यवसायाविरोधात झालेली आंदोलने होय. बळ्ळारी, तुमकुर, चित्रदुर्ग, चिक्कमंगळूरु उत्तर कन्नड, दावणगेरे, बेंगलूरु दक्षिण (रामनगर)आणि इतर जिल्ह्यातील खनीज संपत्तीची लूट करणाऱ्यांच्या विरोधात या चळवळीना प्रारंभ झाला. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरणाच्या सम स्या अतिशय गांभिर्याने घेतल्या असून त्यानुसार आपले निर्णय दिले आहेत.

कर्नाटक लोकायुक्त संस्थेने विविध जनहित याचिकांचा विचार करून अवैध पद्धतीने चाललेल्या खाणकामावर अतिशय बारकाईने तसेच विस्तृतपणे सादर

© KSEEB NOT TO BE REPUBLISHED

केलेला अहवाल उल्लेखनीय आहे. त्याचा परिणाम म्हणून पर्यावरणाचे शोषण कमी झाले. आजही अनेक आंदोलने सुरू आहेत. कृत्रीम रसायनांपासून जमिनी खराब करणाऱ्या पध्दतीला पर्याय म्हणून नैसर्गिक शेती पद्धतीचा अवलंब करावा, यासाठी जाणीवपूर्वक केलेली आंदोलने क्रांतीचे रूप धारण करत आहेत. ही समाधानाची गोष्ट आहे. कर्नाटकात 'सेंद्रिय कृषी मिशन' ची स्थापना करून सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन दिले आहे. अनेक शेतकऱ्यांना या सेंद्रिय शेतीचा लाभ होत आहे. या दृष्टीने कर्नाटक राज्य भारतात आघाडीवर आहे.

महिला चळवळ

महिला चळवळीने सुरवातीला मुख्यतः स्त्री शिक्षणावर भर दिला. कर्नाटकामध्ये श्रीरंगम्मा आणि रुक्मिणम्मा या महिलांनी बी.ए. ऑनर्स ही पदवी सर्वप्रथम मिळविली. इंदिरम्मा या बेंगळूरुच्या पहिल्या महिला महापौर होत्या. इतके असूनही महिलांचे सबलीकरण ही खूप दूरची गोष्ट होती. महिलांना संपत्तीमध्ये वाटा मिळत नव्हता. विविध धर्मातील महिला विविध प्रकारच्या शोषणाला बळी पडल्या आहेत.

उपक्रम : विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची यादी करा.

अनेक महिलांनी कुटुंबाच्या बंधनातून बाहेर पडून स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला, देशसेवेसाठी पुढाकार घेतला. कमलादेवी चट्टोपाध्याय, सरोजिनी नायडू, अरुणा असफ अली, डॉ मुत्तूलक्ष्मी रेड्डी अशा अनेक महिलांचे आपण स्मरण करतो.



कमलादेवी चट्टोपाध्याय



अरुणा असफ अली

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1975 मध्ये 8 मार्च हा दिवस 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून साजरा करण्यास सुरवात झाली. कर्नाटक सरकारने विविध महिला अभिवृद्धी कार्यक्रमांना सुरवात केली. हळूहळू महिला संघटना स्थापन झाल्या. डाव्या पक्षातील संघटनांनी महिलांचे संघटन करण्याचे कार्य केले. महिला संघटनांनी हुंडा, छळ, कौटुंबिक हिंसाचार यांना विरोध केला. त्याचप्रमाणे महिला हक्काच्या प्रतिपादनाचा कायदेशीर मार्ग बळकट करण्यासाठी दबाव आणला. निवडणूकीमध्ये महिलांना शे. 33% आरक्षण देऊन प्रशासनात त्यांचा प्रभाव राहावा, यासाठी संघटना आंदोलन करीत आहेत.

या चळवळींचा सकारात्मक परिणाम म्हणून सरकारने अनेक सुधारणा अंमलात आणल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50% आरक्षण जाहीर करणारे कर्नाटक हे देशातील पहिले राज्य आहे. सरकारी नोकऱ्यामध्ये महिलांना शे. 33% आरक्षणामुळे थोड्या प्रमाणात न्याय मिळवून दिला आहे. सरकारने मुली आणि महिला यांच्या हितरक्षणासाठी 'महिला आयोग' स्थापन केला आहे. हा आयोग महिलांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

शेतकरी चळवळ


शेतकऱ्याला आपल्या देशाच्या पाठीचा कणा असे म्हणतात. परंतु हा पाठीचा कणा घट्ट राहण्यासाठी त्याला आवश्यक सुविधा पुरविल्या नाहीत. आजसुद्धा आमचे शेतकरी सरकारी मदतीशिवाय जगण्याच्या स्थितीत नाहीत. कारखानदारांनी तयार केलेल्या मालाची किंमत ते स्वतः ठरवितात. पण शेतकरी अजूनही आपण केलेल्या उत्पादनांची किंमत स्वतः ठरवू शकत नाही. ते नेहमी पावसाच्या कृपा किंवा अवकृपेला सामोरे जात असतात. आमचे रक्षण करणारे सरकार संकटकाळी मदतीला येत नाही म्हणून शेतकरी आंदोलनाचा मार्ग स्वीकारतात, अनेक शेतकरी या आंदोलनात हुतात्मा झाले आहेत. शेकडो वर्षापासून शेतकरी आंदोलन करीत असले तरीही त्याच्या सुखी समाधानी जीवनाचे स्वप्न अजून दूर आहे.

शेतकऱ्यांची आंदोलने प्रामुख्याने जमिनदार (जमीन मालक) यांच्या विरोधात झाली. स्वातंत्र्योत्तर कर्नाटकात आम्ही पाहिलेले पहिले शेतकरी आंदोलन हे 1951 मध्ये शिवमोगा जिल्ह्यातील 'कागोडू' येथे झाले. शेतकऱ्यानी त्यांच्या उत्पादनांचे मोजमाप करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मापन जारच्या आकाराला विरोध केला. पुढील काळात शेतकऱ्यांचे शोषण, कर्जाची वसूली, कामासाठी दिली जाणारी चिरीमिरी इत्यादि प्रमुख समस्यांविरोधात शेतकऱ्यांनी आंदोलने केली. समाजवादी पक्षाचे शांतवेरी गोपाळ गौड यांनी या आंदोलनासाठी पुढाकार घेतला, डॉ. राममनोहर लोहिया यांनी या आंदोलनाला भेट देऊन आपला पाठिंबा व्यक्त केला.

उपक्रम : ना. डिसोजा यांची 'कोळग' कादंबरी वाचून शेतकऱ्यांची स्थिती गती या संबंधी निबंध लिहा.

1950 च्या दशकात उत्तर कन्नड जिल्हयातील समाजवादींनी शेतकरी आंदोलन केले. 1972 मध्ये कोलारमध्ये जमीन अतिक्रमण चळवळ झाली. 1980 मध्ये मलप्रभा नदी प्रदेशातील शेतकऱ्यांनी कापसाच्या पिकासाठी आंदोलन केले. काहीजण पोलिसांच्या गोळीबाराला बळी पडले. शेतकऱ्यांनी सरकारच्या विरोधात असहकार चळवळ पुढे सुरु झाली. या संघर्षात नवलगुंद, नरगुंद आणि सौंदती येथील सुमारे वीसपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली.

या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी स्वत:च्या संघटना स्थापन केल्या. कर्नाटक राज्य रयत संघाची सुरवात शिवमोग्गा जिल्हयात सुरु झाली, त्यांनी स्थानिक समस्यांना हात घातला. येथील शेतकऱ्यांवर दूरगामी परिणाम करू पाहणाऱ्या विदेशी कंपन्यांच्या आगमनाला त्यांनी विरोध केला. कर्नाटक प्रांत रयत संघ, किसान सभा, दलित संघर्ष समिती, शेतकरी मजूर कामगार संघ इत्यादि संघटनांनी शेतकऱ्यांच्या



एम.डी. नंजुडस्वामी

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

समस्येवरील आंदोलनात आवाज उठविला. शेतकरी आंदोलनामध्ये एम्. डी. नंजुंडस्वामी, सुंदरेश, पुट्टण्या, कडीदाळू शामण्णा इत्यादिनी प्रमुख भूमिका बजावली.

उपक्रम : 'बागुरु नविले' चळवळीसंबंधी अधिक माहिती संग्रहित करा.

दलित चळवळ

प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ आर्. डी. लिआँग यांनी एक अद्भूत मत व्यक्त केले आहे. इतरांचे अनुभव तुम्ही समजून घेणे शक्य आहे. परंतु ते अनुभव तुम्ही अनुभवने शक्य नाही. दलित आणि महिलांच्या संदर्भात त्यांचे हे विधान तंतोतंत लागू पडते. वर्णव्यवस्थेत दलितांना स्थान नव्हते. ते शुद्रात शुद्र झाले होते. सामाजिकदृष्ट्या कोणतेच स्थान नसलेल्या अस्पृश्य जातीमध्ये जन्म झाला, फक्त या एकाच कारणामुळे हा समुदाय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून बाहेर राहिला. याविरुध्द चाललेली अनेक आंदोलने आपण आतापर्यंत पाहिली आहेत. पण वसाहतवादाच्या काळात दलितांसंबंधीचे विषय राष्ट्रीय पातळीवरील संवादाचे विषय बनले. 1930 मध्ये महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये झालेली चर्चा याला साक्षी आहे. दोघांचेही ध्येय एकच असले तरी दोघांचे मार्ग वेगळे होते.

स्वामी विवेकानंदाच्या म्हैसूरू भेटीनंतर त्यावेळेचे म्हैसूरुचे महाराज दहावे चामराज वडेयर यांनी दलित वर्गाच्या प्रमुख समस्यांची गंभीरता लक्षात घेऊन दलितांसाठी वेगळ्या स्वतंत्र शाळा सुरु केल्या.

1936 मध्ये दक्षिण भारतातील प्रमुख दलित नेते एम्. सी. राजा यांच्या उपस्थितीत म्हैसूरू राजवाड्यात दलितांचा प्रवेश झाला.

पूर्वी दलितांसाठी अनेक दलितेत्तर व्यक्तींनी आंदोलने केली, आता दलित लोकच आपल्या समस्या आपणच मांडत आहेत. यांच्या मागे डॉ. बी. आर्. आंबेडकरांच्या सैद्धांतिक तत्वांची स्फूर्ती आहे. शिक्षण, संघटना आणि आंदोलन

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ही दलित चळवळीची बीजमंत्रे झाली आहेत. त्यांच्या समस्या निवारण्यासाठी आपल्या राजकारणातून संघटन करून संघटनात्मक जागृतीचे काम केले.

दलित वर्गामध्ये डॉ. आंबेडकर हे त्यांच्या स्वाभिमानाचे प्रतीक असून त्यांना 'दलितांचा सूर्य' असे म्हणतात. या सर्व विकासांच्या प्रतिध्वनीचे पडसाद कर्नाटकामध्ये उमटले आहेत.

20 व्या शतकात स्थापन होऊन वाढलेल्या ब्राम्हणेतर चळवळीनी दलितांना सामावून घेतले नव्हते. याचा जाब विचारत 1970च्या दशकामध्ये 'दलित चळवळी' ने मोठे रूप धारण करून ती एक निर्णायक शक्ती बनली. हैदराबाद कर्नाटक (सध्याचे कल्याण कर्नाटक म्हणून ओळखतात) भागात बी. शामसुंदर यांनी 'भीमसेना' संघटनेची स्थापना केली. 'बसवलिंगप्पा बुसा प्रकरणा'ने दलित चळवळीला एक नवीन वळण दिले. (1973)

मंत्री बसवलिंगप्पा यांनी म्हैसूरूच्या कार्यक्रमामध्ये कन्नड साहित्य टाकाऊ आहे, असा अभिप्राय व्यक्त केला. त्यांच्या विरोधात संपूर्ण कर्नाटकात आंदोलन झाले. शेवटी बसवलिंगप्पांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. या प्रकरणामुळे दलितांमध्ये तीव्र जागृती निर्माण झाली.

त्यानंतर 1976 ला भद्रावतीमध्ये 'दलित लेखक कलाकार संघा'ची स्थापना झाली. कर्नाटकातील दलित चळवळीची दमदार वाटचाल सुरवातीला या संघटनेत पाहावयास मिळते. पुढे यांच्या आश्रयाखाली कर्नाटक दलित संघर्ष समितीची स्थापना झाली. प्रो. बी. कृष्णप्पा हे या समितीचे राज्य संचालक होते. अशाप्रकारे डी. एस्. एस्. ने एक संस्थेचे रूप धारण केले.

टप्प्याटप्प्याने दलित संघर्ष समितीने आपली व्याप्ती वाढविली. नोकरदार, महिला, पालिका कर्मचारी, विद्यार्थी आणि लेखक तसेच कलाकार यांच्या संघटनांसह त्यांच्या शाखा सुरू झाल्या. सुरवातीला जमीन नसलेल्या दलितांनी जमीन प्राप्त करण्यासाठी आंदोलनाची सुरवात केली. शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अधिकारी पदांवर प्रवेश मिळविणे, हा दलित चळवळीचा आणखी एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. कालांतराने दलित संघर्ष चळवळीत मतभेद दिसायला लागले. त्यामुळे वेगवेगळ्या नावानी वेगवेगळ्या संघांची स्थापना झाली.

उपक्रम : देवनूर महादेव आणि सिद्धलिंगय्या यांच्या कृतीची अधिक माहिती संग्रहीत करा.

देवनूर महादेव आणि डॉ. सिद्धलिंगय्या या साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून दलितांचे अंतरंग इतर लोकांसमोर उघडले आहेत. इतर दलित लेखकही या समाजातील सर्व समस्यांची जाणीव करून देत आहेत. या घडामोडींमध्ये दलित साहित्यिकांचे पात्र निर्णायक ठरेल, इतके सामर्थ्य ते दाखवत आहेत. परंतु पुढील बरीच वाटचाल अजून बाकी आहे.

कन्नड वाचवा चळवळ किंवा कन्नड रक्षण चळवळ

एकीकरण चळवळीमुळे कन्नडिगांमध्ये आत्मविश्वास आणि अभिमान निर्माण झाला. साहित्य सृष्टीच्या रूपाने कन्नड लेखकांनी लोकांचे कानडीपण जिवंत ठेवले. या संदर्भात सांस्कृतिक तसेच कन्नडवादी संघटनांची भूमिका मोठी आहे. 1960 च्या दशकानंतर बेंगळुरूमध्ये अन्य भाषांचा अधिक वापर झाला त्यावेळी अ.न. कृ. चिदानंदमूर्ती, म.न. राममूर्ती, वाटाळ नागराज आणि असे अनेक लोक तसेच कर्नाटक युवजन सभा, कन्नड जागृती परिषद, कन्नड शक्तीकेंद्र इत्यादि संघटनांनी कन्नड, कन्नडीग आणि कर्नाटकाचे श्रेष्ठत्व साधण्यामध्ये सफल झाले. या व्यतिरिक्त इतर अनेक कन्नड संघटना आज कन्नड भाषा, जमीन, पाणी, भाषा संरक्षणासंदर्भात अधिक क्रियाशील बनल्या आहेत.

गोकाक चळवळ

1980 च्या दशकाचा काळ म्हणजे कन्नड भाषेच्या अस्तित्वासाठी चाललेल्या आंदोलनाचा काळ होय. 1982 मध्ये गोकाक यांच्या अहवालाच्या अंमलबजावणीसाठी एका निर्णायक, चारित्रिक आंदोलनाला सुरवात झाली. सर्व

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

समाजाने अभूतपूर्वरितीने आंदोलन केले. कर्नाटकातील भाषिक अल्पसंख्यांकांनी कन्नड सक्तीने शिकण्यास नकार दिला. आपल्या मातृभाषेतूनच शिक्षण घेणार असा हट्ट धरला. राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री आर्. गुंडुराव हे उडूपीला गेले असता तेथील मठाधिशांनी संस्कृतला अधिक महत्त्व द्यावे, यासाठी आग्रह धरला. शिक्षण हे कोणत्या भाषेमध्ये असावे या ऐवजी शिक्षणात भाषांचे स्थान कसे असावे यासाठी डॉ. विनायक कृष्णा गोकाक यांच्या अध्यक्षतेखाली भाषा समितीची स्थापना झाली. या समितीने कन्नड़ भाषेला प्रथम स्थान देऊन कन्नड भाषा सक्तीची करावी अशी शिफारस केली. या समितीने त्रिभाषा सुत्राला 350 गुण देण्याचे ठरविले. या त्रिभाषीय सुत्रामध्ये कन्नड ही 150 गुणांसह प्रथम भाषा असावी, अशीही शिफारस या समितीने आपल्या अहवालात केली.

गोकाक समितीच्या शिफारशी तत्कालीन सरकारने मान्य केल्या नाहीत. डॉ. राजकुमार यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण कर्नाटकात तीव्र आंदोलन झाले. कुवेंपु, पाटील पुट्टप्पा इत्यादि ज्येष्ठ साहित्यिकांनी या आंदोलनाला आपला पाठिंबा दिला.

@KSEEB NOT TO BE REPUBLISHED



विनायक कृष्णा गोकाक



डॉ. राजकुमार

गोकाक चळवळीतील प्रमुख घोषणा म्हणजे 'नाव झाले कर्नाटक, श्वास होऊ दे कन्नड', 'काहीही होवो, कन्नड राहो', 'कर्नाटकमध्ये कन्नड श्वास भरू दे' इत्यादी.

अभ्यास

I. योग्य शब्दासह रिकाम्या जागा भरा.

1. सुंदरलाल बहुगुणा यांनी _____चळवळ सुरू केली.
2. राष्ट्रीय महिला दिन _____ मध्ये सुरू झाला.
3. दलित सूर्य म्हणून _____यांना ओळखले जाते.
4. _____ यांच्या नेतृत्वाखाली भाषा समिती स्थापन झाली.

II. एका वाक्यात उत्तरे लिहा :

5. 'तुंगेचा उगम (तुंगा उगम) वाचवा' आंदोलन का सुरू झाले?
6. 'अप्पिको' चळवळ म्हणजे काय ?
7. 'सामाजिक वनीकरण' म्हणजे काय?
8. कर्नाटकच्या पहिल्या बी. ए. (ऑनर्स) पदवीधारक महिला कोण होत्या?

III. दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा :

9. प्राचीन तलावांना आपण का वाचवले पाहिजे?
10. प्रमुख परिसर चळवळींची माहिती लिहा
11. दलित चळवळींची सुरवात का झाली?
12. दलित चळवळींचे बीज मंत्र कोणते ?

चर्चा करा.

13. दलित चळवळीचे यश.

उपक्रम:

1. तुमच्या भागातील दलितांच्या घरांना भेट द्या आणि त्यांची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्थिती जाणून घ्या.
2. गोकाक अहवालातील शिफारशींबद्दल अधिक माहिती गोळा करा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 20 कर्नाटक आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन

U3C8X3

पाठाचा परिचय

या पाठामध्ये कर्नाटकातील स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या सामाजिक आणि आर्थिक अभिवृद्धिच्या मूळ अंशाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे. काही सामाजिक वर्गानी अभिवृध्दीतील अधिकाधिक वाटा मिळविला आहे. इतर वर्ग वेगवेगळ्या कारणामुळे विकासापासून दूर राहिले आहेत. यामुळे सामाजिक असमतोल आहे. तो दूर करण्यासाठी संविधानात्मक आशयांच्या चौकटीत राहून, सरकार भूसुधारणा मागासवर्गीयांच्या आयोगाची नेमणूक इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

सामर्थ्ये

1. स्वातंत्र्यानंतर कर्नाटकामध्ये झालेली सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील साधना समजून घेणे.
2. भूसुधारणा कायद्याचे उद्देश तसेच परिणाम समजून घेणे.
3. मागास वर्गीयांच्या आयोगाने केलेल्या कार्याची प्रशंसा करणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भूसुधारणा

जमिनीच्या वाटणीत असणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी अंमलात आणलेल्या उपायानाच भूसुधारणा असे म्हणतात जमीन ही माणसाच्या जीवनाचा अविभाज्य अंग आहे. आपल्या जीवनाला आकार देण्यासाठी, जीवन जगण्यासाठी जमिनीवर अवलंबून आहे. परंतु जमिनीचे वाटप समाजातील सर्व घटकांना समान झालेले नाही. या जमिनीच्या मालकी हक्कातील असमानता दूर करण्यासाठी भूसुधारणा हाती घेण्यात आली आहे.

पूर्वी जमिनीवर जमीनदारांचा हक्क होता आणि त्यांच्या बाजूने कायदा होता. पण प्रत्यक्षात जमिनी, शेतंकरी कसन होत. त्यामुळे संपत्तीचे एकत्रीकरण आणि

वाटणी यामध्ये मोठा असमतोल निर्माण झाला. भूसुधारणा कायद्यान्वये समान समाज निर्माण करण्याचा प्रयत्न 1970 या दशकामध्ये केला गेला. शेतकरी आणि दलित चळवळींच्या परिणामाने जमिनीच्या वाटणीचा प्रश्न उद्भवला. भूहीन कनिष्ट समाजातील लोकांना जमीन देण्यासाठी अनेक आंदोलने झाली. याच्या परिणामाने भूसुधारणेमधील प्रमुख अंश असे आहेत. त्यासाठी भुसुधारणा कायदा लागू करण्यात आला.

1. जमिनदारी पद्धतीचे निर्मूलन

जमिनीवरील जमिनदार वर्गाचा हक्क कमी करणे हा प्रमुख उद्देश आहे. हाच भूसुधारणेमध्ये प्रमुख अंश झाला पाहिजे, 1955 मध्ये भारताचे माजी उपराष्ट्रपती बी.डी. जत्ती यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात झाली. या समितीने भुसुधारणा हाती घेण्याच्या पार्श्वभूमीवर काही शिफारशी केल्या होत्या. या समितीने प्रत्येक कुटुंबासाठी जास्तीत जास्त म्हणजे 116 एकर गायरान, 27 एकर बागायत जमीन असली पाहिजे. अशी शिफारस केली होती. ही शिफारस जमीनदारांना पोषक होती. ही शिफारस 1957 मध्ये अंमलात आलेली असली तरी पूर्वी असलेली व्यवस्था बदलणे त्यांना साध्य झाले नाही, 1974 च्या भूसुधारणा कायद्याने ही पद्धत घालविण्यासाठी शक्य झाले.

एक एकर म्हणजे 100 सेंट्स किंवा 40 गुंठे

2. महसूल पद्धतीतील सुधारणा

भारतातील महसूलदाराना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्या म्हणजे अधिक प्रमाणातील महसूल, जमिनीच्या मालकी हक्कांची असुरक्षितता आणि मालक नसलेले भूहीन स्थिती या समस्या घालविण्यासाठी 1974 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री डी. देवराज अरस यानी 'कसेल त्याची जमीन' असा क्रांतिकारक कायदा कर्नाटकात अंमलात आणाला. अनेक वर्षापासून शेती करणारे अनेक भूमीहीन लोक जमिनीचे मालक बनले.

NOT TO BE REPUBLISHED © KSTB

सा.श. 1974 च्या भूसुधारणा कायदा दुरुस्तीतील प्रमुख अंश:

1. या कायद्यान्वये सर्व प्रकारचा महसूल रद्द करण्यात आला.
2. शेतकरी कसत असलेल्या शेतीचा मालकी हक्क स्थापन करण्याची संधी देण्यात आली.
3. महसूलीसाठी उपलब्ध सर्व जमीन सरकारच्या स्वाधीन करण्यात आली. संबंधित जमिनीवर मालकी घेऊ इच्छिणाऱ्याना आणि त्यावर अवलंबून असलेल्यांनी ट्रिब्यूनल (न्यायमंडळ) मार्फत अर्ज करावयाचा होता.
4. न्यायमंडाळाचा निर्णय हा अंतिम निर्णय होता. त्यांना निर्णयाच्या विरुद्ध उच्च न्यायालयात दाद मागता येत होती.

3. शेती वाटपाची मर्यादा

1957 नंतर झालेल्या प्रमुख प्रयत्नामुळे 1970 च्या दशकात पुन्हा प्रयत्न झाले. कुटूंबासाठी जास्तीत जास्त किती जमीन असली पाहिजे याची मर्यादा तत्कालीन सरकारने ठरविली आहे.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

1974 मध्ये शेतीची अधिकाधिक मर्यादा खालील प्रमाणे ठरविण्यात आली होती. पाण्याची सोय नसलेली (खुश्की) गायरान ओसाड जमीन असल्यास त्याची मर्यादा एका कुटूंबाला 54 एकर असली पाहिजे. पाणी पुरवठ्याची सोय असून त्यामध्ये दोन किंवा त्यापेक्षा अधिक पिके घेत असतील तर प्रत्येक कुटुंबासाठी 10 ते 18 एकर जमीन असावी. एक पीक बागायती जमीन असेल तर एका कुटूंबासाठी 27 एकर जमीन असावी, असे ठरविण्यात आले होते. 1977 मध्ये इनाम पद्धती रद्द करण्यासंबधी कायदा अंमलात आला.

उपक्रम: इनाम रद्द पध्दत कायद्याविषयी अधिक माहिती मिळवा.

4. आर्थिक उत्पादनाची रचना

शेतकरी कोणत्या उत्पादनातून शेतीसाठी लागणारा खर्च वजा करून आपले कुटुंब सुखी होण्यासाठी आवश्यक उत्पन्न मिळवू शकतो. अशा जीवनाधार उत्पादनाला आर्थिक उत्पादन म्हणतात, उत्पादनांचे एकीकरण आणि जास्तीत जास्त प्रमाणात मर्यादेमुळे अनेक शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले आहे.

5. सहकार शेतीचा विकास

शेतकऱ्यांनी स्वयंप्रेरणेने सहकार संघाची स्थापना करून आपले सर्व मालकी हक्क संघाच्या व्यवस्थापनाकडे सोपवून सर्वांनी मिळून शेती करणे. उत्पन्न हाती आल्यानंतर जमिनीच्या शास्वत विकासासाठी आवश्यक भांडवल काढून, राहिलेल्या उत्पन्नाचा भाग सर्व मिळून वाटून घेणे यालाच सहकारी शेती पद्धत म्हणतात.

भूसुधारणा कायद्यामुळे भूमीहीन लोकांना काही प्रमाणात जमिनिचा मालकी हक्क मिळाला. शेती करणाऱ्याचा हक्क अबाधित ठेवला, सहकारी शेती पध्दतीमुळे शेतकऱ्याना कांही प्रमाणात लाभ मिळणे शक्य झाले. परंतु सहकार शेती पद्धत ही अपेक्षित प्रमाणात लोकांना शेती व्यवसाय होऊ शकला नाही.

मागासवर्ग आयोग


भारताच्या सामाजिक व्यवस्थेत असमानता आढळते. श्रेणीकृत जाती व्यवस्थेमुळे अनेक जाती मागासलेल्याच आहेत. ब्रिटिशांनी भारतात आल्यानंतर नवीन सामाजिक चालीरिती सुरुवात केल्या.

ब्रिटिशांच्या कारकीर्दीत कोणत्याही जाती पातीचा विचार न करता सर्वजन इंग्रजी शिकण्यास पात्र ठरले. इंग्लिश भाषा शिकलेल्याना ब्रिटिश सरकारमध्ये नोकरीच्या संधी मिळू लागल्या. ब्राह्मणेत्तर लोकांना शिक्षण खुले झाल्यानंतर त्यांच्यासमोर नवीन जाणीवांची सुरुवात झाली, बहुसंख्यांक असूनसुद्धा आपल्या वर्गातील लोकांना सहकारी उद्योगामध्ये योग्य प्रतिनिधित्व राहिले नव्हते. याचाच परिणाम म्हणून म्हैसूरू संस्थानामध्ये ब्राम्हणेतर लोकांनी सावकार चेन्नय्या, एम बसवय्या इत्यादिंच्या नेतृत्वाखाली ब्राम्हणेत्तर चळवळ सुरू केली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

नालवडी (चौथा) कृष्णराज वडेयर यांच्या काळात संपूर्ण भारतात सर्व प्रथम न्यायमूर्ती लेस्ले सी. मिल्लर यांच्या अध्ययतेखाली 1918 मध्ये मागास वर्ग आयोग नेमण्यात आला. एका जातीत शेकडा, 5 किंवा त्यापेक्षा जास्त इंग्लिश जाणणारे असतील, तर ती जात विकसित असा अभिप्राय व्यक्त केला. 1921 मध्ये सर्व प्रथम मागास वर्गासाठी राखीवतेचा आदेश देण्यात आला.

मुख्यमंत्री डी. देवराज अरस यानी 1975 मध्ये एल. जी. हावनूर यांच्या नेतृत्वाखाली प्रथम मागास वर्ग आयोगाची नेमणूक केली. मागासवर्ग ठरविण्यासाठी इ. स. 1975 मध्ये एस. एस. एल. सी परीक्षेमध्ये विविध जातीतील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण हे मागास वर्गातील जाती ठरविण्यासाठी एक निकष म्हणून मानण्यात आले. हावनूर अहवालाच्या आधारे 1977 मध्ये सरकारी आदेश जारी करण्यात आला. हा एक क्रांतिकारक आदेश ठरला.



एल. जी. हावनूर

मागास वर्गातील लोकांना आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या सबळ करण्यासाठी हा आदेश अधिक कारणीभूत ठरला. याला सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली या अहवालातील कमतरतांची पूर्तता करण्याचे आश्वासन कर्नाटक सरकारने न्यायालयाला दिले, याचाच परिणाम म्हणून 1983 मध्ये टी. व्यंकटस्वामी आयोग नेमण्यात आला. राजकीय दबावामुळे व्यंकटस्वामी आयोगाच्या अहवालाला सरकारने मान्यता दिली नाही. मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांच्या कारकीर्दीत न्यायमूर्ती ओ. चिन्नप्पा रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली एक समिती रचना करण्यात आली. या अहवालाच्या शिफारसीसुद्धा राजकीय दबावामुळे अंमलात येऊ शकल्या नाहीत.

आतापर्यंत अंमलात आलेले सर्व मागासवर्गीयासंबधीचे राखीवतेचे आदेश हे राजपत्रित आदेश असून हे कोणत्याच प्रकारच्या वैज्ञानिक अहवालाच्चा सल्याच्या शिफारशीवरून दिले गेले नाहीत.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

पंचायत राज्य व्यवस्था

पंचायत राज व्यवस्थेला सोप्या भाषेत प्रशासनाचे विकेंद्रीकरण व्यवस्था म्हणता येईल. स्थानिक लोकांना प्रशासनात सहभागी होऊन निर्णय घेण्यास सक्षम बनवणे ही या यंत्रणेची मुख्य इच्छा आहे. भारतासाठी स्थानिक स्वराज्य प्रणालीची ओळख असू नये.

स्वातंत्र्यानंतर घटनात्मक कामाला गती आली. केंद्रससकारने 1955 मध्ये बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. त्या समितीने त्रिस्तरीय स्थानिक प्रशासन व्यवस्थेची शिफारस केली.

या विकासाच्या पार्श्वभूमीवर त्यावेळी राज्य सरकारने प्रजासत्ताक आशयाने म्हैसूर ग्रामपंचायत आणि स्थानिक मंडळ कायदा 1959 साली मंजूर केला गेला. त्याव्दारे कर्नाटकात लोकशाही संस्थासाठी कायमस्वरूपी आधार तयार केला. नवीन कायद्यांतर्गत शासनाचे तीन टप्पे आहेत.

- ग्राम पंचायत
- तालुका पंचायत
- जिल्हा पंचायत

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कर्नाटकामध्ये 1983 मध्ये अस्तित्वात आलेल्या जनता सरकारने (लोकसरकारने) पंचायत राज व्यवस्थेत क्रांतिकारी बदल घडवून आणले. 'पंचायत राज व्यवस्थेचे प्रणेते', तत्कालीन पंचायत राज खात्याचे मंत्री श्री नजीर साब म्हणाले : पंचायत राज व्यवस्थेने नजीर साब दालन मागासवर्गीय आणि महिला वर्गाना स्वराज्यात सहभागी होण्याची अधिक संधी दिली. या नव्या व्यवस्थेने कर्नाटकचा सामाजिक आणि राजकीय नकाशा हळूहळू बदलला.



अब्दूल नजीर साब

नवीन शब्द

महसूल - जमीन मालक आणि जमीन कसणारे यांच्यातील कराराप्रमाणे एकूण उत्पन्नातील द्यावयाचा भाग.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :

1. बी. डी. जत्ती भारताचे _____ होते.
2. _____ हे 1974 मध्ये कर्नाटकाचे मुख्यमंत्री होते.
3. 1975 मध्ये नेमलेल्या प्रथम मागास वर्ग आयोगाचे अध्यक्ष _____ होते.
4. कर्नाटकांचे पंचायत राज्य व्यवस्थेचे प्रणेते _____.

II. दोन- तीन वाक्यात उत्तरे लिहा :

5. भू- सुधारणा म्हणजे काय ?
6. कर्नाटकातील प्रमुख भूसुधारणा कोणत्या ?
7. आर्थिक उत्पादन म्हणजे काय ?.
8. कर्नाटक सरकारने शेतीच्या मालकी हक्काची जास्तीत जास्त मर्यादा का ठरविली ?
9. सहकारी शेती पद्धत म्हणजे काय ?.
10. एल. जी. हावनूर आयोगाने मागासवर्गातील जाती कोणत्या निकषावर ठरविल्या ?
11. पंचायत राज व्यवस्था महत्वाची का आहे ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उपक्रम:

1. शाळेत ग्रामपंचायतीची नमुना बैठक व्यवस्था करणे. (शिक्षकांच्या मदतीने)
2. तुमच्या ग्रामपंचायतीची रचना आणि कार्यक्षेत्र याबद्धल माहिती गोळा करा.

पाठ 21 विविध क्षेत्रात प्रगती

X5D6M6

पाठाचा परिचय

सामाजिक आणि आर्थिक विकास प्रक्रियेमध्ये संपर्क माध्यमांची भूमिका मोठी आहे. कर्नाटकाच्या प्रगतीमध्ये कृषी, उद्योग, माहिती तंत्रज्ञान आणि जैव-तंत्रज्ञानातील क्रांतीने निर्णायक भूमिका बजावली आहे. या सर्वांचा थोडक्यात परिचय या पाठात दिला आहे.

सामर्थ्ये

1. सामाजिक आणि आर्थिक विकासात संपर्क माध्यमांच्या भूमिकेबद्दल जागरूक असणे.
2. माहिती तंत्रज्ञान आणि जैव तंत्रज्ञानातील क्रांतीच्या परिणामी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील बदलांची माहिती गोळा करणे.
3. कृषी, गृह उद्योग आणि पायाभूत सुविधांच्या बदलांची प्रशंसा करणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

संपर्क (संवहन) माध्यम

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी किंवा एका व्यक्ति कडून दुसऱ्या व्यक्तिला बातम्या किंवा सामग्री पोहोचवण्याची पद्धत म्हणजे संपर्क माध्यम होय. विविध कालखंडात वेगवेगळ्या संपर्क माध्यमांचा उपयोग मानवाने केला आहे. उदा. प्राचीन काळात कबूतरे, उंट इत्यादींचा वापर संपर्क माध्यम म्हणून वापरले जात होते.

आधुनिक काळात संपर्क माध्यमांच्यामध्ये क्रांतिकारी बदल झाले. ही क्रांती पाश्चात्य देशातून भारतात वापरण्यात आली. 20 व्या शतकाच्या अखेरीस टपाल व टेलीग्राम व्यवस्था मोठ्या प्रमाणात संपर्क माध्यम म्हणून उदयास आली. आज रेडिओ, दूरदर्शन, मोबाईल, अंतरजाल इ. संपर्क माध्यम बहुतेक सर्व वर्गातील लोकापर्यंत पोहोचली आहेत. आज या माध्यमाशिवाय लोकांनी जगण्याची कल्पना करणे कठीण आहे.

संपर्क माध्यमे प्रामुख्याने तीन गटात विभागली गेली आहेत. ती याप्रमाणे.

➢ छपाई माध्यम ➢ इलेक्ट्रॉनिक माध्यम ➢ मनोरंजन माध्यम

1. छपाई माध्यम

आज इंग्रजी आणि इतर प्रादेशिक भाषामध्ये असंख्य वर्तमानपत्रे प्रकाशित होत आहेत. वर्तमानपत्रे ही त्या दिवसाच्या इतिहासाची नोंद मानली जातात. वर्तमानपत्र हे शहर, गाव असा भेदभाव न करता सर्वत्र पोहोचणारे एक शक्तीशाली माध्यम म्हणून ओळखले जाते.

उपक्रम : मराठी कन्नड, इंग्रजी वर्तमानपत्रे व साप्ताहिक यांची यादी तयार करा.

कन्नड मध्ये सर्वप्रथम सुरू झालेले वर्तमान पत्र 'मंगळुरु समाचार' हे होय. पत्रिकाम ध्ये दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, अर्धवार्षिक व वार्षिक असे प्रकार आहेत.

2. इलेक्ट्रॉनिक माध्यम

20 व्या शतकाच्या शेवटी इलेक्ट्रॉनिक क्रांतीची सुरुवात झाली. दूरदर्शन हे लोकांचे मुख्य आकर्षण बनले. हे माध्यम अत्यावश्यक बातम्या देण्यासोबतच भरपूर मनोरंजन ही देते.

इलेक्ट्रॉनिकस क्षेत्रात तीव्र स्पर्धा सुरु होवून विविध खाजगी संस्था मी तू म्हणत शेतकरी, कामगार, गुंतवणूकदार, विविध ग्राहक, विद्यार्थी आणि इतर विविध वर्गाना आवश्यक असलेली मुबलक माहिती पुरवत आहेत. आज प्रशासकीय यंत्रणा इलेक्ट्रॉनिकस होत आहे.

जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात एखादी घटना घडली की त्याची दृश्ये क्षणार्धात आपल्या डोळयासमोर सादर करते. भुकंप, पूर, अपघात इत्यादी विषयी माहिती देते. त्याचप्रमाणे हवामान बदला विषयी लोकांना माहिती देते, त्यामुळे सागरी दुर्घटनांचे प्रमाण कमी करण्यास मदत करते.

दूरदर्शन व्यतिरिक्त इतर प्रभावशाली इलेक्ट्रॉनिक माध्यम म्हणजे रेडिओ, मोबाईल आणि इंटरनेट हे अनेक लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. शहरी भागात इंटरनेटचा अधिक वापर केला जातो.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

मोबाईल साक्षर व निरक्षर व्यक्तीपर्यंत पोहचलेले प्रभावी माध्यम आहे. तसेच रेडिओ ही प्रभावी माध्यम म्हणून ओळखले जाते. आज रेडिओ हे माहिती व मनोरंजन देणारे प्रमुख श्रवण माध्यम आहे.

इंटरनेटने संपूर्ण जग जवळ आणले आहे. आज जगाच्या कानाकोपऱ्यातून क्षणार्धात माहिती पोहचवणारे प्रभावी अस्त्र बनले आहे. आज फेसबुक, ट्विटरच्या माध्यमातून अनेक चळवळी रूप घेत आहेत. अशाप्रकारे इलेक्ट्रॉनिक माध्यम हे समाज परिवर्तनामध्ये प्रमुख भूमिका बजावत आहे.

3. मनोरंजन माध्यम

मनोरंजनाच्या क्षेत्रात सिनेमा हे खूप मोठे माध्यम आहे. याला साथ देणारे दुसरे माध्यम म्हणजे नाटक.सिनेमा हे सर्वात शक्तिशाली माध्यम आहे जे त्याच्या दृष्य माध्यमामुळे सर्व वर्गातील लोकांना आकर्षित करते.

चित्रपटामध्ये प्रामुख्याने व्यावसायिक चित्रपट आपण पाहतो. याला पर्याय म्हणून प्रायोगिक चित्रपट आहेत. प्रायोगिक सिनेमा मध्ये विशिष्ट विषयाकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून सामाजिक अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. असे चित्रपट जास्तीत जास्त लोकांनी पाहिले पाहिजेत.

आज देशाच्या प्रगतीमध्ये संपर्क माध्यमांची भूमिका प्रमुख आहे. देशाची एकता, अखंडता व शांतता राखण्यास मदत झाली आहे. तसेच व्यापार आणि वाणिज्य यासारख्या क्षेत्रांच्या विकासामध्ये संपर्क माध्यमांची भूमिका महत्वपूर्ण आहे. मोठ्या कंपन्या त्यांच्या मक्तेदारीसाठी स्पर्धा करत आहेत.


माहिती तंत्रज्ञान क्रांती

सध्याच्या युगाला 'माहिती युग' असे म्हणतात. तंत्रज्ञानाव्दारे माहिती निर्मिती आणि प्रसार करण्याच्या प्रक्रियेला माहिती तंत्रज्ञान असे म्हणतात.

संगणक सॉफ्टवेअर आणि टेलिफोनच्या संयोगाने 1990 च्या दशकात मोठी क्रांती झाली. माहिती ही उत्पादक वस्तू मानली जाऊ लागली. तंत्रज्ञान

© MTB NOT TO BE REPUBLISHED

उत्पादनामध्ये बेंगळूरुमधील इन्फोसिस व विप्रो कंपनीचे योगदान मोठे आहे. बेंगळूरला भारताचे सिलिकॉन सिटी म्हणतात.



आय. टी. पार्क, बेंगळूरु

1997 मध्ये कर्नाटक सरकारने माहिती तंत्रज्ञानावर एक नवीन प्रकल्प तयार केला. नवा कायदा केला. माहिती तंत्रज्ञानाच्या वापराने उद्योग, कृषी, व्यवसाय, वाणिज्य, शिक्षण, आरोग्यसेवा, कन्नड भाषा विकास आणि शासन यासारख्या क्षेत्रांमध्ये नवनवीन संशोधन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या कृतीमुळे विविध क्षेत्रात मोठया प्रमाणात रोजगार निर्माण झाला. या क्षेत्रात इंटरनेटने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

आणखी एक महत्वाचा विकास म्हणजे भारत सरकार आणि कर्नाटक सरकारने संयुक्तपणे सायबर पार्क प्रकल्प सन 2000 मध्ये सुरू केला. युवाडॉटकॉमची सात केंद्रांवर पुरेशी अंमलबजावणी करण्यात आली आहे. कन्नड भाषेच्या विकासास मदत करणाऱ्या तंत्रज्ञानासाठी विशिष्ट संकेत चिन्ह असणारा की बोर्ड (Key Board) तयार करण्यात आला.

माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विविध वर्गातील लोकांचे सामाजिक सक्षमीकरण करण्याची कल्पना आहे. आज संपूर्ण जगाने माहिती तंत्रज्ञानावर अवलंबून रहावे अशी परिस्थिती आपण पाहत आहोत.

उपक्रम : कर्नाटकातील महत्वाच्या माहिती तंत्रज्ञान (IT) संस्थांची यादी तयार करा.

जैवतंत्रज्ञान क्रांती

20व्या शतकाच्या उत्तरार्धात माहिती तंत्रज्ञान आणि जैविक तंत्रज्ञान क्षेत्रात बदलाव करण्याची मोठी क्रांती सुरु झाली. सजीवांच्या गुणवैशिष्ट्यांचा उपयोग

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

करून उपयुक्त उत्पादन मिळविण्याच्या प्रक्रियेला जैवतंत्रज्ञान असे म्हणतात. अलिकडच्या दशकामध्ये कर्नाटक हे जैवतंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले आहे. प्राचीन काळापासून, जैवतंत्रज्ञान उपयोजित स्वरूपात वापरले जात होते. तथापि 20 व्या शतकात विज्ञानाची एक वेगळी शाखा म्हणून ती वाढली.



बायोकॉन कंपनी

जैवतंत्रज्ञानात विविध शाखा विकसित होत आहेत. याच्या काही शाखा जनुकीय तंत्रज्ञान, डी.एन्.ए. फिंगरप्रिंट, (DNA Finger Printing) टिश्यू कल्चर क्लोन इ. आहेत. 1997 मध्ये विल्मर नावाच्या शास्त्रज्ञाने जगातील पहिली संकरीत प्राणी मेंढी (डॉली) तयार केली. नंतर आणखी बरेच संकरीत प्राणी तयार केले गेले.

आज इंधनाची टंचाई एक गंभीर समस्या आहे. लोकांना इंधनाचे गगनाला भिडलेले दर परवडत नाहीत. त्यामुळे जैवइंधन निर्मितीसाठी संशोधन सुरू आहे.

कृषी क्षेत्रात जैवतंत्रज्ञानाचा समावेश करण्याचे प्रयत्न वेगाने सुरू आहेत. कर्नाटकमध्ये सुद्धा हे सर्व सुरू आहेत. बेंगळूरू आणि धारवाड येथील कृषी विद्यापिठामध्ये बायोटेक्नॉलॉजी पार्कची स्थापना करण्यात आली आहे. तसेच किनारी प्रदेशात जैविक संसाधनांचा वापर करण्यासाठी कारवारमध्ये जैवतंत्रज्ञान केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. धारवाडमध्ये कृषी जैवतंत्रज्ञान संस्था स्थापन करण्यात आली आहे. बायोकॉन - सारख्या मोठया कंपन्या खाजगी क्षेत्रात कार्यरत आहेत. या सर्व घडामोडींचा आपल्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेवर दूरगामी परिणाम होत आहेत.

उपक्रम : इंधन समस्यांबद्दल अधिक माहिती गोळा करा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कर्नाटकातील कृषी विकास

पृथ्वी ही नैसर्गिक संसाधने जसे की जमीन, पाणी, खनिज, जंगल आणि ऊर्जा संसाधनाचे संयोजन आहे. ज्याचा कार्यक्षमतेने वापर केल्यास विकास केला जाऊ शकतो. भारतातील बहुतांश कुटुंबे उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. कर्नाटक राज्य ही त्याला अपवाद नाही.

व्यवसाय आपल्याला आवश्यक अन्नधान्य पुरवतो. उद्योगासाठी कच्च्या म ालाचा पुरवठा करतो. यामुळे रोजगाराच्या संधी, औद्योगिक उत्पादनासाठी बाजारपेठ, दरडोई उत्पन्न आणि राष्ट्रीय उत्पन्न वाढते. या सर्व दृष्टीकोनातून शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा गाभा आहे.

कर्नाटक राज्याचा विस्तार सुमारे 1,90,000 चौ.कि.मी. आहे. जमीन क्षेत्रफळाच्या बाबतीत कर्नाटक हे भारतातील सातवे मोठे राज्य आहे.

या जमिनीचा वेगवेगळ्या कामासाठी वापर केला जात आहे. कर्नाटकात सुमारे 19 दशलक्ष 190.50 लाख हेक्टर जमीन आहे परंतु त्यातील केवळ 11 दशलक्ष हेक्टर क्षेत्रच लागवडीस योग्य आहे. लागवडीसाठी आदर्श क्षेत्र एकूण जमिनीच्या सुमारे 58% आहे. बिगरशेती जमीन शेकडा 13.23% आणि अरण्य प्रदेश शेकडा 16.1% आहे.

उपक्रम : कर्नाटकातील 19% जमीन नापीक आहे. ही सुधारण्यासाठी कोणती पावले उचलता येतील, यावर चर्चा करा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृषी विकासासाठी केलेल्या उपाययोजना

1. सिंचन व्यवस्था : कर्नाटकामध्ये कृषी उत्पादनाचा विकास सक्षम करण्यासाठी सरकारने अनेक सिंचन प्रकल्प हाती घेतले आहेत. तुंगभद्रा योजना, कृष्णा योजना, भद्रा योजना, घटप्रभा योजना, मलप्रभा योजना, हेमावती, हारंगी, वाणीविलास, कारंजा, वाराही बेण्णेतोरे आणि हिप्परगी इ. प्रमुख आहेत. उपलब्ध पाण्याचा शास्त्रोक्त वापर करण्यासाठी अनेक सुधारणांची गरज आहे.

2011 च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार कर्नाटक कृषी उत्पादनात पाचव्या स्थानावर आहे.

2. मातीच्या संवर्धनावर भर : वारा, पाऊस आणि पूर यासारख्या नैसर्गिक प्रक्रियामुळे मातीचा वरचा भाग नष्ट होणे याला मातीची झीज म्हणून ओळखले जाते. जमिनीची धूप जंगलतोड, चुकीच्या शेती पद्धतीमुळे देखील होते. या संकटातून शेतकयांना वाचवण्यासाठी कर्नाटक सरकारने अनेक मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. रेडिओ आणि दूरदर्शनवर प्रसारित होणाऱ्या कृषीरंग कार्यक्रमांतर्गत शेतकयांना माहिती देणारे कार्यक्रम प्रसारित करत आहेत.

3. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन : शेतीमध्ये आधुनिक मशागतीच्या पद्धती अवलंबल्या जात असून उत्पादनात वाढ झाली आहे. रासायनिक खते आणि रासायनिक कीटकनाशकांच्या व्यापक वापरामुळे जमिनीवर अनेक हानिकारक परिणाम होत आहेत. अलिकडच्या परिसर रक्षण आंदोलनांनी सरकारला ही वस्तुस्थिती पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे सेंद्रिय खताच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना केल्या आहेत.

2011 मध्ये शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांची संख्या 49% होती.

उपक्रम : स्थानिक पारंपरिक शेती पद्धतीची वैज्ञानिक शेती पद्धतींशी तुलना करा आणि चांगले मुद्दे तयार करा. कर्नाटकाचे प्रगतीशील शेतकरी श्री प्रफुल्लचंद्र यांच्याबद्दल माहिती गोळा करा.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS



सेंद्रिय पध्दतीची शेती

औद्योगिक विकास

राज्याच्या आर्थिक विकासात उद्योगांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उद्योगांचे तीन गटामध्ये वर्गीकरण केले आहे. लघुउद्योग, मध्यम उद्योग आणि मोठे उद्योग. या उद्योगांना मदत करण्यासाठी विविध कारखाने आणि उद्योगांची स्थापना आणि वाहतूक, दळणवळणाच्या सुविधा विकसित करण्याच्या प्रक्रियेला 'औद्योगिकरण' म्हणतात. ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. नवीन उद्योग आणि कारखाने उभारले जात आहेत. त्यांना तशा मूलभूत सुविधा पुरविल्या पाहिजेत. (उदा. इलेक्ट्रिकची सुविधा, वाहतूक,दळणवळण इ.) कर्नाटकाने या दिशेने चांगली प्रगती केली आहे. मात्र विजेची मागणी पूर्ण करण्यात ते असमर्थ ठरले आहे.

अलीकडच्या काळात कर्नाटकात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या स्थापन झाल्या आहेत. कर्नाटकातील मुख्य उद्योग पुढील प्रमाणे आहेत.

- लोह आणि पोलाद उद्योग
- अल्युमिनियम उद्योग
- कापड उद्योग
- रेशीम उद्योग
- साखर उद्योग
- कागद उद्योग
- इलेक्ट्रॉनिक्स उद्योग
- सिमेंट उद्योग इत्यादी

हे उद्योग केवळ रोजगाराच्या संधीच निर्माण करत नसून तर परकीय चलनही मिळवतात. उद्योग आणि तीच्या वाढीमध्ये सामंजस्य आणि समतोल साधण्याची गरज आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गृह आणि लघुउद्योगांचे महत्व

गृह आणि लघुउद्योग हे कर्नाटकाच्या अर्थव्यवस्थेचे प्राण आहेत. राज्याच्या आर्थिक विकासाचे हे आधारस्तंभ आहेत. महात्मा गांधीजींच्या मते 'गृह आणि लघुउद्योग हे देशाला प्रगतीच्या मार्गावर नेणारे पथदीप आहेत'. कर्नाटक सरकार गृह आणि लघुउद्योगांना विविध मार्गानी प्रोत्साहन आणि मदत करत आहे. या दिशेने अनेक विकास मंडळे स्थापन केली आहेत. उदा. नारळ विकास मंडळ, काजू विकास मंडळ इ.

उपक्रम : गृह उद्योगांना बळ देण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची चर्चा करा.

औद्योगिक धोरण

सार्वजनिक आणि खासगी दोन्ही क्षेत्रात उद्योगांची स्थापना, भांडवली गुंतवणूक, औद्योगिक कर, कामगार वापर आणि त्यांचे संरक्षण या सर्व गोष्टी औद्योगिक धोरणात समाविष्ट आहेत. 1948 मध्ये केंद्र सरकारने मांडलेल्या धोरणांच्या अनुषंगाने कर्नाटकची औद्योगिक धोरणे तयार झाली. राज्याचे औद्योगिक धोरण उपलब्ध साधनांवर आधारित आहे. 1956, 1977 आणि 1980 मध्ये केंद्र सरकारांनी प्रमुख औद्योगिक धोरणे लागू केली.

उपक्रम : तुमच्या गावाशेजारील औद्योगिक केंद्राला भेट द्या आणि तेथील कार्याचे निरीक्षण करा.

कर्नाटक सरकारने 1996 मध्ये स्वत:चे औद्योगिक धोरण ठरवले. यामध्ये पायाभूत सुविधांच्या विकासात उद्योगांच्या सक्रीय सहभागावर अधिक भर देण्यात आला आहे.

तंत्रज्ञान पार्क, विमानतळ इ. सुविधा निर्मितीसाठी सरकारने योजना आखल्या आहेत. सन 2001 मध्ये नवीन औद्योगिक धोरण अंमलात आणले. ज्याद्वारे बाजारपेठेचा विकास, तांत्रिक उद्योगामध्ये सुधारणा, फलोत्पादन, पशुसंवर्धन, खनिज आणि मानव संसाधनांचा विकास इत्यादींना चालना दिली. आता कर्नाटक औद्योगिक धोरण 202-2025 लाग आहे.

पर्यावरणाचा नाश न करता, पर्यावरणाचे प्रदूषण न करता नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून समाजाच्या विकासाला पूरक ठरतील. याव्यतिरिक्त या गोष्टींकडे दुर्लक्ष करून होणारा औद्योगिक विकास मानव जातीला मारक ठरेल.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

उद्योगधंद्यातील घडामोडी मानवी जीवनाला पूरक आहेत की नाहीत याची खात्री करणे हे सरकारचे व आपले कर्तव्य आहे.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :

1. बेंगळूरूला भारताचे _____ शहर म्हणतात.
2. जगातील पहिली संकरीत प्राणी _____
3. 'गृहउद्योगच देशाला प्रगतीच्या मार्गावर नेणारे पथदिप आहेत' असे _____ यानी म्हटले.

II. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.

4. संपर्क माध्यम म्हणजे काय ?
5. संपर्क माध्यमाचे तीन प्रकार कोणते ?
6. माहिती तंत्रज्ञान म्हणजे काय ?
7. जैवतंत्रज्ञान म्हणजे काय ?
8. कर्नाटकातील कोणत्या जिल्हयात जैव तंत्रज्ञान पार्क आहे ?
9. सेंद्रीय शेतीचे महत्व समजावून सांगा.
10. मातीची धूप म्हणजे काय ?

उपक्रम:

कर्नाटक सरकारने 1996 मध्ये तयार केलेल्या औद्योगिक धोरणांची अधिक माहिती गोळा करा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

नागरिकशास्त्र

पाठ 22 न्यायांग

T6Z4L7

पाठाचा परिचय

हा पाठ कायदा आणि न्यायव्यवस्थेशी संबंधित आहे. या पाठात सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीशाची पात्रता आणि कार्य; त्याच बरोबर कनिष्ठ न्यायालये आणि लोक अदालत यांच्या कार्याची माहिती दिलेली आहे.

सामर्थ्य

1. राज्य शासन व्यवस्थेत, कायदा आणि न्यायव्यवस्था बजावत असलेल्या भूमिकेची प्रशंसा करणे.
2. न्याय व्यवस्था (न्यायालये) ही कार्यांग व शासकांगाच्या दबावाला बळी न पडता स्वतंत्र व नि:पक्षपातीपणे आपले कार्य करतात याची जाणीव करून देणे.
3. भारतीय न्यायव्यवस्थेबद्दल गौरव व्यक्त करणे.
4. लोकअदालतीविषयी अधिक माहिती संग्रहीत करणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कायद्याप्रमाणे न्यायनिवाडा करण्याच्या व्यवस्थेला 'न्यायव्यवस्था' असे म्हणतात. कायदे आणि न्याय व्यवस्था राज्याच्या प्रशासन व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात.

- जेव्हा लोक एकाच ठिकाणी एकत्र राहतात तेंव्हा त्यांच्यात संघर्ष होणे, वाद होणे स्वाभाविक आहे. जर त्यांना त्यांच्या वादावर तोडगा काढता आला नाही तर तिसरी व्यक्ती त्यांचे म्हणणे ऐकून निर्णय देऊ शकते.
- न्यायनिवाडा करण्यासाठी कायद्यांची रचना करण्यात आलेली आहे. व्यक्तीच्या बाह्यवर्तनावर नियंत्रण ठेवणारे नियम म्हणजे कायदे. कायदे हे गुन्हेगारी आणि गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवतात. समाजात शांती, शिस्त आणि सुव्यवस्था अबाधित राखतात. त्याचबरोबर नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करतात.

न्यायालयाची कार्ये : न्यायालय शासकांगाने (कायदे मंडळ) तयार केलेल्या कायद्याचा अर्थ व त्याचे स्पष्टीकरण करते. व्यक्ती व्यक्तीमधील वाद, व्यक्ती आणि सरकार यांच्यातील वाद, यासंदर्भात न्याय निवाडा करून निर्णय देण्याचे कार्य न्यायालये करतात. नागरिकांचे प्राण, संपत्ती आणि मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याचे प्रमुख कार्य न्यायालये करतात. न्यायालये शासकांग आणि कार्यांगाच्या दबावाला बळी न पडता स्वतंत्र आणि नि:पक्षपाती पणे आपले कार्य करतात.

सर्वोच्च न्यायालय

आपल्या देशाच्या संविधानात देशाची एकता व अखंडता राखण्याच्या दृष्टीने संपूर्ण देशाला लागू होणाऱ्या न्यायव्यवस्थेची तरतूद केली आहे. सर्वोच्च न्यायालय (Supreme Court) हेच देशाचे अती उच्च न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश सह 34 न्यायाधीश असतात, यांची नेमणूक राष्ट्रपती करतात. सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे आहे.



सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची पात्रता

- किमान 5 वर्षे कोणत्याही उच्च न्यायालयामध्ये न्यायाधीश म्हणून कार्य केलेले असावे.
- किमान 10 वर्षे उच्च न्यायालयात वकिली केलेली असावी.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

- राष्ट्रपतींच्या मते एक प्रसिद्ध, प्रतिष्ठीत कायदे तज्ञ असावा न्यायाधीशांचे निवृत्ती वय 65 वर्षे असावे.

सर्वोच्च न्यायालयाची कार्ये

- केंद्र व राज्य पातळी वरील तसेच राज्यांतर्गत वाद सोडविणे.
- नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विविध रिट (लेखी, स्थगिती) आदेश जाहीर करणे.
- संविधानातील तरतूदींचा अर्थ लावणे.
- राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागितल्यास, अभिप्राय मागितल्यास तो देणे.
- आवश्यक नियमावली तयार करणे.

उच्च न्यायालये

उच्च न्यायालय हे राज्यातील अतिउच्च न्यायालय होय. कर्नाटकाचे उच्च न्यायालय (हायकोर्ट) बेंगळूरू येथे आहे. उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश असतात. आपल्या देशात एकूण 25 उच्च न्यायालये आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS



कर्नाटकाचे उच्च न्यायालय, बेंगळूरू

उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची पात्रता

• भारताचा नागरिक असावा • किमान 10 वर्षे भारतीय न्यायालयांमध्ये वकिली केलेली असावी, अथवा 10 वर्षे उच्च न्यायालयात वकिली केलेली असावी.

भारताचे राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि राज्यपाल यांच्याशी सल्लामसलत करून उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती करतात. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय 62 वर्षे आहे. उच्च न्यायालयात इंग्रजी किंवा इतर प्रादेशिक भाषेचा वापर करू शकतो.

उच्च न्यायालयाची कार्ये

- नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी विविध रिट (लेखी, स्थगिती) आदेश जारी करणे.
- कनिष्ठ न्यायालयाच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, त्यांच्या योग्य कार्यवाहीसाठी नियमावली तयार करणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

विविध पातळीवरील न्यायालये

सर्वोच्च न्यायालय ..... राष्ट्रीय स्तर (नवी दिल्ली)

उच्च न्यायालय ..... राज्य स्तर

कनिष्ठ न्यायालये ..... जिल्हा न्यायालय, मॅजिस्ट्रेट न्यायालय, कनिष्ठ मॅजिस्ट्रेट न्यायालय, लोक अदालत

कनिष्ठ न्यायालये

सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाव्यतिरिक्त भारतीय न्यायव्यवस्थेत अनेक कनिष्ठ न्यायालये आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या अखत्यारीत उच्च न्यायालय कार्य करते. तसेच उच्च न्यायालयांच्या अखत्यारीत जिल्हा, तालुका व नगर न्यायालये कार्य करतात.

कनिष्ठ न्यायालये दोन प्रकारची आहेत -

1) दिवाणी न्यायालय (Civil), 2) फौजदारी न्यायालय (Criminal) दिवाणी न्यायालये पैसा, मालमत्तेशी संबंधित व्यवहार आणि इतर प्रकरणांशी संबंधित विवादांची चौकशी करून निर्णय देतात. फौजदारी न्यायालये खून, चोरी- दरोडा यासारख्या प्रकरणांशी संबंधित चौकशी करून निर्णय देतात.

काही संदर्भात कनिष्ठ न्यायालयांनी दिलेल्या निकालांविरुद्ध उच्च न्यायालयात दाद मागता येते तसेच उच्च न्यायालयांनी दिलेल्या निकालाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते.

लोक अदालत (जनता न्यायालय)

सरकारने इतर प्रकारच्या कायदेशीर संस्था स्थापन केल्या आहेत. त्या जलद कार्य करतात. तडजोडीद्वारे प्रकरणे निकाली काढतात आणि कमी खर्चिक असतात. अशीच एक संस्था म्हणजे लोक अदालत (जनता न्यायालय).

राज्य आणि जिल्हास्तरीय अधिकारी वेळोवेळी सोयीस्कर ठिकाणी लोक अदालती आयोजित करतात. परस्पर सामंजस्याने सोडविण्यास सहमत असणाऱ्या दोन्ही पक्षकारांची प्रकरणे लोकअदालती कडून सोडविली जातात. लोक अदालतींनी दिलेला निकाल हा न्यायालयांनी दिलेल्या निकाला इतकाच योग्य असतो, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

लोक अदालतींचा निर्णय अंतिम असून दोन्ही पक्षांना बंधनकारक असतो. त्यामुळे वेळ आणि पैसा वाचतो, होणारे नुकसान टाळता येते. या निकाला विरुद्ध कोणत्याही न्यायालयात अपिल करता येत नाही. जर एखाद्याला तडजोड करण्यास सहमती देण्यासाठी धमकावले गेले असेल तर त्वरीत पोलीसांकडे तक्रार नोंदविता येते आणि गुन्हा दाखल करता येतो.

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

लोक अदालतीनी आतापर्यंत अनेक प्रकरणे निकालात काढलेली आहेत. लोक अदालतींचा योग्य रितीने वापर केल्यास ती खूपच उपयुक्त न्यायालये ठरू शकतात.

नवीन शब्द : तक्रार - भांडण, कलह. नोंदणी - दाखल करणे

तुम्हाला माहीत असू द्या :
भारताच्या राष्ट्रपतींना त्यांच्या कार्यकाळात अटक केली जाऊ शकत नाही त्यांच्यावर कोणताही फौजदारी खटला दाखल करता येणार नाही त्यांच्या निर्णयावर कोणत्याही न्यायालयात प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही.

जनहित याचिका (P.I.L): जर सरकार किंवा सार्वजनिक संस्था कायद्याचे उल्लंघन करीत असेल किंवा नागरिकांची दडपशाही, शोषण करीत असेल, अन्याय करीत असेल तर अशा उल्लंघनाला बळी पडलेले नागरिक थेट न्यायालयात तक्रार करू शकतात, अशा तक्रारीचे पत्र न्यायालयात रिट अर्ज म्हणून घेतले जाते. कोणतेही शुल्क न आकारता, कोर्ट तक्रारीची चौकशी करते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :

1. देशाचे अतिउच्च न्यायालय _____.
2. सुप्रिम कोर्टाच्या न्यायाधिशांचे निवृती वय _____
3. देशामध्ये एकूण _____ उच्च न्यायालये आहेत.
4. सुप्रिम कोर्टाच्या न्यायाधिशांची नेमणूक _____ करतात.

II. गटात चर्चा करून उत्तरे लिही.

5. न्यायालयाची प्रमुख कार्ये कोणती ?
6. देशातील अति उच्च न्यायालय कोणते ?
7. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची पात्रता लिहा ?
8. सर्वोच्च न्यायालयाची कार्ये कोणती ?
9. न्यायालयीन विलंब कसा टाळता येईल ?
10. न्यायालयांना अधिक अधिकार द्यावेत की नाही ?

उपक्रम:

1. तुमच्या शाळेत कायदा जागरूकता कार्यक्रम आयोजित करा.
2. स्थानिक वकिलांना शाळेत निमंत्रित करून, कायद्यांविषयी अधिक विस्तृतपणे जाणून घ्या
3. शाळेत न्यायालयाचे कार्य प्रात्यक्षिक रूपात सादर करा.
4. स्थानिक न्यायालयाला भेट देऊन तेथील वाद विवादांचे निरीक्षण करा.
5. 'मी सर्वोच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश झालो तर/झाले तर' या विषयावर एक किंवा दोन मिनिटे बोलण्यास विद्यार्थ्यांना संधी द्या.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 23 आपली संरक्षण दले

I3V6P1

तुम्हाला माहीत आहे की, स्वातंत्र्यापूर्वी भारतावर अनेक आक्रमणे झाली आहेत. पण स्वातंत्र्यानंतर आपण पाहतो आहोत, परिस्थिती बदललेली आहे. या बदलामागची कारणे तुम्हाला माहीत आहेत का ?

पाठाचा परिचय

या पाठात आपल्या संरक्षण दलातील विभाग, त्यांचे कार्य, प्रशिक्षण केंद्र, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे केंद्र कचेरी इत्यादींचा परिचय करून देण्यात आला आहे. त्याचबरोबर पूरक रक्षण दले, सहाय्यक रक्षण दले आणि नागरिक रक्षण दलाबाबत या पाठात माहिती दिली आहे.

सामर्थ्ये

1. आपल्या संरक्षण दलाबाबत समजून घेणे.
2. भूसेना, नौकादल आणि वायूसेने बाबत जाणून घेणे
3. संरक्षण दलांच्या सामर्थ्याविषयी जाणून घेणे.
4. पूरक संरक्षण दलाच्या कार्याविषयी जाणून घेणे, अभिमान बाळगणे
5. सहाय्यक सेवादलाच्या स्वयंसेवेबद्दल अभिमान बाळगणे

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

देशाचे परकीय आक्रमणापासून रक्षण करणे हे राष्ट्राचे प्रथम कर्तव्य आहे. हे कार्य संरक्षण दलाकडे कायम स्वरूपी सोपविले आहे. त्यामुळे संरक्षण दलांची भूमिका फार महत्वाची आहे.

भारतात शिस्तप्रिय, सामर्थ्यवान आणि पराक्रमी संरक्षण दले आहेत. ही अभिमानाची गोष्ट आहे. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाच्या अखडतेचा प्रश्न उद्‌भवल्यानंतर समर्थपणे त्याचा सामना केला आहे. (चीन आणि पाकिस्तान यानी केलेले आक्रमण) आपल्या संरक्षण दलानी मातृभूमीसाठी सर्वस्व पणाला लावून, त्याग करण्याची सिद्धता कारगील युद्धात प्रदर्शित केली आहे.



या चित्रात तुम्हाला काय दिसते?

- भारतीय सीमारेषा 15,200 कि.मी. असून 7516.60 कि.मी. जल सीमा रेषा आहे.
- देशाच्या संरक्षणासाठी आर्थिक संकल्पाचा शेकडा 25-30 इतका भाग राखीव ठेवला जातो.


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

संरक्षण दलाची जबाबदारी

- देशाच्या सीमारेषेचे रक्षण करणे.
- देशाची एकात्मता अबाधित राखणे.
- चोरीच्या मालाची ने आण तसेच इतर बेकायदेशीर कार्याला आळा घालणे.

भारताचे राष्ट्रपती हे आपल्या संरक्षण दलांचे मुख्य होत. त्याना आमच्या संरक्षणाचा सर्वोच्च अधिकार दिलेला आहे. संरक्षण व्यवस्था तीन विभागात विभागली आहे. भूसेना, नौकादल आणि वायुसेना. ही संरक्षण दले स्वातंत्र्योत्सवात आणि प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये भाग घेऊन आपले सेना सामर्थ्य प्रदर्शित करतात.

संरक्षण दलात स्वत:चे सामर्थ्य वृद्धींगत करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे आहेत. 1. राष्ट्रीय संरक्षण कॉलेज, नवी दिल्ली. 2. संरक्षण सेवा नोकर प्रशिक्षण केंद्र उदकमंडल, 3. भारतीय मिलीटरी अकादमी डेहराडून. 4. राष्ट्रीय संरक्षण अकादमी-खडकवासला, पुणे.



भूसेनेचे चिन्ह

भारतीय भूसेना

भारताची भूसेना ही जगात दुसऱ्या क्रमांकाची मोठी भूसेना आहे. भूसेनेचे सैनिक, अश्वदल, उंटदल, तोफदल आणि रणगाड्यानी सुसज्जीत आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भूसेनेत एकूण 12,37,117 योद्धे आहेत. 9,60,000 राखीव सैन्य दल आहे.

भूसेनेच्या प्रमुखाला फिल्डमार्शल (जनरल) असे म्हणतात. सेनेचे नियंत्रण प्रशिक्षण, कार्यभार आणि व्यवस्था नवी दिल्लीतील भूसेनेच्या मुख्य कचेरीतून चालवतात.

देशाच्या सीमारेषेच्या रक्षणाबरोबर नैसर्गिक आपत्ती जसे भूकंप, पूर, दुष्काळ, दरड कोसळणे इत्यादी प्रसंगी भूसेना मानवीय कार्य पार पाडते. भूसेना तांत्रिकदृष्ट्या सुधारित व्यवस्था आहे.

भारतीय नौकादल

किनारपट्टीच्या आणि बेटांच्या रक्षणासाठी नौकादलाची आवश्यकता आहे. भारताचे नौकादल जगात सहाव्या क्रमांकाचे मोठे नौकादल आहे. नौकादलाच्या

प्रमुखांना ॲडमिरल असे म्हणतात. नौकादलाची मुख्य कचेरी नवी दिल्ली येथे आहे.

नौकादलात आधुनिक पद्धतीच्या क्षेपणास्त्रधारी जहाजे आणि पाणबुड्यांचा समावेश आहे. त्यापैकी आय. एन. एस. विभूती आणि आय एन. एस. गोदावरी प्रमुख आहेत. आय एन. एस. विराट आणि आय. एन. एस. विक्रमादित्य यासारखी विमानवाहू जहाजे सुसज्जीत आहेत. कर्नाटकातील कारवार येथे सी बर्ड नावाचा नाविक तळ स्थापन केला आहे.



नौकादलाचे चिन्ह


आय. एन. एस. विक्रमादित्य

© MKTBS NOT TO BE REPUBLISHED

भारतीय वायुसेना



वायूसेनेचे चिन्ह


युद्ध विमान

भारतीय वायुसेना जगात चौथ्या क्रमांकाची मोठी वायूसेना आहे. वायूसेनेच्या प्रमुखाला एअरचीफ मार्शल म्हणतात. त्यांची प्रमुख कचेरी नवी दिल्ली येथे आहे. अनुकूल कारभारासाठी वायूसेनेचे सात विभाग केले आहेत.

बेंगळूरू, हैदराबाद तेलंगणा आणि डींगल (तमिळनाडू) मध्ये वायूसेनेची मुख्य प्रशिक्षण केंद्रे आहेत. वायूसेनेने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक नवीन युद्धविमाने शस्त्रसज्ज ठेवली आहेत.



मिग युद्ध विमान

आपल्या वायूसेनेत जाग्वार, राफेल सारख्या आधुनिक युद्धविमानांचा समावेश आहे. यात एकूण 1,00,000 इतके सैनिक, 1330 युद्ध विमाने आहेत. बलाढ्य आणि सामर्थ्यवान वायूसेना हा आम्हा सर्वांच्या अभिमानाचा विषय आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

निमलष्करी संरक्षण दले

देशाच्या संरक्षण दलाव्यतिरिक्त काही वेगवेगळ्या संदर्भात निमलष्करी संरक्षण दले कार्य करतात.

• **सीमा सुरक्षा दल (Border Security Force):** भारताच्या सीमांचे रक्षण करणे हे सीमा सुरक्षा दलाचे मुख्य कार्य होय. कारगीलच्या युद्धात सीमा सुरक्षा दलाचे सैन्य पर्वताच्या उंचीपर्यंत जाऊन भारतीय सैन्याबरोबर लढले. 'मरणापर्यंत कर्तव्य' (Duty until death) हे त्यांचे घोषवाक्य आहे.

• **सीमा रस्ते संघटना (Border Roads Organisation) :** सीमाभागातील रस्ते तयार करून सैनिकाना सहाय्य करणे तसेच बंद असलेले रस्ते खुले करुन देणे या संघटनेचे प्रमुख कार्य आहे. रस्ते निर्माण करणे, पूल निर्माण करणे आणि खंदक निर्माण करणे अशी कामे ही संघटना करते.



सीमा सुरक्षा दल

• **तटरक्षक दल (coast Guards) :** हे आणखी एक निमलष्करी दल आहे. यांचे कार्यालय नवी दिल्ली येथे आहे. किनारपट्टीचे रक्षण करणे हे यांचे मुख्य कर्तव्य आहे. वादळ, चक्रीवादळ, त्सुनामी - यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी रक्षण कार्य हाती घेतात. घुसखोरी रोखणे, चोरून होणारी मालाची ने आण रोखणे हे यांचे प्रमुख कार्य होय.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



तटरक्षक दल

तटरक्षक दलामध्ये 1402 अत्याधुनिक जहाजे आणि 381 विमाने तसेच 60 हेलीकॉप्टरांचा समावेश आहे. 12,585 सैनिक तटरक्षक दलात आहेत.

• **केंद्रीय औद्योगिक संरक्षण दल (Central Industrial Security Force) :** हे जगातील सर्वात मोठे औद्योगिक संरक्षण दल आहे. 1,45,000 सैनिक यात आहेत. हे दल देशातील सुमारे 300 पेक्षा जास्त सरकारी, खासगी उद्योगधंदे आणि प्रयोगालयांना संरक्षण देतात. याशिवाय विमान तळ, बंदरे, रेल्वे स्टेशन, ऐतिहासिक स्मारके आणि अणुऊर्जा केंद्राना संरक्षण देतात.

सहाय्यक रक्षण सेवा

देशातील युवकामध्ये सेवा आणि देशप्रेम वाढविण्यासाठी शाळा व महाविद्यालयामध्ये अनेक कार्यक्रम हाती घेतले जातात. त्यापैकी एन.सी.सी. एक प्रमुख होय.

• **एन. सी. सी. (National Cadet Corps):** सामुहीक जीवनातील प्रामुख्यता, नायकत्व इत्यादी गुण एन.सी.सी. शिकविते. हे प्रशिक्षण घेणाऱ्याना सैन्यात भरती होताना विशेष प्राधान्य देण्यात येते. उच्च शिक्षण घेणाऱ्यांना यामध्ये राखीवता मिळते. शाळा व महाविद्यालयातील युवक व युवती एन.सी.सी. मध्ये प्रवेश घेऊ शकतात. एकूण राष्ट्र रक्षणाचे बीजारोपण हा याचा प्रमुख उद्देश होय. 'शिस्त व एकता' हे यांचे ध्येयवाक्य आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



एन. सी. सी. कॅडेट

• **भारतीय रेडक्रॉस संस्था (Indian Red Cross Society)**: भारतातील 1100 जिल्हयामध्ये रेडक्रॉस संस्थेच्या शाखा कार्यरत आहेत. राष्ट्रपती याचे अध्यक्ष असतात. 'मानवता व स्वयंसेवा' हे रेडक्रॉसचे मुख्य ध्येय आहे.



रेडक्रॉसचे चिन्ह

• **नागरिक पोलीस दल (Civil Defence)** पोलीस दल राज्य आणि केंद्रीय पातळीवर आहेत. राज्य पोलीस दलाची व्याप्ती राज्यापर्यंत मर्यादित असते. केंद्राने स्वत:चे पोलीसदल स्थापन केले आहे.

राष्ट्रीय संरक्षण दल : राष्ट्रीय संरक्षण दल हे महनीय व्यक्तींना संरक्षण देते. आतंकवादाचे निर्मूलन करण्यास तसेच देशांतर्गत सुरक्षा आणि शांतता प्रस्थापित करण्यास महत्व देते. बाँब शोधक पथक याला सहाय्य करते.

• **गृहरक्षक दल (Home Guards):** हे पोलीस दलाला सहाय्यक म्हणून कार्य करते इतर कार्ये: आंतरिक शांतता प्रस्थापित करणे व आणीबाणीची स्थिती तसेच नैसर्गिक आपत्तीच्यावेळी सहाय्य करणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुम्हाला माहीत असू द्या

भूसेनेचे प्रमुख सैन्याधिकारी : जनरल, लेफ्टनंट जनरल, मेजर जनरल, ब्रिगेडीयर, कर्नल, लेफ्टनंट कर्नल, मेजर, कॅप्टन आणि लेफ्टनंट. नौसेना आणि वायूसेनेमध्ये सुद्धा या प्रमाणेच सेनाधिकाऱ्यांचे रँक आहेत. तिन्ही संरक्षण दलाच्या प्रमुखाला 'संरक्षण कर्मचारी प्रमुख' (Chief of Defence staff) असे म्हणतात.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :

1. संरक्षण दलाचे सर्वोच्च अधिकारी _____.
2. भूसेनेच्या प्रमुखांना _____ म्हणतात.
3. भूसेनेचे मुख्य कार्यालय _____ येथे आहे.
4. N.C.C चे ध्येय वाक्य _____ हे आहे.

II. गटात चर्चा करून खालील उत्तरे लिही.

5. संरक्षण दलाचे विभाग कोणकोणते ?
6. भूसेनेचे मुख्य कार्य कोणते ?
7. सीमा रस्ते संघटनेचे कार्य कोणते ?
8. रेडक्रॉस संघटनेचे ध्येय कोणते ?
9. संरक्षण दलात तुला सेवा करावीशी वाटते का? कारणे लिही.

चर्चा करा.

1. संरक्षण दलाची जवाबदारी समजून घ्या.
2. आम्ही संरक्षण दलात का सेवा केली पाहिजे ?

उपक्रम:

1. तुमच्या गावातील सैनिकाला भेटून शाळेत आमंत्रित करा.
2. संरक्षण दलातील विविध विभागाच्या चिन्हांचा संग्रह करा
3. जवळच्या शाळा महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागास भेट द्या.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 24 भारत आणि शेजारील देश

B5J9C5

पाठाचा परिचय

कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीमध्ये त्यांचे परराष्ट्र धोरण महत्वाची भूमिका बजावते. या पार्श्वभूमिवर भारताचे शेजारील राष्ट्रांशी असलेले संबंध समजून घेता येतील.

सामर्थ्य

1. भारताचे त्यांच्या शेजारील देशांसोबतचे राजनैतिक संबंध जाणून घेणे.
2. शेजारी देशांसोबत भारताच्या शांततापूर्ण संबंधाची प्रशंसा करणे.
3 भारताचे शेजारील देशांशी असलेले आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संबंध जाणून घेणे.
4. शेजारील देशांसोबत सीमा समस्या, युद्धे, दहशतवादी कारवाया, सीमेवरील लोकांच्या समस्या, पाण्याचा वाद अशा सर्व समस्यांचा अर्थ समजून घेणे.
5. शेजारील देशांबरोबर बंधुत्वाची भावना विकसीत करणे.

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

दक्षिण आशियातील आर्थिक व्यवहार मुख्यतः भारतकेंद्रीत आहेत. भारताचा विशाल आकार, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक आणि लष्करी सामर्थ्य यामुळे दक्षिण आशियाई व्यवहारामध्ये भारत महत्वाची भूमिका बजावत आहे.

भारताच्या उत्तरेला चीन, नेपाळ आणि भूतान, पूर्वेला म्यानमार आणि बांगलादेश, वायव्येस पाकिस्तान आणि दक्षिणेला श्रीलंका आहे. हे सात देश भारताचे शेजारी देश आहेत. यांना नकाशात पहा.

भारताला शेजारील देशांसोबत शांतता मैत्रीपूर्ण संबंध आणि सहकार्याचा वारसा आहे. काही शेजारी देशांशी भारताचे अनेक मुद्दयावर मतभेद आणि वाद असले तरी शांततापूर्ण चर्चेद्वारे तोडगा काढण्याची आपल्या देशाची इच्छा आहे.

त्यामुळे शेजारील देशांनी समस्या निर्माण करू नयेत अशी भारताची इच्छा आहे. भारताचे शेजारी राष्ट्रांशी असलेले संबंध जाणून घेऊया.



भारत व शेजारील देश

भारत आणि पाकिस्तान

भारताचा एक भाग असलेला पाकिस्तान 1947 मध्ये एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आला. संघर्षाच्या मुळाशी ही दोन्ही राष्ट्रे उदयास आल्यामुळे या दोन्ही राष्ट्रांमध्ये समेट होऊ शकला नाही. त्यामुळे या दोन देशांमध्ये अनेक समस्या अनुत्तरीत आहेत. त्यापैकी कांही प्रमुख म्हणजे

- काश्मीर वाद
- लष्करी आक्रमण
- दहशतवाद
- पाण्याचा वाद
- अल्पसंख्यांकांना संरक्षण
- व्यापार, वाणिज्य विकास इ.

© @KTBS NOT TO BE REPUBLISHED

काश्मीर प्रश्नामुळे स्वातंत्र्य काळापासून भारत आणि पाक यांच्यातील संबंध बिघडत आले आहेत. आत्तापर्यंत भारत आणि पाकिस्तान यांच्यात चार युद्धे झाली आहेत. [1947, 1965, 1971 आणि 1999] 1948 मध्ये पाकिस्तानने शस्त्रास्त्रांच्या सहाय्याने काश्मीर ताब्यात घेण्याचा प्रयत्न करून काश्मीरच्या कांही भागावर ताबा मिळविला. हा भाग पाकव्याप्त काश्मीर (Pak Occupied Kashmir - POK) म्हणून ओळखला जातो. सुरुवातीपासूनच काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचे भारताने जाहीर केले आहे. या दिशेने अमेरिका द्विपक्षीय धोरण अवलंबत आले आहे. तसेच वेगवेगळ्या कारणासाठी अमेरिका पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरवित आहे.

1962 च्या भारत चीन युद्धानंतर पाकिस्तानने चीनशी घनिष्ठ लष्करी संबंध ठेवले आहेत. पाकिस्तानने जम्मुकाश्मीर राज्यातील सुमारे 2700 चौरस किलो मीटर भूप्रदेश चीनला दिला आहे.

1965 च्या भारत-पाक युद्धात भारतीय सैन्याने पकडलेल्या 80,000 हून अधिक पाकिस्तानी सैनिकांना पाकिस्तानच्या हवाली केले. काश्मीर समस्या भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांच्या शांततापूर्ण संवादातूनच सुटू शकते यावर एकमत झाले.

पाकिस्तानी सैन्य आणि भारत समर्थित पूर्व पाकिस्तान (बांगलादेश) यांच्यात घनघोर युद्ध झाले. सामान्यपणे हे युद्ध भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तिसरे युद्ध म्हणून ओळखले जाते.

• 1971 मध्ये भारत-पाक युद्ध झाले. 1972 मध्ये शिमला येथे शिखर परिषद झाली त्यावेळी श्रीमती इंदिरा गांधी या भारताच्या पंतप्रधान होत्या. या शिखर परिषदेत काश्मीर प्रश्नासह सर्व समस्या चर्चा करून सोडविण्याचा निर्णय घेण्यात आला. याला 'शिमला करार' म्हणतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



कारगिल युद्धात विजयोत्सव साजरा करणारे भारतीय सैनिक

1999 मध्ये झालेल्या कारगिल युद्धानंतर भारताचे तत्कालिन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी अमृतसर ते चाकिस्तानातील लाहोर अशी बस सेवा सूरु

करून दोन देशाचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर झालेल्या आग्रा शिखर परिषदेत त्यांनी दोन्ही देशामध्ये शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. पण शिखर परिषद अयशस्वी ठरली. त्यामुळे पाकिस्तानने दहशतवाद्यांना प्रोत्साहित केले. परिणामी पाक प्रेरीत दहशतवाद्यांनी 13 डिसेंबर 2001 रोजी भारताच्या संसद भवनावर हल्ला केला. त्यामुळे भारत आणि पाकिस्तानमधील संबंध आणखी बिघडले.

आपली संरक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी ही दोन्ही राष्ट्रे सतत स्पर्धा करत असतात. असे असूनही भारत सर्व मतभेद विसरून शेजारील पाकिस्तानशी मैत्रीचा हात पुढे करतो.

उपक्रम: शस्त्रास्त्र संघर्षात भारत आणि पाकिस्तान कसे गुंतले आहेत ? यावर चर्चा करा.


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भारत आणि चीन

भारताच्या शेजारील राष्ट्रामध्ये चीन हा एक मुख्य देश आहे. कारण भारत आणि चीनमधील सीमारेषा खूप लांब आहे. भारताने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत चीनला कायमचे स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. भारताने सुरुवातीपासूनच चीनशी शांततापूर्ण संबंधाची अपेक्षा केली आहेत.

चीन आणि भारत यांच्यातील संघर्षाला तिबेट आणि अरुणाचल प्रदेशाशी संबंधीत असलेले मुद्दे हे मुख्य कारण आहे.

1950 मध्ये चीनने तिबेटमध्ये केलेल्या सशस्त्र कारवायांमुळे भारताची घोर निराशा झाली होती. जेंव्हा चीनने तिबेटीयनांची स्वायत्तत्ता दडपण्याचा प्रयत्न केला. तेव्हा भारताने तिबेटीयनांना पाठिंबा देऊन मानवाधिकाराचे प्रतिपादन केले. परंतू चीनने या सुचनेचा तिरस्कार करून याउलट भारत आपल्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करत असल्याची टिका केली.



दलाई लामा



बैलूकुप्पे येथील बौद्ध मंदिर

1950 मध्ये चीनने तिबेटवर आक्रमण केले आणि लष्करी नियंत्रण मिळविले. याप्रसंगी पराभूत झालेले तिबेटी धर्मगुरु दलाई लामा यांना भारताने आश्रय दिला. त्यांच्याबरोबर हजारो (सुमारे 80,000) तिबेटीयन निर्वासित म्हणून भारतात आले. भारतातील दहा राज्यांमध्ये त्यांचे पुनर्वसन करण्यात आले. मुंडगोड (उत्तरकन्नड) आणि बैलुकुप्पे (म्हैसूर) येथे तिबेटीयनांची वसती केंद्रे आहेत. त्यामुळे अत्यंत असमाधानी झालेल्या चीनने भारताच्या पूर्व सीमेवरील अनेक प्रदेश ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला होता. याला भारताने विरोध केला होता.

उपक्रम: शिक्षकांच्या सोबत मुंडगोड आणि बैलुकुप्पे येथे प्रवासाचे आयोजन करा आणि तिबेटीयनांच्या जीवनशैलीवर आधारीत अहवाल तयार करा, अथवा तिबेटीयनांची जीवनशैली, धर्म याबद्दल माहिती गोळा करा.

चीनी पंतप्रधान चौ- एन-लाय यांनी दिलेल्या भारत भेटी दरम्यान भारताचे पंतप्रधान नेहरू यांच्यासोबत 1954 मध्ये पंचशील तत्वावर स्वाक्षरी केली. पंचशील तत्वाबद्दल तुम्हाला आधीच माहिती आहे.

चीनच्या पाठ्यपुस्तकातील नकाशामध्ये भारताचा बराचसा भाग हा चीनमध्ये दाखविला आहे. त्यामध्ये दुरुस्ती करण्याची मागणी भारताने चीनसमोर ठेवली. चीनच्या पंतप्रधानांनी त्यासाठी सहमती दर्शविली परंतू त्या दृष्टीने कोणतेही बदल केले गेले नाहीत.

© KTPS NOT TO BE REPUBLISHED

तिबेटी समस्येच्या पार्श्वभूमिवर चीनने भारतावर 1962 मध्ये ईशान्य सरहद्दीपासून लडाख (जम्मू आणि काश्मीरचा भाग) पर्यंत जोरदार आक्रमण केले. पण चीनने भारतासोबत एकतर्फी युद्धविराम घोषित केला. यादरम्यान चीनने सुमारे 14671 चौरस मैल इतका प्रदेश ताब्यात घेतला होता. पंचशील तत्त्वांना कारणीभूत असलेल्या नेहरूंचा भ्रमनिरास झाला. दोन्ही देशांमध्ये असलेल्या सीम रेषेवरील परिस्थिती (Line of Actual Control-LAC) आजही यथास्थित अस्तित्वात आहे.

चीनचे पाकिस्तान समर्थक धोरण आणि पाकिस्तान व चीनमधून जाणारे महामार्ग यामुळे भारताची चिंता वाढली आहे.

चीनचे भारतावर आक्रमण

- भारत आणि चीनमधील 3440 कि.मी.ची आंतरराष्ट्रीय सीमारेषा ब्रिटीश इंडियाचे तत्कालिक परराष्ट्र सचिव मॅकमोहन यांनी ओळखली म्हणून या सीमारेषेला मॅकमोहन रेषा असे म्हणतात.
- चीनने 1962 मध्ये पूर्व लडाख (अक्साई चीन) वर आक्रमण करून भारताचा 14671 चौ. कि.मी. प्रदेश स्वतःच्या ताब्यात घेतला. हे चीनचे अतिक्रमण आजही सुरू आहे.
- तसेच भारताचे राज्य असलेल्या अरुणाचल प्रदेशमधील 90,000 चौ. कि. मीटर भूप्रदेशावर चीन आजही आपला हक्क सांगण्याचा प्रयत्न करत आहे.

@KTBS NOT FOR RE PUBLISHED

भारत आणि नेपाळ

नेपाळ हा भारताच्या उत्तरेला हिमालय पर्वत श्रेणीला लागून असलेला देश आहे. सुरुवातीपासूनच भारत आणि नेपाळ यांचे जवळचे संबंध आहेत दोन्ही देशांच्या सीमा जनसंचार आणि मालाची वाहतूक यासाठी कोणत्याही बंधनाशिवाय खुल्या आहेत.

नेपाळ हा भूपरिवेष्ठीत देश असल्याने त्याला भारतामार्फतच इतर देशांशी संपर्क प्रस्थापित करावा लागतो. नेपाळला लागून असलेला आणखी एक देश म्हणजे चीन होय. नेपाळ हा सागरी सीमा नसलेला देश असल्याने नेपाळ नेहमीच भारताशी बंधुत्वाचे संबंध ठेवतो. भारत-नेपाळ संबंध 1950 च्या मैत्री आणि शांतता करारावर आधारित आहेत. वाहतूक, दळणवळण, सिंचन, वीज, वनीकरण, शिक्षण इत्यादी विविध क्षेत्रात भारत नेपाळला विशेष मदत करत आहे.

भारताने 1971 मध्ये भारत नेपाळ करारावर स्वाक्षरी केली. या करारानुसार नेपाळमध्ये विविध वस्तू, साहित्य यांची मुक्तपणे आयात करता येते.

भारत आणि भूतान

1949 मध्ये भारत आाणि भूतानने केलेल्या करारानुसार भारताने भूतानला त्यांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाही असे आश्वासन दिले. भूतानने आपल्या परराष्ट्र व्यवहारात भारताचे मार्गदर्शन घेण्याचे मान्य केले.

भारताने केलेल्या प्रयत्नामुळे भूतानला संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व मिळाले. 1961 पासून 1981 पर्यंत भारताने भूतानच्या आर्थिक विकासात योगदान दिले आणि अनेक योजना पूर्ण करण्यासाठी आर्थिक मदत दिली आहे. भूतान हे सार्कचे सदस्य राष्ट्र आहे.

भारत आणि श्रीलंका

श्रीलंका हे भारताच्या दक्षिणेकडे असलेले एक बेट राष्ट्र आहे. सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी आपले प्रतिनिधी तेथे पाठविले होते. त्यामुळे भारत आणि श्रीलंका यांच्यातील सांस्कृतिक संबंध अधिक दृढ झाले आहेत.

श्रीलंकेत दोन मुख्य वांशिक समुदाय आहेत. एक सिंहली आणि दुसरा तमिळ. सिंहली हे श्रीलंकेचे मूळ रहिवासी आहेत. तमिळ हा तामिळनाडूतून स्थलांतरित झालेला समुदाय आहे. या दोन्ही समुदायामध्ये सतत वाद होत

© KSEB NOT TO BE REPUBLISHED

असतात. श्रीलंकेतील तमिळ लोक त्यांच्या हक्कासाठी आणि स्वतंत्र राज्याच्या स्थापनेसाठी लढत आहेत. दोन दशकाहून अधिक काळ हा संघर्ष सुरु आहे. इतके असूनही भारताची श्रीलंकेशी मैत्रीपूर्ण संबंध कायम ठेवण्याची इच्छा आहे. मतभेद मिटविण्यासाठी भारताकडून शांततापूर्ण तोडगा काढला जात आहे.

पाल्कच्या सामुद्रधुनीमध्ये वसलेल्या कचाटीव बेटावरील आपल्या हक्कासाठी 1974-76 मध्ये भारताने श्रीलंकेसोबत करार केला आहे. तसेच सागरी व्यापाराबाबतही करार केला आहे. 1987 मध्ये श्रीलंका सरकारने देशातील तामिळांचा संघर्ष कमी करण्यासाठी भारताची मदत मागितली. या संदर्भानुसार 1988 मध्ये भारताचे पंतप्रधान असलेले राजीव गांधी आणि श्रीलंकेचे अध्यक्ष जयवर्धने यांच्यात झालेल्या करारानुसार 'भारतीय शांतता दल' (Indian Peace keeping Force-IPKE) श्रीलंकेत पाठविण्यात आले.

श्रीलंकेतील तमिळ समुदायाने भारताच्या या निर्णयाचा विरोध केला. याच पार्श्वभूमीवर राजीव गांधींच्या श्रीलंका दौऱ्यादरम्यान त्यांच्या हत्येचा अयशस्वी प्रयत्न करण्यात आला होता. तथापि श्रीलंकेच्या 'लिबरेशन ऑफ तमिळ टायगर्स इलम' (LTTE) नावाच्या अतिरेकी संघटनेने 21 मे 1991 रोजी राजीव गांधींची हत्या केली. असे असूनही भारताचे श्रीलंकेशी मैत्रीपूर्ण संबंध कायम आहेत. LTTE चे प्रमुख असलेले वेल्लूपिल्लई प्रभाकरन यांच्या हत्येनंतर श्रीलंकेतील तमिळांच्या दहशतवादी कारवाया थांबल्या आहेत. तसेच श्रीलंकेच्या सरकारने आपल्या घटनेच्या चौकटीत राहून या समस्येवर तोडगा काढला पाहिजे. अशी भूमिका घेतली आहे.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

भारत आणि बांगलादेश

बांगला देश हा पाकिस्तानचा भाग होता. त्याचा पूर्व पाकिस्तान म्हणून 1960 पासून स्वतंत्र राष्ट्रासाठी संघर्ष सुरु झाला. शेख मुजबीर रहमान यांच्या नेतृत्वाखाली अवामी लीग मुक्ती चळवळ सुरू केली. पूर्व पाकिस्तानातील मानवी

हक्कांच्या उल्लंघनाच्या पार्श्वभूमीवर भारताचा लष्करी प्रवेश आवश्यक झाला होता. 1971 च्या निर्णायक युध्दात पश्चिम पाकिस्तानचा पराभव होऊन पूर्व पाकिस्तान बांगलादेश म्हणून नवे राष्ट्र उदयास आले.

1972 मध्ये भारत आणि बांगलादेशाचे पंतप्रधान यांची ढाका येथे सभा झाली आणि मैत्री, सहकार्य आणि शांतता यासाठी 25 वर्षांच्या करारावर स्वाक्षरी केली. त्यामुळे दोन्ही देशामधील अनेक समस्यांवर तोडगा निघाला.

चितगांवच्या पर्वतमय प्रदेशातून भारतात स्थलांतर करून आलेल्या चक्मा निर्वासितांची समस्या, अंमली पदार्थांची तस्करी इ. समस्या अद्याप सुटलेल्या नाहीत. बांगलादेशातून भारतात येणाऱ्या लाखो अवैध स्थलांतरीतांची समस्या खूप मोठी आहे. ईशान्य भारतातील अनेक बंडखोर गटांना बांगलादेश आश्रय देत आहे. ही एक गंभीर चिंतेची बाब आहे. तरीही भारताचे बांगलादेश हे मित्रराष्ट्र आहे.

उपक्रम : बांगलादेशाच्या स्वातंत्र्य चळवळीतील भारताची भूमिका यावर चर्चा करा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

सार्क (SAARC)

दक्षिण आशियाई देशांनी त्यांच्यातील सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी एक प्रादेशिक संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. परिणामी दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना (South Asian Association for Regional Co-operation - SAARC) 1985 मध्ये अस्तीत्वात आली. सार्कमध्ये मुळात सात देशांचा समावेश होता. त्यानंतर 2007 मध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या 14 व्या शिखर परिषदेत अफगाणिस्तानला सार्कचे सदस्य राष्ट्र म्हणून घेण्यात आले. भारत, बांगलादेश, भूतान, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका तसेच अफगाणिस्तान ही सार्कची आठ सदस्य राष्ट्रे आहेत.

शैक्षणिक विषयाशी संबंधीत माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी भारताने एक स्वतंत्र उपग्रह प्रक्षेपित केला आहे आणि सर्व सार्क सदस्य देशांना ते वरदान ठरले आहे.

सार्कची उद्दिष्ट्ये

- दक्षिण आशियाई देशांमध्ये परस्पर संबंध आणि विश्वास वाढविणे.
- दक्षिण आशियाई लोकांच्या कल्याणासाठी प्रोत्साहन देणे.
- आर्थिक, सांस्कृतिक, तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात परस्पर सहकार्य आणि सौहार्द वाढविणे.
- विकसीत देशांशी संबंध मजबूत करणे.

सार्क सदस्य राष्ट्रांची भारताकडून एकजुटीची अपेक्षा आहे व भारताकडे संशय आणि भितीने पाहणे या गोष्टींना खीळ बसली आहे.

© KEBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :

1. कारगिल युध्द _____ साली झाले.
2. तिबेटीयन धर्म गुरू _____ हे होत.
3. _____ यांच्या नेतृत्वाखाळी अवामी लिग मुक्ती चळवळ सुरू झाली.
4. SAARC ची स्थापना _____ साली झाली.
5. चितगाँव पर्वतमय प्रदेशातून भारतात आलेले स्थलांतरीत म्हणजे _____ होय.

II. दोन तीन वाक्यात उत्तरे द्या.

6. भारताच्या शेजारील देश कोणते ?
7. भारत पाकिस्तान संबंध सुधारण्यातील अडथळ्यांची यादी बनवा.
8. भारत चीन संघर्षाची मुख्य कारणे कोणती ?
9. बांगला देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी भारताने बजावलेल्या भूमिकेचे विश्लेषण करा.
10. 1962 च्या चीन भारत युद्धाचे परिणाम कोणते ते लिहा.
11. सार्क संघटनेच्या स्थापनेचे उद्देश कोणते ?

उपक्रम:

1. भारताच्या शेजारील देशांच्या राष्ट्रध्वजांची चित्रासह माहिती गोळा करा.
2. जगाच्या नकाशात भारताचे शेजारील देश ओळखा.

@KSBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 25 संयुक्त राष्ट्रसंघ

Y9Q2S7

पाठाचा परिचय

इतिहासातील अतिशय भीषण असे हे दुसरे महायुद्ध होय. जे युरोपियन राष्ट्रांमध्ये सलग सहा वर्षे (1939-1945) चालले. या युध्दात सुमारे चार कोटी लोक मारले गेले आणि त्याचबरोबर प्रचंड प्रमाणातील मालमत्तेचे नुकसान झाले.

भयंकर हिंसाचारामुळे व्यथित झालेल्या मानवजातीला कायमस्वरुपी शांतता हवी होती. या विषमतेच्या कालखंडात 51 राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी अमेरिकेतील सॅनफ्रान्सीस्को शहरामध्ये 24 ऑक्टोबर 1945 रोजी स्थायी शांततेसाठी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना केली.

या पाठात संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेची पार्श्वभूमी, मूलभूत उद्दिष्ट्ये, सहयोगी संस्था, विशेष सेवा संस्था आणि त्यांची कार्ये यांचे विवरण केले आहे. संयुक्त राष्ट्रांमध्ये भारताच्या भूमिकेकडेही लक्ष वेधण्यात आले आहे.

सामर्थ्य

1. संयुक्त राष्ट्रसंघाचे ध्येय, उद्देश आणि आदर्श समजून घेणे.
2. संयुक्त राष्ट्रसंघाच्या संस्थांची कार्यपध्दती जाणून घेणे.
3. जगातील राष्ट्रांमध्ये शांतता आणि सौहार्द प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या कामगिरीची प्रशंसा करणे.
4. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघात भारताने बजावलेल्या भुमिकेची प्रशंसा करणे.

@KYBS NOT TO BE REPUBLISHED

येथे दिलेल्या चिन्हाकडे पहा. मध्यभागामध्ये खंड दर्शविलेले आहेत. चिन्हाच्या दोन्हीबाजुला ऑलिव्ह वनस्पतीच्या डहाळ्या आपल्याला काय सुचवितात?



संयुक्त राष्ट्राचे चिन्ह

चिन्हामध्ये दाखविलेले खंड हे जगातील सर्व देश आणि ऑलिव्ह वनस्पतीच्या डहाळ्या सर्व देशामध्ये असलेली मैत्री आणि शांती दर्शवितात. हे चिन्ह म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाच्या मूळ आदर्शांचे प्रतिक आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाचा उदय

संयुक्त राष्ट्रसंघ म्हणजे काय? त्याची स्थापना का झाली? हे तुम्हाला माहित आहे का ?

सुमारे सत्तर वर्षापूर्वी युरोपियन देशात भीषण युध्दाला सुरुवात झाली. अल्पावधीतच विविध खंडातील देश युद्धात सामील झाले हेच दुसरे महायुध्द होय. परीणामी या युद्धामुळे जिवीत हानी आणि मोठ्या प्रमाणात मालमत्तेचे नुकसान झाले. युद्धामुळे त्रस्त झालेल्या मानवजातीने भविष्यात युध्दमुक्त शांततामय जगाची इच्छा बाळगली. अशा परिस्थितीत अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट, ब्रिटीश पंतप्रधान चर्चिल आणि रशियन हुकुमशहा स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली 51 देशांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन जगात शाश्वत शांतता प्रस्थापित करण्याचा ठराव पास केला. याची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने 24 ऑक्टोबर 1945 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाची (UNO) स्थापना झाली.

पूर्वी UNO असे संबोधण्यात येत होते. परंतू तो संघ नसल्याकारणामुळे सध्या त्याला UN असे संबोधतात. कारण तो जगातील सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधीत्व करतो. UN म्हणजेच युनायटेड नेशन्स.


संयुक्त राष्ट्रसंघाचे मुख्य उद्देश

- युद्धे रोखून जगात शाश्वत शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करणे.
- राष्ट्रामधील मैत्रीपूर्ण सहकार्य साध्य करणे.
- आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक तसेच मानवतावादी समस्यांच्या निराकरणासाठी सहकार्य करणे.
- मानवी हक्कांबद्दल आदर वाढविणे.
- वरील उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी समन्वय केंद्र म्हणून काम करणे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाखा

संयुक्त राष्ट्रसंघाचे उद्देश कार्यरूपात आणण्यासाठी कोणकोणत्या शाखा संस्थांची रचना करण्यात आली आहे ?

© MTBS NOT TO BE REPUBLISHED



1. महासभा

ही वर्षातून एकदा सप्टेंबर महिन्यात आयोजित केली जाते. सर्व सदस्य राष्ट्रे महासभेत भाग घेतात. प्रत्येक सदस्य राष्ट्राचे या सभेत पाच प्रतिनिधी असले तरी प्रत्येक राष्ट्राला एकच मत देण्याचा हक्क दिलेला आहे. सध्या (2022) जगातील 193 देश संयुक्त राष्ट्राचे सदस्य आहेत. महासभा विश्व संसदेप्रमाणे कार्य करते. सुदान हे संयुक्त राष्ट्राचे 193 वे सदस्य राष्ट्र आहे.

2. सुरक्षा मंडळ

सुरक्षा मंडळ म्हणजे संयुक्तराष्ट्राचे सचिवालय. महासभेने जागतिक शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी घेतलेल्या निर्णयावर सल्ला देणे हे सुरक्षा मंडळाचे महत्वाचे कार्य आहे.

सुरक्षा मंडळात 15 सदस्य राष्ट्र प्रतिनिधीत्व करतात. यामध्ये अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स आणि चीन ही स्थायी सदस्य राष्ट्रे आहेत. उर्वरीत दहा सदस्य राष्ट्रांची महासभेद्वारे दोन वर्षांच्या कालावधीसाठी हंगामी सदस्य म्हणून निवड केली जाते.

सुरक्षा मंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी नऊ सदस्य राष्ट्रांची संमती आवश्यक असते. परंतु स्थायी सदस्य राष्ट्रांपैकी कोणत्याही एका राष्ट्राने

©KBS NOT TO BE REPUBLISHED

निर्णयाला विरोध केल्यास तो निर्णय अंगिकारला जात नाही. स्थायी सदस्य राष्ट्रांच्या विरोध दर्शविणाऱ्या या अधिकाराला 'व्हेटो' अधिकार असे म्हणतात.

उपक्रम : महासभेचा बहुमताचा निर्णय अंतिम असतो का? किंवा सुरक्षा मंडळाचा 'व्हेटो' अधिकार अंतिम असतो ? चर्चा करा.

3. आर्थिक आणि सामाजिक मंडळ

विश्वातील सर्व देशांना सामान्यपणे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. धर्म, रंग, भाषा, सीमेच्या पार्श्वभूमीवर मानवी हक्क उल्लंघनाच्या समस्यांचे निवारण करण्याची जबाबदारी या मंडळाची असते.

निरक्षरता, गरिबी, कुपोषण, निर्वासितांचे पुनर्वसन, आरोग्य, स्त्री समानता, शिशू संरक्षण, अंमली पदार्थाचे नियंत्रण इ. विषयासंदर्भात आर्थिक आणि सामाजिक मंडळ परस्पर सहकार्य आणि समर्थन प्रदान करते.

4. आंतरराष्ट्रीय न्यायालय

आंतरराष्ट्रीय न्यायालय नेदरलँडमधील हेग या शहरात आहे. या न्यायालयात पंधरा न्यायाधीश आहेत. त्यांची निवड सुरक्षा मंडळ आणि महासभेच्या सदस्यांद्वारे केली जाते. सदस्य राष्ट्रांमधील वाद /समस्या सोडविणे हे आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कार्य आहे.

5. मुख्यालय

संयुक्त राष्ट्रसंघाचे मुख्यालय न्यूयॉर्कम धील लेक सक्सेस शहरात आहे. महासचिव हे त्यांच्या प्रशासनाचे प्रभारी मुख्य अधिकारी होत. जागतिक शांततेला बाधा आणू शकतील अशा कोणत्याही बाबींचे त्वरीत निवारण करण्याची जबाबदारी महासचिवांची असते.



संयुक्त राष्ट्राचे मुख्यालय

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

संयुक्त राष्ट्रसंघाचे सध्याचे महासचिव अंटोनियो गुटेरस (पोर्तुगाल) हे आहेत. महासभेमध्ये निवडलेल्या उमेदवाराची नियुक्ती सुरक्षा मंडळाच्या मान्यतेच्या अधिन राहून संयुक्त राष्ट्राचा महासचिव म्हणून केली जाते.



अंटोनियो गुटेरस
(पोर्तुगाल)

6. विश्वस्त मंडळ

संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेच्यावेळी अकरा प्रदेश अजुनही स्वयंशासीत नव्हते. त्यांच्या हिताच्या दृष्टीने पाच सदस्य राष्ट्रांचे मंडळ संयुक्त राष्ट्रसंघाशी संलग्न म्हणून रचण्यात आले. हेच विश्वस्त मंडळ होय. 1994 मध्ये हे सर्व प्रदेश स्वतंत्र झाले.

संयुक्त राष्ट्राचा राष्ट्रध्वज आणि प्रशासकिय भाषा

संयुक्त राष्ट्रसंघाचा स्वत:चा ध्वज आहे. ध्वजाचा रंग फिकट निळा आहे. मध्यभागी संयुक्त राष्ट्राचे बोधचिन्ह आहे. दरवर्षी 24 ऑक्टोबर रोजी 'संयुक्त राष्ट्र दिन' जगभरात साजरा केला जातो.



राष्ट्रसंघाचा ध्वज

संयुक्त राष्ट्रसंघाचे कामकाज इंग्रजी, रशियन, स्पॅनिश, चीनी, फ्रेंच, अरेबिक इ. भाषांमध्ये चालविले जाते. साम ान्यपणे इंग्रजी भाषेचा वापर केला जातो.

NOT TO BE REPUBLISHED © SCERT

विशेष सेवासंस्था

संयुक्त राष्ट्राच्या आश्रयाखालील अनेक विशेष सेवासंस्था जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी कार्यरत आहेत. काही प्रमुख सेवा संस्था -

- संयुक्त राष्ट्राची शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (United Nations Educational, Scientific and Cultural Organisation - UNESCO).

  यांचे मुख्यालय फ्रांन्समधील पॅरीस येथे आहे.

- अन्न आणि कृषी संघटना (Food and Agricultural Organisation - FAO). याचे मुख्यालय इटलीतील रोम शहरात आहे.
- जागतिक आरोग्य संघटना (World Health Organisation - WHO). याचे मुख्य कार्यालय स्वित्झर्लंड मधील जिनेव्हा येथे आहे.
- संयुक्त राष्ट्राचा आंतरराष्ट्रीय बालक आपत्कालीन निधी (United Nations International Children's Emergency Fund - UNICEF).

  याचे मुख्य कार्यालय अमेरिकेतील न्युयॉर्कमध्ये आहे.

संयुक्त राष्ट्राची कामगिरी आणि मर्यादा

- **आर्थिक योगदान :-** संयुक्त राष्ट्रसंघाने आरोग्य, वाहतूक, आहार विज्ञान, शिक्षण या क्षेत्रांना प्रचंड आर्थिक सहाय्य दिले आहे.
- **सामाजिक योगदान:-** संयुक्त राष्ट्राने कोट्यावधी निर्वासितांना मदत केली आहे. युवक, माता आणि दुर्बल वर्गाच्या विशेष आवश्यक गरजा पुरविल्या आहेत.
- **मानवी हक्कांची घोषणा:-** संयुक्त राष्ट्रसंघाची विशेष कामगिरी म्हणजे मानवी हक्कांची घोषणा. (10 डिसेंबर 1948)
- **नवीन राष्ट्रांच्या उदयासाठी सहाय्य:-** संयुक्त राष्ट्राने अनेक परदेशी वसाहतींना स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयाला आणण्यास कठोर परिश्रम घेतले आहेत.
- **शांतता स्थापन करणे :-** संयुक्त राष्ट्राने दोन महायुध्दांनी त्रासलेल्या जगाला शांततेचा भरवसा देऊन पुढील काळात महायुध्द होण्यापासून रोखले आहे. 1945 नंतर संयुक्त राष्ट्राने अण्वस्त्रांच्या वापरावर बंदी आणून खूप मोठी कामगिरी पार पाडली आहे.

संयुक्त राष्ट्राने जगातील अनेक युद्धांवर नियंत्रण आणण्यासाठी शक्य त्या मार्गांचा अवलंब केला आहे.

© MSBSHSE NOT TO BE REPUBLISHED

मर्यादा

- सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर शीतयुध्द संपुष्टात आले. या बदललेल्या परिस्थितीत अमेरिका स्वत:ला जगातील सर्व राष्ट्रांचा नेता असल्याचे दाखवून देत आहे हे बहुआयामी सांस्कृतिक जीवनासाठी मारक आहे.
- संयुक्त राष्ट्राच्या अनेक निर्णयांची अंमलबजावणी होऊ शकली नाही. सदस्य राष्ट्रांनी त्यांचे लष्करी सामर्थ्य सोडण्यास नकार दिल्याने त्यांच्या सदस्य राष्ट्रांच्या लष्करी शक्तीच्या मदतीने संघर्षाला सामोरे जावे लागते. परंतु राष्ट्राकडे स्वत:चे लष्करी सैन्य नाही.
- स्थायी सदस्यांची सहमती आवश्यक असल्याने ज्यावेळी स्थायी सदस्यांची सहमती नसते त्यावेळी कोणताही निर्णय हाती घेता येत नाही.

भारत आणि संयुक्त राष्ट्र

1945 मध्ये संयुक्त राष्ट्राच्या घटनेवर स्वाक्षरी करणाऱ्या देशांपैकी भारत हा एक होता. स्वातंत्र्यानंतर भारताने जागतिक घडामोडीमध्ये सक्रिय भुमिका बजावली आहे.

- सुरुवातीपासूनच भारताने वर्णभेदाला विरोध केला आहे.
- भारताने वसाहतवादाचे निर्मुलन करण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत.
- अण्वस्त्र चाचणी पूर्णपणे बंद झाली पाहिजे यावर भर देणाऱ्या देशांपैकी भारत हा पहिला देश असून, भारताने सातत्याने शस्त्रास्त्र नियंत्रण आणि जागतिक शांततेचे प्रतिपादन केले आहे.
- देशादरम्यान शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत आघाडीवर असतो आपली सैन्य तुकडी संयुक्त राष्ट्राकडे पाठवितो.
- श्रीमती विजयलक्ष्मी पंडित या संयुक्त राष्ट्राच्या प्रथम महिला अध्यक्षा होत.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

- बेनेगल नरसिंगराव यांनी आंतराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधिश म्हणून आणि डॉ. नागेंद्र सिंग यांनी सरन्यायाधिश म्हणून सेवा बजावली आहे.
- कर्नाटकाचे असणारे जनरल के. एस. तिम्मय्या आणि काही इतर भारतीय लष्करी अधिकाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय शांतीरक्षक म्हणून संयुक्त राष्ट्रात भरीव सेवा बजावली आहे.

स्थायी सदस्यांनी अशा सुरक्षा मंडळाचे स्थायी सदस्यत्व केवळ पाच देशापुरतेच मर्यादित ठेवले आहे. भारतासारख्या विकसनशील देशाकडे कायमस्वरूपी सदस्यत्व नाही हा विपर्यास आहे.

अभ्यास

I. खालील दिलेल्या रिकाम्या जागा भरा.

1. संयुक्त राष्ट्राचे मुख्यालय _____ शहरात आहे.
2. जागतिक शांतता आणि सुरक्षितता राखणे हे राष्ट्रसंघाच्या _____ या शाखेचे कार्य आहे.
3. सुरक्षा मंडळामध्ये _____ सदस्य असतात.
4. आंतरराष्ट्रीय न्यायालय नेदरलँड मधील _____ या शहरात आहे.

II. एका शब्दात अथवा वाक्यात उत्तरे द्या.

5. संयुक्त राष्ट्र संघ केव्हा सुरू झाला ?
6. संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेचे मुख्य कारण कोणते ?
7. 'जागतिक संसद' असे कोणास म्हणतात ?
8. सुरक्षा मंडळातील कायम सदस्य राष्ट्रे कोणती ?
9. संयुक्त राष्ट्राला सेवा देणाऱ्या दोन महान भारतीयांची नावे सांगा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

10. संयुक्त राष्ट्राच्या मानव हक्क घोषणेसाठी हाती घेतलेले एक कारण कोणते ?

III. दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे द्या.

11. संयुक्त राष्ट्राचे मुख्य उद्देश कोणते ?
12. संयुक्त राष्ट्र सुरक्षा मंडळाच्या कार्याचे वर्णन करा.
13. संयुक्त राष्ट्रांच्या चार कामगिरींची यादी करा.
14. संयुक्त राष्ट्रांच्या विशेष सेवासंस्थाची नांवे लिहा.
15. 'व्हेटो' अधिकार म्हणजे काय ?
16. संयुक्त राष्ट्रांच्या अधिकारांच्या दोन मर्यादा लिहा.

उपक्रम:

1. संयुक्त राष्ट्रसंघातील विशेष सेवासंस्थांची प्रतिक चिन्हे संग्रहित करुन त्यांचे विवरण करा.
2. संयुक्त राष्ट्राच्या विविध शाखांमध्ये सेवा बजावलेल्या भारतीयांची छायाचित्रे माहिती सहित संग्रहित करा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 26 ऑस्ट्रेलिया

E5H4N2

पाठाचा परिचय

या पाठात ऑस्ट्रेलिया खंडाचे स्थान, विस्तार, प्राकृतिक विभाग आणि नदी व्यवस्था पर्यावरण, वनस्पती, व्यवसाय, पशुसंवर्धन, खनिज आणि उद्योग, लोकसंख्या वाढ वितरण आणि घनता याची माहिती आहे.

सामर्थ्ये


1. जगात ऑस्ट्रेलिया खंडाचे स्थान परिस्थिती विषयी जाणून घेणे.
2. ऑस्ट्रेलियाचे भौतिक विभाग, नद्या, हवामान आणि नैसर्गिक वनस्पतींबद्दल जाणणे.
3. ऑस्ट्रेलियातील व्यवसाय आणि पशूपालन याविषयी जाणून घेणे.
4. खनिजे आणि उद्योग यांचा परिचय करून घेणे.
5. लोकसंख्या वाढ, वितरण, घनता याविषयी माहिती करून घेणे.

NOT TO BE REPUBLISHED @KIRS

स्थान, विस्तार आणि भौतिक परिस्थिती

स्थान - ऑस्ट्रेलिया खंड पूर्णपणे दक्षिण आणि पूर्व गोलार्धात वसलेला आहे, हे 10^0 45' आणि 43^0 39' दक्षिण अक्षांश आणि 113^0 9' पूर्व पासून 153^0 39' पूर्व रेखांशामध्ये आहे. मकरवृत्त ऑस्ट्रेलियाच्या मध्यभागातून गेले आहे.

विस्तार - आकारमान व लोकसंख्या या दोन्हीमध्ये ऑस्ट्रेलिया जगात लहान खंड आहे. टास्मानिया द्विपासह त्याचे आकारमान 76.82 लक्ष चौ.कि.मी आहे. अमेरिका संयुक्त संस्थानापेक्षा थोडसे लहान व भारताच्या दुप्पट मोठे आहे. हा जगातील सातव्या नंबरचा खंड असून याचा दक्षिणोत्तर विस्तार 3,940 कि.मी. आणि पूर्वपश्चिम विस्तार 4,350 कि.मी. आहे. याच्या किनारपट्टीची लांबी 19,310 कि.मी. आहे.



ऑस्ट्रेलिया (राजकीय)

ऑस्ट्रेलिया हा शब्द दक्षिण अशा अर्थास 'ऑस्ट्रल' (लॅटीन) यापासून वापरात आला.


मध्य आणि दक्षिण पॅसिफिक महासागरातील सुमारे 10,000 द्विपांच्या समुहाला 'ओसिनिया असे' म्हणतात. यामध्ये ऑस्ट्रेलिया खंड मुख्य होय.

भौगोलिक आकारमान : ऑस्ट्रेलिया हिंदी महासागर आणि पॅसिफिक महासागरामध्ये असलेला द्विपखंड होय. याखंडाच्या वायव्येला तैमूर अवरुर समुद्र, ईशान्येला टोरेस आखात आणि आग्नेयला टास्मन समुद्र आहे. दक्षिणेत ग्रेट ऑस्ट्रेलियन बेट आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वाभाविक विभाग आणि नद्या

स्वाभाविक विभाग : ऑस्ट्रेलियाच्या एकूण आकारमानापैकी सुमारे 94 टक्के भाग समुद्रसपाटीपेक्षा 600 मी. खाली समतल आहे. यामुळे या खंडाला 'अत्यंत समतल भूखंड' असे म्हणतात, बहुतांश प्रदेश वाळवंटी असल्यामुळे याला वाळवंटाचा महाव्दिप असे म्हणतात.



ऑस्ट्रेलिया (स्वाभाविक विभाग)

ऑस्ट्रेलिया मूळत: गोंडवान भूमीचा एक भाग होता. याच्या भूस्वरुपावरुन याचे 3 स्वाभाविक विभागात विभागले आहे.

1. पूर्वेचा उंचवट्याचा प्रदेश, 2. मध्य सखल मैदानी प्रदेश, 3. पश्चिमेकडील पठारी प्रदेश.

© NOT TO BE REPUBLISHED

सतराव्या शतकात युरोपचा खलाशी जेम्स कूक याने ऑस्ट्रेलिया खंडाचा शोध लावला.

1. पूर्वेकडील उंचवटयाचा प्रदेश : हा या खंडाच्या पूर्व भागात उत्तरेकडील यार्क शिखरापासून दक्षिणेकडील टास्मानियाच्या बास आखातापर्यंत विस्तारलेला आहे. ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनारपट्टीला समांतर असा हा पूर्वेकडील उंचवटयाचा प्रदेश पसरलेला आहे. हा प्रदेश म्हणजे उंच पठारांची एक रांगच होय. पश्चिमेकडील भाग उतरतीचा आहे. पूर्वी पूर्व किनारपट्टीकडून प्रवेश करणे कठीण होते. त्यामुळे याला 'ग्रेट डिवायडिंग श्रेणी' असे म्हणतात. या पर्वत श्रेणीतील न्यू साऊथ वेल्स मध्ये अनेक उंच शिखरे आहेत. यांना ऑस्ट्रेलियाचे 'आल्प्स' आणि 'न्यू इंग्लंड श्रेणी' असे म्हणतात. उंच शिखरे हिवाळ्यात हिमाच्छादित होतात. या भागातील 'कोसियेस्को' (2230 मी) हे सर्वात उंच शिखर होय.

ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनारपट्टीपासून दक्षिण किनारपट्टीपर्यंत 'ग्रेट बॅरियर रीफ' नावाची प्रवाळ रांग (2000 कि.मी.) आहे.

2. मध्य सखल मैदानी प्रदेश - उत्तरेकडील कार्पेंटेरीय दरीपासून दक्षिणेकडील मरे मैदानापर्यंत हा सखल मैदानी प्रदेश विस्तारलेला आहे. पूर्व उंचवटयाच्या प्रदेशापासून पश्चिमेकडे आंतरिक जलव्यवस्था आहे. यामध्ये मध्यभागात असलेल्या 'ऐर' सरोवराकडे नद्या वाहतात. जगातील प्रसिद्ध आर्टिशियन पाण्याच्या विहिरी येथे आहेत.





आर्टिशियन विहिरी

© BSTB@MTRS NOT TO BE REPUBLISHED

हा सखल मैदानी प्रदेश 3 भागात विभागला आहे.

1. मरे डार्लिंग मैदान
2. ऐर सरोवर मैदान
3. कार्पेंटेरीय मैदान.



मरे नदी



डार्लिंग नदी


मरे आणि डार्लिंग नद्यांची मैदाने, उत्तरेला असलेले ऐर सरोवरापासून वेगळी आहेत. नद्यांच्या पाण्याच्या सोयीमुळे हा ऑस्ट्रेलियातील एक समृद्ध कृषी विभाग आहे. यामुळे उत्तरेकडील ऐर सरोवर मैदान विशाल आकाराचे आहे. येथे काही खारट पाण्याची सरोवरे आहेत. याचा बहुतेक भाग नापीक प्रदेश झाला असल्यामुळे येथे विरळ लोकसंख्या आहे. फ्लींटर आणि मिचेल नद्या वाहत असलेले कार्पेंटेरीय मैदान समतल आहे. हा प्रदेश ऐर नदीच्या मैदानी प्रदेशापासून बर्क्ले पठारी प्रदेश विभागला आहे.

3. पश्चिमेचा पठारी प्रदेश : हा प्रदेश कार्पेंटेरीय दरीपासून अनस्लो, पर्थ आणि अल्बेनिया पर्यंत पसरलेला आहे. ऑस्ट्रेलियाचा 2/3 भाग वाळवंटच बनलेले आहे. ग्रेट सँडी डेझर्ट, गीब्सन आणि विक्टोरिया वाळवंटी प्रदेश भारतातील दख्खनच्या पठाराइतका पुरातन आहे. येथे अनेक वाळूच्या टेकड्या आहेत. ठिकठिकाणी खडकाळ टेकड्या आहेत. यामध्ये मध्यभागी असलेल्या मॅकडोनेल व मसग्रेव पर्वत रांगा आहेत.

4.नद्या : ऑस्ट्रेलियाचा जास्तीत जास्त भाग उष्ण आणि कोरड्या हवामानाचा असल्यामुळे बराचसा भाग वाळवंटाने व्यापलेला आहे. यामुळे नद्या कमी असून

© KSEB NOT TO BE REPUBLISHED

त्यापैकी काही लहान व ठराविक ऋतूत वाहतात. समुद्राला मिळणा-या नद्यापेक्षा सरोवराना मिळणाऱ्या नद्या जास्त आहेत. बहुतेक नद्या पूर्वेच्या उंच प्रदेशात उगम पावून पूर्वेकडे वाहतात.



ऑस्ट्रेलियातील नद्या

मरे ऑस्ट्रेलियातील प्रमुख नदी आहे. ही नदी न्यू साऊथ वेल्समधील कोसियेस्को शिखराजवळ उगम पावून पूर्व आणि नैर्ऋत्येला वाहत (2,590 कि.मी) एनकांउटर दरीत सामावते. डार्जलिंग, लाचलान आणी मरबीड्री या मरे नदीच्या उपनद्या होय. वर्षातील ठराविक ऋतूमध्येच या नद्यामधून नौकानयन शक्य आहे.

पूर्वेकडे वाहणाऱ्या नद्या लहान तसेच वेगाने वाहतात. यामध्ये हंटर, फीटजराय आणि बेलियांडो. ईशान्यकडे वाहणा-या मिचेल, गिल्बर्ट आणि फिलडर्स या वायव्येला वाहत कार्पेंटेरीय दरीत सामावतात. डॉली, व्हिक्टोरिया, फिट्झरॉय इ. नद्या उत्तर आणि वायव्येला वाहतात व तिमोर समुद्राला मिळतात.

@KIBS NOT TO BE REPUBLISHED

कुपरक्रीक, ड्रैंटीन व मुकुंबा या प्रमुख नद्या ऐरी सरोवराला मिळतात. मर्चीसन, ऐवन, ब्लैकवूड या नद्या हिंदी महासागराला मिळतात.

ऑस्ट्रेलियात काही सरोवरे आहेत. यापैकी काही सरोवरात कमी व जास्त खारट सरोवरे आहेत. उदा. ऐर, टॉरेन्स, गेडनर इ. यापैकी ऐर सरोवर सर्वात मोठे व खंडाच्या अती सखल भागात आहे. यामुळे पश्चिम भागात जगातील एकशीला अयर्स (शिलाखंड) शिला आहे.



अयर्स (शिलाखंड)



ऐर सरोवर

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हवामान आणि नैसर्गिक वनस्पती

हवामान : ऑस्ट्रेलियाच्या मध्यातून मकर वृत्त गेले आहे. यामुळे ऑस्ट्रेलियात उष्ण व कोरडे हवामान असते. ऑस्ट्रेलियात बहुतेक भागात वर्षभर अधिक उष्णता असते. पश्चिम किनारपट्टीवर शीत सागर प्रवाह वाहतो. यामुळे ऑस्ट्रेलियाचा पश्चिम भाग पठारी प्रदेश व कोरड्या हवामानाचा आहे. उत्तरेला मान्सून आणि दक्षिणेला किनारपट्टीवर मेडीटरेनियन प्रकारचे हवामान असते

हिवाळा : ऑस्ट्रेलिया खंड दक्षिण गोलार्धामध्ये असल्यामुळे ऋतुकालमान उत्तर गोलार्धाच्या विरुद्ध असते. म्हणजे उत्तर गोलार्धात उन्हाळा असताना येथे हिवाळा असतो. उदा. जून पासून ऑगष्ट पर्यंत उष्णांश कमी असते. उत्तरेपासून दक्षिणेकडे उष्णता कमी असते पण दाब जास्त असतो. वारे आतून समुद्राकडे वाहतात. यामुळे जास्त पाऊस आणत नाहीत, उष्ण व कोरडे हवामान असते. टास्मानियात वेगळे हवामान असते.

उन्हाळा : ऑस्ट्रेलियात उन्हाळा डिसेंबर पासून फेब्रुवारीपर्यंत असतो. या काळात उष्णतामान जास्त असते. खंडाच्या पूर्व भागापेक्षा पश्चिमेकडील वाळवंटी प्रदेशात तापमान अधिक असते. दक्षिण, आग्नेय भाग व टास्मानिया द्विपामध्ये साधारण उष्णतामान असते. अंतर्गत भागात दाब कमी असल्यामुळे समुद्राकडून वारे वाहतात, कमी पाऊस आणतात.

खंडाच्या दक्षिण व आग्नेय भागात जास्त पाऊस पडतो. ऑस्ट्रेलियात चक्रीवादळाला 'विली विलीज' असे म्हणतात.

सर्वसाधारणपणे ऑस्ट्रेलियातील पाऊस हा मान्सुनच्या प्रकारासारखा असतो. उत्तर आणि नैऋत्य किनारपट्टीवर वार्षिक 75 सेंटीमीटर पर्जन्यवृष्टीसह, वेळ आणि जागेत अविश्वसनीय आहे. ऑस्ट्रेलियाच्या सर्वात मोठ्या आतील वाळवंटात 25 से.मी. पेक्षा कमी आहे.


नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी

नैसर्गिक वनस्पती : ऑस्ट्रेलिया खंडात घनदाट जंगले नाहीत. खंडाच्या बहुतेक भागात गवताळ कुरणे, खुरट्या वनस्पती विरळ आढळतात. या खंडाचे हवामान प्रतिबिंबित करतात. ऑस्ट्रेलिया खंडातील विविध नैसर्गिक वनस्पती वर्ग खालील प्रमाणे.

1. उष्ण कटिबंधातील अरण्ये : ऑस्ट्रेलियाच्या उत्तर व ईशान्य किनार पट्टीवर जास्त पाऊस पडत असल्यामुळे तेथे मोठया प्रमाणात अरण्ये दिसून येतात. पण त्याचा आकार कमी आहे. येथील ॲश, निडार, बीच, ताळे या वनस्पती आहेत.

2. समशीतोष्ण कटिबंधातील अरण्ये : अशा प्रकारची अरण्य पर्वत आणि टेकड्यांवर आढळून येतात. यामुळे यांना "डोंगर प्रदेशातील अरण्ये" असेही म्हणतात. अशी अरण्य क्विन्सलँड, न्यू साउथवेल्स, व्हिक्टोरिया आणि टास्मेनियामध्ये विभागली आहेत. येथील प्रमुख वनस्पती निलगिरी, पाईन इ. यांचा वापर प्रामुख्याने तेलासाठी व कागदासाठी करतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



ऑस्ट्रेलियातील नैसर्गिक वनस्पती

3. गवताळ कुरणे : ऑस्ट्रेलियात गवताळ कुरणामध्ये दोन प्रकार आहेत. (i) उष्ण कटिबंधातील गवताळ कुरणे (सॅव्हाना). (ii) समशीतोष्ण कटिबंधातील गवताळ कुरणे (डाऊन्स).

पहिल्या प्रकारची कुरणे पूर्वेकडील उंचवट्याच्या प्रदेशात पश्चिमेकडील क्विन्सलँड, उत्तर ऑस्ट्रेलियाचा मध्यभाग आणि पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या उत्तर भागात आढळतात. दुसऱ्या प्रकारची गवताळ कुरणे मरे-डार्लिंग नदीच्या मैदानी प्रदेशात विस्तारलेली आहेत. ही कुरणे पशुपालनास उपयुक्त आहेत. समशीतोष्ण कटिबंधातील गवताळ कुरणामध्ये विचेल आणि अट्रीबल गवताचे प्रकार पहावयास मिळतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



सॅव्हाना गवताळ प्रदेश



डाऊन्स गवताळ प्रदेश

4. खुरटया वनस्पती : या वनस्पती पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या दक्षिण व पश्चिम भागात, दक्षिण ऑस्ट्रेलिया तसेच क्विन्सलँडच्या काही भागात आढळतात. पावसाच्या कमी प्रमाणामुळे खुरट्या वनस्पती वाढतात. यामध्ये काही वनस्पती जास्त प्रमाणात असतात. तसेच काही ठिकाणी निलगिरी, निवडुंग आणि काटेरी वनस्पती वाढतात.



अॅश



सिडार



ताल



निलगिरी

5. वाळवंटी वनस्पती: पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या मध्यभागात आणि पूर्व भागात या वनस्पती आढळतात. यामध्ये खुरटी झाडे, साल्टबूश, कमी उंचीचे गवत आणि विविध प्रकारचे निवडुंग वाढतात. या वनस्पती दुष्काळात तग धरून राहतात.

6. प्राणी : ऑस्ट्रेलियामध्ये जगात कोठे न आढळणारे अमूल्य व विचित्र प्राणीपक्षी आहेत. प्लाटिपस नावाचा सस्तन प्राणी अंडी घालतो आणि पिलाना स्तनपान करतो. कांगारू हा आपल्या पिलांना पोटाच्या वर असलेल्या पिशवीत वाढवितो एमू हा ऑस्ट्रेलियातील अतिमोठा पक्षी होय. लैर नावाचा मोरासारखा सुंदर पक्षी येथे आढळतो. विचित्र हसण्यासारखा आवाज काढणारा कुकाबुर, काळ्या रंगाचे हंस इत्यादी पक्षी येथे पाहावयास मिळतात. पण येथील राष्ट्रीय प्राणी कांगारू हा होय. डिंगो नावाचा रानटी कुत्रा येथे आढळतो. वल्लभी, एकिडन, झाडावर चढणारा लहान आकाराचा कोआला इत्यादी. ऑस्ट्रेलियात अनेक जातीचे सरपटणारे प्राणी व विषारी साप आहेत.



कागांरू



वल्लभी



डिंगो



करडीकोल



एमू



काळा हंस

"ऑस्ट्रेलिया विलक्षण प्राणी पक्षांचा देश"- येथील सुमारे 60% प्राणी पक्षी जगात इतरत्र आढळत नाहीत. कांगारु ऑस्ट्रेलियाचे राष्ट्रीय चिन्ह आहे.

NOT TO BE PUBLISHED

शेती व पशुपालन

शेती : शेती हा ऑस्ट्रेलियातील एक प्रमुख व्यवसाय होय. येथे शेत जमीन कमी आहे. या खंडाच्या विस्तारापैकी फक्त 4% जमीन शेतीसाठी उपयुक्त आहे. ही जमीन समुद्र किनारपट्टी व नद्यांच्या किनाऱ्यावर आढळून येते. एकूण लोकसंख्येच्या 44% लोक शेती करतात. विशेषत: गोरे लोक शेतीत गुंतलेले आहेत.

पावसाचा अभाव आणि असमान विभागणी, नापीक जमीन. कृषी योग्य कमी जमीन आणि पाण्याच्या कमतरतेमुळे कृषी क्षेत्र कमी आहे. तरीसुद्धा देशाला पुरेल इतके धान्य उत्पादित करतात. त्यामुळे ते स्वावलंबी आहेत.

ऑस्ट्रेलियात शेतीचे मोठ्या प्रमाणात यांत्रिकिकरण झाले आहे. निर्यात करण्याच्या उद्देशाने व्यापारी पिके जादा पिकवितात. येथे विविध प्रकारची पिके पिकवितात. उदा: गहू, ऊस, कापूस, मका, जोंधळा विविध प्रकारची फळे आणि भाज्या पिकविली जातात.



गहू



ऊस



तंबाखू



कापसाचे पीक



सफरचंदाचे पीक

NOT TO BE REPUBLISHED

गहू : गहू हे ऑस्ट्रेलियाचे प्रमुख आहार धान्य आहे हे पीक दक्षिण ऑस्ट्रेलिया, क्विन्सलँड, न्यूसाउथ वेल्स आणि विक्टोरिया मध्ये पिकवितात. मेरे डार्लिंग नद्याची मैदाने गहूसाठी प्रसिद्ध आहेत. ऑस्ट्रेलिया आपल्या गहू उत्पादनापैकी 70% निर्यात करतो.

मका हे आणखी एक आहार धान्य आहे. याचा जनावरांचा आहार तयार करण्यास उपयोग करतात. मका क्विन्सलँड आणि न्यू साउथवेल्स मध्ये जास्त प्रमाणात पिकवितात. मरे-डार्लिंगच्या मैदानी प्रदेशात काही ठिकाणी कमी प्रमाणात भात पिकवितात.

ऊस : हे ऑस्ट्रेलियातील प्रमुख व्यापारी पीक असून हे पीक जास्त प्रमाणामध्ये पूर्व किनारपट्टीवरील उत्तर न्यू साउथवेल्स पासून क्विन्सलँड पर्यंतच्या प्रदेशात पिकवितात. तंबाखू हे दुसरे व्यापारी पीक क्विन्सलँडमध्ये जास्त प्रमाणात पिकवितात. विविध प्रकारची फळे आणि पालेभाज्या टास्मानिया, विक्टोरिया आणि साउथवेल्समध्ये पिकवितात. सफरचंद, द्राक्षे, पेरू, नाशपती इ. अधिक प्रमाणात पिकवली जातात.

पशुपालन : हा ऑस्ट्रेलियाचा सर्वात महत्वाचा व्यवसाय आहे. ऑस्ट्रेलिया हा पशुपालन देश म्हणून ओळखला जातो. येथे दुग्धजन्य पदार्थ, मांस, लोकर आणि चामडयाच्या वस्तूंसाठी मेंढया आणि गुरे पाळली जातात.

© KTDS NOT TO BE REPUBLISHED





मेंढीपालन

पशुपालन हा ऑस्ट्रेलियातील प्रमुख आर्थिक व्यवसाय आहे. सर्वाधिक मेंढया असणारा हा खंड लोकर उत्पादन आणि कच्या लोकराचे निर्यात करणारा देश आहे. या विशाल गवताळी प्रदेश, आर्टिशियन विहीरीचे पाणी, शीत व कोरडे हवामान अत्याधुनिक पशुपालन व्यवस्था विशाल बाजारपेठ यामुळे पशुपालन व्यवसायाला उत्तेजित करत आहे. येथे असणाऱ्या मेंढयामध्ये सुमारे 75% मेंढया 'मेरिनो' जातीच्या आहेत. यापासून उत्तम जातीची लोकर मिळते विशाल पशुपालन प्रदेशाला 'पशुपालन प्रदेश' म्हणतात.

गुराढोरांना प्रामुख्याने मांसासाठी व दुधाच्या उत्पादनासाठी पाळतात. सॅव्हाना प्रदेशात मांसासाठी आणि समशीतोष्ण कटिबंधातील डाऊन्स गवताळ कुरणाच्या प्रदेशात दूध उत्पादनासाठी गुरांची पैदास केली जाते.

खनिजे व उद्योगधंदे

खनिजे : खनिज पदार्थाच्या बाबतीत ऑस्ट्रेलिया समृद्ध आहे. लोखंड, बॉक्साईड, निकेल, तांबे, मॅगनिज, सोने, शिसे आणि युरेनियम ही प्रमुख खनिजे येथे सापडतात. त्याचबरोबर दगडी कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू ही इंधन खनिजे ही मिळतात.

ऑस्ट्रेलिया हा लोखंड उत्पादन करणारा प्रमुख देश आहे. जास्त प्रमाणात लोखंडाची निर्यात जपानला करतात.

जगात जास्त बॉक्साईटचे साठे ऑस्ट्रेलियात आहेत. पश्चिम ऑस्ट्रेलियातील कुलगार्डी व कालगोर्ली सोने उत्पादनात प्रसिद्ध आहेत. व्हिक्टोरिया, न्यू साउथवेल्स आणि किन्सलँडच्या काही भागात सोने सापडते.

न्यू साउथ वेल्समध्ये जास्त तांबे उत्पादित केले जाते. त्याचप्रमाणे कार्पेंटेरीय दरीच्या प्रदेशात मॅगनीज उत्पादन करण्यात अग्रेसर आहे. ऑस्ट्रेलियात अत्याधिक प्रमाणात युरेनियमचे साठे आहेत. ते जास्त प्रमाणात उत्तर प्रांत (60%), पश्चिम ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण ऑस्ट्रेलियामध्ये आढळतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

उद्योगधंदे : ऑस्ट्रेलिया हा जगातील प्रमुख औद्योगिक खंड आहे. खनिज संपत्ती, कृषी अभिवृद्धी, विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती, विदेशी भांडवल गुंतवणूक आणि विशाल व्यापार बाजारपेठ या गोष्टी उद्योगधंद्यासाठी पूरक आहेत. प्रारंभापासूनच ऑस्ट्रेलियाने उद्योग धंद्यात विदेशी निती अवलंबिली आहे. पण यामध्ये जपानचा सहभाग जास्त आहे. प्रमुख उद्योगधंदे व उत्पादन केंद्र खालील प्रमाणे.

- लोखंड व पोलाद उद्योगधंदे
- स्वयंचलित वाहन उद्योग
- वस्त्रोद्योग
- विद्युत उपकरणे
- जहाज निर्माण
- कागद, रट्ट व फळे
- तेलशुद्धीकरण

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



सिडनी उद्योगधंद्याचे नगर

इतर उद्योग धंदे म्हणजे विमान तयार करणे (सिडनी मेलबार्न), पिटाची गिरणी, मासे व फळ प्रक्रिया उद्योग, रासायनिक वस्तू तयार करणे हे होत.

लोकसंख्या


वाढ : आजपर्यंत उपलब्ध माहितीप्रमाणे ऑस्ट्रेलिया खंड आकारमानाने व लोकसंख्येच्या दृष्टीनेसुद्धा लहान आहे. येथील एकूण लोकसंख्या 20.0 मिलियन (2012) आहे. ही जगाच्या लोकसंख्येच्या 0.31% एवढीच आहे. या खंडाची लोकसंख्या 1860 मध्ये 1.15 मिलियन होती. 1960 मध्ये 10 द.ल., 1980 मध्ये 14.8 द.ल. आणि 1998 मध्ये 18.7 मिलियन होती. मागील शतकाच्या शेवटी खंडाची लोकसंख्या वाढल्याचे दिसून येते.

विभागणी : ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्या विभागणीमध्ये विरळता व असमानता दिसून येते. खंडाचा अंतर्गत भाग निर्जन आहे. साउथवेल्समध्ये लोक घनता जास्त ($\frac{1}{3}$) आहे. व्हिक्टोरिया दुसऱ्या स्थानी ($\frac{1}{4}$) आहे. क्विन्सलँड, दक्षिण ऑस्ट्रेलिया आणि टास्मानिया याचा नंतर क्रमांक लागतो. उत्तर प्रांतात अगदी विरळ लोकवस्ती आहे. देशातील लोकसंख्येच्या अर्ध्यापेक्षा जास्त लोक 6 शहराम ध्ये वास्तव्य करतात. उदा. सिडनी, मेलबोर्न ब्रिस्बेन, ॲडीलेड, पर्थ आणि न्यु कॅसल.

घनता : जगात अती कमी लोकसंख्येची घनता असलेल्या देशापैकी ऑस्ट्रेलिया एक होय. येथील सरासरी लोकसंख्येची घनता 3 लोक प्रती चौरस किलोमीटर इतकीच आहे ही एका प्रदेशापेक्षा इतर प्रदेशात भिन्न आहे. सर्व शहरामध्ये राजधानी आणि उद्योगधंदयाच्या केंद्रात लोकसंखेची घनता ज्यादा आहे. उदा.- विक्टोरिया, न्यू साऊथवेल्स, टास्मानिया, क्विन्सलँड इ. या खंडाच्या आग्नेय भागात साधारण आहे. परंतू वाळवंट व उपवाळवंटी प्रदेशात म्हणजे 80% भागात लोकसंख्येची घनता फार कमी आहे.

ऑस्ट्रेलियातील (15%) लोक खेड्यात तर (85%) लोक शहरात राहतात.

© IITBS NOT TO BE REPUBLISHED



ऑस्ट्रेलिया लोकसंख्या घनता

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

नवीन शब्द

द्वीपखंड, गोंडवाना, ऑसर आकार, मोनोलिथिक खडक, कोरल रीफ, काँगाल, लिरे, डिंगो, कुकाबुर, वॉलाबी, एकिडना, कोआला आणि इनसेलबर्ग.

अभ्यास

I. खालील दिलेल्या रिकाम्या जागा भरा.

1. मरे आणि डार्लिंग नद्यांची मैदाने _____ सरोवरमुळे वेगळी आहेत.

2. ऑस्ट्रेलियात चक्रीवादळालात _____ म्हणतात.

3. ऑस्ट्रेलियातील उष्ण कटिबंधातील गवताळ कुरणांना _____ म्हणतात.

4. ऑस्ट्रेलियातील सर्वात मोठा पक्षी _____

5. _____ नावाचा सस्तन प्राणी अंडी घालतो.

II. दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.

6. ऑस्ट्रेलियाला अत्यंत समतल भूखंड का म्हणतात ?

7. ऑस्ट्रेलियाचे स्थान व आकारमान सांगा.

8. ऑस्ट्रेलियाचे प्रमुख स्वाभाविक विभाग कोणते ?

9. ऑस्ट्रेलियातील नद्याबाबत माहिती लिहा.

10. ऑस्ट्रेलियातील प्रमुख पिके कोणती?

11. ऑस्ट्रेलियातील प्रमुख खनिजे कोणती ?

12. ऑस्ट्रेलियातील प्रमुख उद्योगधंदयाबद्दल माहिती लिहा.

13. ऑस्ट्रेलियातून निर्यात होणाऱ्या वस्तू कोणत्या ?

14. ऑस्ट्रेलियात लोकसंख्या विरळ का आहे ?

15. ऑस्ट्रेलियातील गवताळ कुरणांची नावे लिहा.

© KSBB NOT TO BE REPUBLISHED

उपक्रम:

1. ॲटलास पुस्तकाच्या सहाय्याने ऑस्ट्रेलिया खंडातील प्रमुख पर्वत, नद्या आणि सरोवर यांची यादी कर आणि नकाशात दाखव.

2. तू ज्या भागात राहतोस त्या भागाचे निरीक्षण करून तेथील पिके, वनस्पती, प्राणी-पक्षी याबाबत यादी तयार करा.

पाठ 27 अंटार्क्टिका

A1Z1C2

पाठाचा परिचय

या पाठात अंटार्क्टिका खंडाचे स्थान, विस्तार आणि भौगोलिक स्थान, स्वाभाविक लक्षणे, नैसर्गिक वनस्पती व प्राणी संपत्ती, संशोधन, अंटार्क्टिका करार आणि प्रमुख संशोधन केंद्राबाबत परिचय करून देण्यात आला आहे.

सामर्थ्ये

1. अंटार्क्टिका खंडाचे स्थान, विस्तार आणि भौगोलिक स्थान समजून घेणे.
2. अंटार्क्टिका खंडाची प्राकृतिक लक्षणे, जमिन आणि पाणी याबाबत जाणून घेणे.
3. नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी संपत्ती समजून घेणे.
4. अंटार्क्टिका खंडावरील मोहीम, करार आणि संशोधन केंद्राबाबत जाणून घेणे.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED


स्थान, विस्तार आणि भौगोलिक स्थान

स्थान : दक्षिण ध्रुवासभोवती अंटार्क्टिका खंड पसरलेला आहे. तो अंटार्क्टिका वृत्त आणि 66^0 30' दक्षिण अक्षांशामध्ये पसरलेला आहे. उत्तर ध्रुवावरील आर्क्टिक सागराच्या विरुद्ध असा हा भूखंड आहे. हे या भूखंडाचे वैशिष्ट्य आहे.

विस्तार : अंटार्क्टिका हा जगातील पाचव्या क्रमांकाचा मोठा खंड आहे. याचे एकूण आकारमान 14.2 मिलियन चौरस किलो मीटर आहे. याचे आकारमान भारत आणि चीन देशाच्या आकारमानापेक्षा जास्त व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाच्या विस्ताराच्या दीड पट आहे.

भौगोलीक स्थान : अंटार्क्टिका खंडाच्या सभोवती जलराशीचे आवरण आहे. या जलराशीना दक्षिण सागर म्हणतात. पण हा स्वतंत्र नसून हिंदी महासागर आणि पॅसिफीक महासागरात सामावलेला भाग होय. लॅटीन अमेरिकेतील दक्षिण टोकावरील केपहार्न हे या खंडाच्या जवळचे ठिकाण. हे 990 कि.मी. दूर आहे.

या खंडाच्या पूर्वेला हिंदी महासागर, पश्चिमेला पॅसिफिक महासागर आणि वायव्येला अटलांटिक महासागर आहे.



अंटार्क्टिका खंड

प्राकृतिक लक्षणे

अंटार्क्टिका खंडाचा 98% भाग बर्फाच्या थरांनी व हिमनगानी व्यापलेला आहे यामध्ये बर्फाच्छादीत पर्वत, पठारे, सखल प्रदेश व दऱ्या आहेत. बर्फाचा थर सुमारे 2200 मीटर पेक्षा जास्त जाड आहे. सर्वत्र पांढराशुभ्र बर्फच बर्फ. म्हणून या खंडाला 'पांढरा खंड' तसेच 'हिम वाळवंट' असे म्हणतात. येथील हवामान अत्यंत थंड असल्यामुळे या खंडाला 'शीतखंड' असेही म्हणतात.

अंटार्क्टिका खंडावर पर्वत, पठारे, दऱ्या, सखल प्रदेश आहेत. समुद्र सपाटीपासून या खंडाची सरासरी उंची 2300 मीटर आहे. अंटार्क्टिका पृथ्वीवरील उंचावरील खंड आहे. ट्रान्स अंटार्क्टिक पर्वत श्रेणीनी या खंडाला दोन विभागात विभागले आहे : 1. पूर्व अंटार्क्टिका 2. पश्चिम अंटार्क्टिका

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



हिमखंड

1. पूर्व अंटार्क्टिका : हा भाग अटलांटिक व हिंदी महासागर याना जोडलेला आहे. याने या खंडाचा अर्ध्यापेक्षा जास्त भाग व्यापलेला आहे. म्हणून याला 'ग्रेटर अंटार्क्टिका' म्हणतात. याच्या किनारपट्टीवर पर्वत, दऱ्या व हिमनद्या आहेत याच्या मध्यावर पठारे आहेत. तेथे दक्षिण ध्रुवाची जमीन आहे.

2. पश्चिम अंटार्क्टिका: हा भाग पॅसिफिक महासागराकडे आहे. याचा बराचसा भाग समुद्रसपाटीपेक्षा खाली आहे. या भौगोलिक भागाचा अंटार्क्टिक पर्यायी भाग पर्वतानी व्यापलेला आहे. याच्या 'S' आकाराची टोके दक्षिण अमेरिकेकडे टोकदार आहेत. याच्या सभोवती काही द्वीपसमूह आहेत. तसेच पर्वत शिखर व ज्वालामुखी आहेत. या भागातील 'एल्सवर्त' पर्वत श्रेणीतील 'विन्सन मॅसिफ' (5140 मी.) हे अंटार्क्टिकामधील सर्वात उंच शिखर आहे. रॉस द्वीपसमुहात असलेल्या 'माऊंट एरेबस' हा एकमेव जागृत ज्वालामुखी होय. तसेच 'प्रिन्स चार्लस' हा आणखी एक पर्वत आहे.

ट्रान्स अंटार्क्टिका पर्वत श्रेणीच्या विरुद्ध टोकाना दोन मोठ्या खाडया आहेत. त्या म्हणजे रॉस समुद्र आणि वेडेल समुद्र.

वनस्पती आणि प्राणी संपत्ती

यापूर्वीच्या माहितीप्रमाणे अंटार्क्टिका खंड हिमाच्छादीत असतो. प्रतिकूल असे शीत हवामान असते. वर्षातील 6 महिने अंधार व 6 महिने प्रकाश असतो

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

येथे सजीव राहणे कष्टकर आहे. शेवाळ, दगडफूल पाची (बुरशीजन्य वनस्पती) येथील प्रमुख वनस्पती आहेत. या वनस्पती किनारपट्टीवरील खडकांवर पहायला मिळतात.

येथील प्रतिकूल वातावरणाशी सामना करत काही प्राणी जीवन जगतात पण सभोवतालच्या जलभागात विविध प्राणी राहतात. उदा : पेंग्वीन, तिमिंगिल सील, क्रील मासे आणि तऱ्हेतऱ्हेचे पक्षी. सिगडी मासे, क्रील मासे (एक लहान विचित्र कोळंबीसारखा मासा) येथे भरपूर प्रमाणात आढळतात. ते गटागटाने पोहत राहतात. असे लहान मासे समुद्रातील मोठ्या प्राण्यांचा आणि माशांचा मुख्य आहार असतो.

समुद्राच्या काठावर असंख्य पेंग्वीन राहतात. हे पक्षी उडू शकत नाहीत. अँडेली, एम्पररपेंग्वीन आणि चीनस्ट्रैप या येथील पेंग्वीनच्या प्रमुख प्रजाती आहेत. हिमाच्छादित खंडात येणाऱ्या जहाजांचे सर्वप्रथम स्वागत येथील पेंग्वीन करतात. या खंडाच्या जवळील द्विपसमूह व समुद्र किनाऱ्यावर सील मासे जास्त प्रमाणात राहतात. सील माशाच्या मुख्य सहा प्रजाती आहेत. पण सततच्या शिकारीमुळे सील माशांचा जीव धोक्यात आला आहे.

©KTB NOT TO BE REPUBLISHED



पेंग्वीन



सील मासा

- पेंग्वीन आपल्या संतानाभिवृद्धीसाठी दगड, कपारी मध्ये घरे तयार करतात. या घरांना 'रुकरी' म्हणतात.
- या खंडातील दक्षिण ध्रुवाजवळ असणाऱ्या 'वोस्टाक' येथे जगातील सर्वात कमी तापमान नोंद झाले आहे. (-89^0 C)

अंटार्क्टिका मोहिम - अंटार्क्टिका करार



स्कॉट आणि अमुंडसन


अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून अंटार्क्टिका खंडाबाबत संशोधन चालू आहे. काही सागर साहसवीरानी या खंडाच्या शोधासाठी मोहिमा आखल्या. यु.एस.ए. नौकादलाचे प्रमुख चार्ल्स विल्स यानी या खंडाचा शोध लावला. त्यानंतर ब्रिटीश संशोधक जेम्स क्लार्क रॉस यानी 1841 मध्ये (यांच्या नावाने ओळखले जाणारे) या खंडातील रॉस समुद्राचा शोध लावला. इंग्लंडच्या रॉबर्ट फाल्कन स्कॉट याने हा समुद्र यशस्वीरित्या पार केला. संशोधक उन्हाळ्याच्या उत्तरार्धात या समुद्रमार्गे या खंडात प्रवेश करतात. त्यानंतर ते त्यांच्या हिवाळ्यातील मोहिमा आखतात.

अंटार्क्टिका खंडातील समस्त संशोधन मोहिमा 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात हाती घेण्यात आल्या. 1909 मध्ये इंग्लडच्या शाकल्पन याने दक्षिणेचा ध्रुवप्रदेश शोधून काढला. नॉर्वेचा बॉल्ड अमुंडसेन हा 1911 साली दक्षिण ध्रुवावर पोहचला. 1912 मध्ये रॉबर्ट फाल्कन स्कॉट हा सुद्धा त्याच ध्रुवावर जाऊन परत येताना मरण पावला त्याच्या दैनंदिन वहीतील नोंदीमुळे पुढे वैज्ञानिकाना संशोधनात फार मोलाचे मार्गदर्शन मिळाले. अमेरिकन नौकादलाचा ॲडमिरल रीचर्ड बेयर्ड हा या खंडाच्या संशोधनासाठी विमानाद्वारे सर्वप्रथम (1929) तेथे पोहचला. तेव्हापासून या खंडाच्या अभ्यासासाठी अनेक देश पुढे आले आहेत.

अंटार्क्टिक करार : अंटार्क्टिका हे केवळ वैज्ञानिक संशोधन करण्याचे एक ठिकाण राहील असा देशांतर्गत करार करण्यात आलेला आहे. या खंडावर फक्त वैज्ञानिक संशोधन करण्याचे ठरविण्यात आले. म्हणूनच या खंडाला 'वैज्ञानिक भूखंड' असे म्हणतात. बारा राष्ट्रातील प्रतिनिधीनी एकत्र येऊन वॉशिंग्टन डी.सी. (U.S.A) मध्ये 'अंटार्क्टिका खंड करार पत्र' 1 डिसेंबर 1959 रोजी तयार केले.


© MTBS NOT TO BE REPUBLISHED

23 जून 1961 साली या करारावर सह्या केल्या. हा करार 60^0 अक्षांशाच्या दक्षिण प्रदेशाला लागू होतो. सदस्य राष्ट्रे : अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, बेल्जीयम, चिली, फ्रान्स, जपान, न्यूझिलँड, नॉर्वे, दक्षिण आफ्रिका, रशिया, इंग्लंड, अमेरिका ही सदस्य राष्ट्रे आहेत.



आधुनिक संशोधन केंद्र

कराराची उद्दिष्टे : या करारानुसार या खंडावर फक्त वैज्ञानिक संशोधन करण्याचे ठरविण्यात आले. म्हणून या खंडाला 'वैज्ञानिक भूखंड' असे म्हणतात येथे अण्वस्त्र चाचणी घेण्यास बंदी आहे. कोणत्याही देशाचे येथील जमिनीवर, पाण्यावर स्वामीत्व राहणार नाही. येथे परिसर प्रदूषण करायचे नाही. या खंडावर संशोधनासाठी येणाऱ्यांनी कोणत्याही प्रकारचे बाहेरील जीव या ठिकाणी आणायचे नाहीत. तिमींगलना भेटण्यास मनाई आहे. देशानी येथे मिळविलेल्या वैज्ञानिक माहितीची मुक्तपणे देवाण घेवाण करण्याची संधी आहे. येथील नैसर्गिक संपत्तीचे रक्षण केले पाहिजे. एकंदरीत या खंडावर शांती राखली पाहिजे.



हिमाच्छादीत खंडात संशोधन

© MTRS NOT TO BE REPUBLISHED

अंटार्क्टिका खंडात जगातील गोड्या पाण्याच्या साठ्यापैकी 90% पाणी हिमनगाच्या स्वरूपात आहे.

प्रमुख संशोधन केंद्रे

काही तज्ञांच्या मते 'अंटार्क्टिका खंड' जागतिक संशोधनासाठी एक उत्तम उदाहरण असून त्यामुळे वैज्ञानिक आवड वाढविण्यास मदत होत आहे. या खंडाचा उगम आणि भूरचना, हवामानाची परिस्थिती, जीवपरिसर व्यवस्था, जैविक विविधता आणि संरक्षण, तेथील परिसर प्रदूषण आणि उपाय योजना, टाकाऊ पदार्थाची विल्हेवाट व वापर, तेलगळती मुळे होणारे अपघात आणि त्याबाबत घ्यावयाचे सत्कीचे क्रम हे संशोधनाचे विषय आहेत. या बाबत संशोधन करण्यासाठी जगातील 30 पेक्षा जास्त राष्ट्रांनी आपली संशोधन केंद्रे येथे स्थापन केली आहेत.

आपल्या भारत देशाने सुद्धा आपले संशोधन केंद्र या खंडात स्थापन केले आहे. सर्वप्रथम 6 डिसेंबर 1981 रोजी एस्. झेड. कासीम यांच्या नेतृत्त्वाखाली वैज्ञानिकाचा गट गोव्याहून मोहिमेवर निघाला. हा गट पोलार सर्कल जहाजाच्या सहाय्याने 1 जानेवारी 1982 रोजी अंटार्क्टिका खंडावर पोहचला. भारताने या खंडात स्थापन केलेले पहिले संशोधन केंद्र म्हणजे 'दक्षिण गंगोत्री'. हे केंद्र 1983 साली स्थापन करण्यात आले आणि या केंद्राचे 1989 ला नामकरण करण्यात आले. आता हे केंद्र मानवरहीत असून याचा साठवणुकीसाठी वापर करतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



'मैत्री' भारतीय संशोधन केंद्र



'भारती' भारताचे आणखी एक संशोधन केंद्र

दक्षिण गंगोत्री

पहिल्या मोहीमेच्या यशस्वीतेनंतर आतापर्यंत सुमारे 50 वेळा भारताचे संशोधक गट अंटार्क्टिका खंडावर जाऊन आले आहेत. भारताचे 'मैत्री' नावाचे दुसरे संशोधन केंद्र होय. हे शिर्माचर ओयॅसीस येथे निर्माण केले आहे. (1988-89) या केंद्रात वर्षभर कोणत्याही ऋतूत 26 जणांना एकत्र राहण्याची व्यवस्था आहे. येथून 255 मीटर अंतरावर गोड्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी 'प्रियदर्शिनी' नावाचे सरोवर भारताने निर्माण केले आहे. मैत्री केंद्रात भूविज्ञान, भूगोलशास्त्र आणि औषधांबाबत संशोधन चालते.

'भारती' नावाचे आणखी एक संशोधन केंद्र अंटार्क्टिका - मध्ये स्थापण्याची योजना भारताने आखली आहे. 'सागर संशोधन' हा याचा मुख्य उद्देश आहे. यासाठी आवश्यक सर्वेक्षण सुद्धा नुकतेच केलेले आहे.

NOT TO BE REPUBLISHED © KSRS

नवीन शब्द

पांढरा खंड, शीतखंड, विन्सन मॅसिफ, एरेबस, शेवाळ, पेंग्वीन, तिमींगल, सील, सिगडी, ॲडिले, चीनस्ट्रॅप, क्रील, भूभौत, दक्षिण गंगोत्री, मैत्री, भारती.

अभ्यास

I. खालील दिलेल्या रिकाम्या जागा भरा.

1. _____ हे अंटार्क्टिका खंडाच्या जवळचे ठिकाण आहे.
2. अंटार्क्टिका खंडाचा शोध _____ यांनी लावला.
3. दक्षिण ध्रुव प्रदेश _____ यांनी शोधून काढला.
4. भारताने अंटार्क्टिक खंडात स्थापन केलेले पहिले संशोधन केंद्र _____ हे होय.

II. दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

5. अंटार्क्टिका खंडाचे स्थान व आकारमान लिहा ?
6. अंटार्क्टिका खंडाचे भौगोलिक स्थान लिहा ?
7. अंटार्क्टिका खंडातील प्रमुख पर्वत व शिखरे लिहा ?
8. अंटार्क्टिका खंडातील वनस्पती व प्राण्यांची नावे सांगा.
9. अंटार्क्टिका खंडात असलेल्या भारतीय संशोधन केंद्राची नावे लिहा.

उपक्रम:

1. अंटार्क्टिका खंडात विविध देशानी स्थापन केलेल्या संशोधन केंद्रांच्या छायाचित्रांचा संग्रह कर आणि यादी तयार कर.
2. अंटार्क्टिका खंडात आढळणाऱ्या विविध वनस्पती आणि प्राणी यांची यादी कर. त्यांच्या चित्रांचा संग्रह कर.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED